CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ४ मे २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १५५ । पाने १२ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघटनेशी एकरूप होणे म्हणजे स्वत: संघटनेच्या चौकटीत योग्य तऱ्हेने बसण्यासाठी स्वत:मध्ये बदल घडवून आणणे. संघटनेच्या विचारधारेशी जुळवून घेणे हे अत्यंत आवश्यक आहे. ही एक प्रकारची शिस्त आहे. ती आपल्या अंगी बाणवून घ्यावी लागेल आणि आयुष्यभर त्या शिस्तीचे पालन करावे लागेल. रोज आपण स्वत:ला पडताळून पाहावे लागेल.


**- पद्मविभूषण स्व. पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र,
पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

# पाच राज्यांचा आज फैसला

## बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम, पुडुचेरीत उत्सुकता शिगेला

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

**पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि केंद्रशासित प्रदेश पुडुचेरी या चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल सोमवारी लागणार आहेत. यात सर्वाधिक चुरशीचा निकाल पश्चिम बंगालचा राहील. आसाम, पुडुचेरीत पुन्हा भाजपा सत्तेत येईल, तामिळनाडूत स्टॅलिन यांची सत्ता कायम आणि केरळात यूडीएफ सत्तेत येईल, असा 'एक्झिट पोल'चा अंदाज आहे. हे अंदाज कितपत खरे ठरतात, याची उत्सुकता शिगेला पोहचली आहे.**





मतमोजणीच्या पृष्ठभूमीवर प. बंगालमधील हावडा येथे गस्त घालताना निमलष्करी दलाचे जवान

पाचही राज्यातील मतमोजणीला सकाळी आठ वाजतापासून प्रारंभ होणार आहे. निवडणूक आयोग मतमोजणीसाठी सज्ज आहे. मतमोजणीची प्रक्रिया सर्व केंद्रांवर एकाच वेळी आणि बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्थेच्या कडेकोट बंदोबस्तात पार पाडली जाईल, अशी माहिती आयोगाने दिली. पाच राज्यांतील ८२४ मतदारसंघांमधील उमेदवारांचा फैसला होणार आहे. सकाळी आठ वाजता टपाल मतपत्रिकांच्या मतमोजणीला सुरुवात होईल. यामध्ये सेवा मतदार, निवडणूक कर्तव्यावरील कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांनी घरातून केलेल्या मतदान श्रेणीचा समावेश आहे.

सकाळी साडेआठ वाजता इव्हीएम मतमोजणी सुरू होईल. निवडणूक आयोगाच्या नियमांप्रमाणे टपाल मतपत्रिकांच्या मोजणीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर ३० मिनिटांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमधील मतांची मोजणी सुरू होते.

पाच राज्यांमध्ये जवळपास महिनाभर चाललेल्या विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत, सर्वप्रथम केरळमधील १४० आणि आसाममधील १२६ तर केंद्रशासित प्रदेश पुडुचेरीतील ३० जागांवर एकाच टप्प्यात मतदान झाले. तामिळनाडूच्या २३४ जागांसाठी २३ एप्रिलला मतदान झाले. दोन टप्प्यांत निवडणूक झालेले पश्चिम बंगाल हे एकमेव राज्य होते. राज्यातील २९३ विधानसभा जागांसाठी २३ एप्रिल आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान घेण्यात आले.

**आसाममध्ये भाजपा हॅट्ट्रिक करणार?**

आसाममध्ये भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआ तिसऱ्यांदा सत्तेवर येईल की, आठवडाभराच्या संघर्षानंतर काँग्रेसची सत्ता येईल, हे ठरेल. आसाम विधानसभा निवडणुकीत अस्मितेचे राजकारण, कल्याणकारी योजनांचे वितरण आणि प्रादेशिक आकांक्षा यांचे वर्चस्व होते. राज्यातील १२६ विधानसभा जागांवरील ७२२ उमेदवारांचे भवितव्य ठरणार असून, कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत सर्व ३५ जिल्ह्यांमधील ४० मतमोजणी केंद्रांवर इव्हीएम उघडण्यात येणार आहे.

**तामिळनाडूतील करूरमध्ये सर्वाधिक मतदान**

निवडणूक आयोगानुसार, तामिळनाडुतील करूर मतदारसंघात सर्वाधिक ९३.४१ टक्के मतदान झाले. त्यापाठोपाठ सेलम जिल्ह्यातील वीरपांडी मतदारसंघात ९३.३६ टक्के मतदान झाले.

कन्याकुमारी जिल्ह्यातील किल्लियूर येथे सर्वांत कमी ७१.२६ टक्के मतदानाची नोंद झाली. राज्यातील सर्व ७५,०६४ मतदान केंद्रांवरील मतांची, टपाल मतपत्रिकांसह, ६२ निश्चित मतमोजणी केंद्रांवर मोजणी केली जाईल. ◀(वृत्तसंस्था)

### भूतान-बांगलादेशची सीमा सील

**पश्चिम बंगालमधील मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जलपाईगुडी जिल्हा प्रशासनाने भूतान -बांगलादेशच्या सीमा सील केल्या आहेत. या आंतरराष्ट्रीय सीमा व्यावसायिक वाहनांसाठी ४८ तासांकरिता मंगळवार, ५ मे रोजी सकाळी ६:०० वाजेपर्यंत पूर्णपणे बंद राहतील. या काळात, कोणत्याही वाहनाला किंवा चालकाला पश्चिम बंगालमधून बांगलादेश किंवा भूतानमध्ये प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच या दोन्ही देशांमधून राज्यात वाहनांना प्रवेश बंदी असेल.**

# बारामती पोटनिवडणुकीची मतमोजणी आज

◆ **पुणे, ३ मे**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी सोमवारी ४ मे रोजी होणार असून निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ही निवडणूक घेण्यात आली होती. या निवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह एकूण २३ उमेदवार रिंगणात होते. राहुरी पोटनिवडणुकीचीही मतमोजणी सोमवारी होणार आहे.



या पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान झाले. या निवडणुकीत ५८.२७ टक्के मतदान नोंदविण्यात आले. या मतदारसंघात एकूण ३ लाख ८४ हजार ५७९ मतदारांची नोंद असून त्यापैकी २ लाख २३ हजार ७०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

बारामती मतदारसंघात अजित पवारांचे योगदान आणि त्यांनी या भागासह राज्यासाठी केलेल्या काम आणि जनतेचे प्रेम यामुळे ही निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न करण्यात आले होते. प्रमुख पक्षांनी माघार घेत सुनेत्रा पवार यांनी पाठिंबा दिला होता. मात्र अपक्ष उमेदवारांमुळे निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत अजित पवारांना मिळत असलेल्या आजपर्यंतच्या मताधिक्यांपेक्षा अधिक मतदान होण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कंबर कसली होती. आता मतमोजणीनंतरच रेकॉर्ड ब्रेक मते मिळणार का हे प्रत्यक्षात समजणार आहे.

दरम्यान, प्रचाराच्या काळात राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: बारामतीमध्ये येऊन अजित पवारांचा वारसा पुढे घेऊन जाणाऱ्या सुनेत्रा पवार यांना मतदान करण्याचे आवाहन केले होते. तसेच बारामतीमध्ये मतदानाचे भाग्य आमच्या वाट्याला नाही, असे सांगून रेकॉर्ड ब्रेक मतदान करण्याचे आवाहन केले होते. मतमोजणीपूर्वीच निकालाबाबत राजकीय वर्तुळात अंदाज व्यक्त केले जात असून कार्यकर्त्यांकडून मोठ्या मताधिक्याची शक्यता वर्तवली जात आहे. जय पवार, रोहित पवार विविध नेत्यांनी मोठ्या मताधिक्याने विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे.

मतमोजणी प्रक्रियेसाठी प्रशासनाकडून आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली असून सुरक्षेची कडक व्यवस्था ठेवण्यात आली आहे. निकाल जाहीर होताच बारामतीतील राजकीय समीकरणांवर त्याचा परिणाम होणार असल्याने सर्वांचे लक्ष या निकालाकडे लागले आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### शीरखुर्मातून गुंगीचे औषध देऊन लैंगिक शोषण?

**नाशिक** : टीसीएस या आयटी कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि बळजबरीने धर्मांतर करण्याच्या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला आहे. या प्रकरणाच्या तपासात आता एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. पीडित तरुणींना शीरखुर्मा सारख्या गोड पदार्थातून गुंगीचे औषध देऊन त्यांचे लैंगिक शोषण केल्याचा दाट संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात तपास करणाऱ्या विशेष पथकाला (एसआयटी) ड्रग्ज आणि मादक पदार्थांचा नवा अँगल मिळाला आहे. प्राथमिक तपासानुसार, आरोपींनी आधी महिला कर्मचाऱ्यांशी मैत्री वाढवली आणि त्यानंतर त्यांना शीरखुर्मा खायला दिला. या पदार्थांमध्ये गुंगी आणणारे आणि कामोत्तेजक पदार्थ मिसळले गेल्याचा संशय आहे. याच अमली पदार्थांच्या प्रभावाखाली महिलांवर अत्याचार करण्यात आले. आता नाशिक पोलिस या दिशेने सखोल तपास करत आहेत.

### संदीप पाठकांवर अटकेची टांगती तलवार?

**नवी दिल्ली** : आम आदमी पक्ष सोडून भाजपात सामील झालेले राज्यसभा खासदार संदीप पाठक यांच्या विरोधात पंजाबमध्ये दोन एफआयआर दाखल झाले असून त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. यावर पाठक म्हणाले, कालपासून पंजाबमध्ये माझ्याविरोधात दोन एफआयआर दाखल झाल्याचे वृत्त आहे. मला अद्याप या एफआयआरबद्दल कोणतीही औपचारिक किंवा अनौपचारिक माहिती मिळालेली नाही. जर सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून कोणतेही एफआयआर दाखल केले गेले असतील, तर मी त्यांचा आढावा घेतल्यानंतरच भाष्य करू शकेन. संदीप पाठक पुढे म्हणाले, जोपर्यंत मी आम आदमी पक्षात काम केले, तोपर्यंत मी तत्त्व आणि प्रामाणिकपणाने काम केले.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या किंवा** ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा.

सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

## अंतरंग

२ बाजारात येणार भरघोस कच्चे तेल
३ दिल्लीत होरपळून नऊ जणांचा मृत्यू
४ काय चूक होती त्या लेकराची? (अग्रलेख)
६ रघुवंशीची 'अजिंक्य' खेळी

## युद्ध संपवा; सैन्य मागे घ्या

### इराणचा अमेरिकेला नवा शांतता प्रस्ताव

◆ **तेलअविव, ३ मे**

सध्या अमेरिका आणि इराणमध्ये शस्त्रसंधी सुरु असली तरी युद्धाचा वणवा पुन्हा पेटणार की युद्ध संपणार?, याबाबत अद्यापही संभ्रम कायम आहे. या सर्व घडामोडींदरम्यान, आता इराणने अमेरिकेला युद्ध थांबवण्यासाठी १४ कलमी नवा शांतता प्रस्ताव दिल्याची माहिती समोर आली आहे.

अमेरिका-इराणमधील युद्ध संपवण्याबाबत अजून कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. पाकिस्तानच्या माध्यमातून शांतता करारासाठी हालचाली सुरू आहेत. पण दुसऱ्या फेरीतही युद्धाबाबत ठोस तोडगा निघत नसल्याचे दिसून येत आहे. अशातच अमेरिकेने काही दिवसांपासून होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी सुरू केलेली आहे. त्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती असल्याने होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जागतिक व्यापाराला अडथळे निर्माण होत आहेत. याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. अशा परिस्थितीतही डोनाल्ड ट्रम्प हे रोज वेगवेगळे वक्तव्ये करीत आहेत. ◀(वृत्तसंस्था)

# आरोपीला मृत्युदंड होईल याची काळजी घेऊ

● **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन** ● **खटल्याची सुनावणी जलदगतीने चालविणार**

◆ **नागपूर, ३ मे**

साडे तीन वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षीय नराधमाने अत्याचार करून तिला ठार मारले. ही भयावह घटना पुणे जिल्ह्यातील नसरापूर भागात घडली. या प्रकरणातील आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू.त्यानुसार आम्ही या खटल्याची सुनावणी जलदगतीने चालवू आणि विक्रमी वेळेत पूर्ण करू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. नागपूर येथे ३ मे रोजी ते पत्रकारांशी संवाद साधत होते.

नसरापूर प्रकरण हे मानवतेला काळीमा फासणारे आहे. यातील आरोपी नराधमाला भर चौकात फाशी द्यावी, अशी अनेकांची इच्छा आहे. त्यांचे म्हणणे भावनेला धरून आहे. मात्र लोकशाही व्यवस्थेत असे करता येत नाही. लोकशाही ही कायद्याने चालत असते. म्हणूनच आम्ही सर्व नियम पाळून तातडीने ठोस पुराव्यांसह दोषारोपपत्र जलदगती न्यायालयात सादर करण्यावर भर देत आहोत. तसेच आदेश आम्ही पोलिसांना दिले आहेत. त्याची पूर्तता होताच उच्च न्यायालयाशी चर्चा करून यातील नराधम भीमराव कांबळे याला मृत्यूदंडाची शिक्षा हाईल, असेच आमचे प्रयत्न राहणार आहेत. नसरापूर प्रकरणात जे काही होईल ते कायद्यानेच असेही त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी आरोपी गुन्हे करूनही दोन प्रकरणात निर्दोष सुटला आहे. त्याही प्रकरणाच्या फाईल्स पुन्हा उघडून तपास केला जाणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यात ज्या लोकांनी तपासात त्रुटी ठेवली असेल त्यांनाही सोडले जाणार नाही, असाही इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, चिमुकलीवर अत्याचार करून तिला ठार करणारा आरोपी भीमराव कांबळे यावेळी सुटणे शक्य नाही. कारण पोलिसांजवळ भक्कम पुरावे आहेत. शिवाय संपूर्ण जनमताचा कौलही महत्त्वपूर्ण मानायला हवा. ◀(तभा वृत्तसेवा)

### पीडित कुटुंबाचे मानले आभार

**पीडित कुटुंबावर उद्भवलेला प्रसंग वाईटच आहे. पण अशाही स्थितीत पीडित मुलीच्या वडिलांनी जो काही संयम दाखवित प्रशासनाला सहकार्य केले, याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे आभार मानले. संपूर्ण शासन हे पीडित कुटुंबीयांसोबत असल्याचे पत्र आम्ही दिले आहे. त्यांना न्याय मिळेपर्यंत सरकार स्वस्थ बसणार नाही, अशीही ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.**

## पुणे ग्रामीण पोलिसांचे विशेष तपास पथक

◆ **पुणे, ३ मे**

भोर तालुक्यातील नसरापूर येथील अत्याचार आणि खून प्रकरणाच्या तपासासाठी पुणे ग्रामीण पोलिसांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. या पथकात सहा अधिकाऱ्यांचा समावेश असून, त्यामध्ये दोन महिला अधिकाऱ्यांचाही समावेश आहे.

साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी उघडकीस आली. नसरापूर अत्याचार प्रकरण अत्यंत संवेदनशील असून, तपास जलद आणि काटेकोर पद्धतीने करण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. सहा अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक तपास करणार आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिली. ◀(तभा वृत्तसेवा)

# बारावीचे 'ते' ११६ विद्यार्थी नापास

### वासी (कोरा) शाळेतील सामूहिक कॉपी प्रकार

तभा इफेक्ट

**प्रफुल्ल व्यास**

◆ **वर्धा, ३ मे**

दहावी, बारावीच्या परीक्षेत सामूहिक कॉपीवर आळा घालण्यासाठी सरकार, प्रशासन विविध योजनांची अमलबजावणी करते. काही शाळा सामूहिक कॉपीसाठी कुप्रसिद्ध असतात. समुद्रपूर तालुक्यातील वासी (कोरा) येथील शाळेत बारावीच्या ११८ विद्यार्थ्यांची बोर्डाच्या परीक्षेतील उत्तरं सारखी आल्याचे प्रकरण 'तरुण भारत'ने लावून धरले होते. त्या केंद्रावर फिदा असलेल्या नागपूर बोर्डाने अखेर कर्तव्य चोख बजावत सामूहिक कॉपी प्रकरणातील ११६ विद्यार्थ्यांना नापास केले आहे.

वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यातील ज्या श्रीमंताची मुलं दहावीची परीक्षा अभ्यास करून उत्तीर्ण होऊ शकत नाहीत, त्या मुलांना वासी (कोरा) येथील विद्यालयात प्रवेश देऊन उत्तीर्ण होण्याची शंभर टक्के गॅरंटी दिली जाते. या विद्यालयात बारावी उन्हाळी परीक्षेत बॉयोलॉजीचा पेपर झाला. जमा झालेले पेपरचे गठ्ठे मूल्यांकनाकरिता मॉडरेटरकडे गेले. पेपर तपासताना ११५ विद्यार्थ्यांचे उत्तर सारखे आल्याने बोर्डाकडे तक्रार दाखल केली. तरुण भारतने हा विषय चांगलाच लावून धरला होता. बॉयोलॉजीचा पेपर देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना बोर्डात बोलावण्यात आले. ५०-५० च्या गटातील विद्यार्थ्यांनी चौकशी समितीकडे आपले जबाब नोंदवले होते. शनिवारी लागलेल्या निकालात त्या शाळेतील ११६ विद्यार्थी नापास झाले आहेत.

### अनुत्तरित प्रश्न

**बोर्ड, जिल्हाधिकारी, शिक्षण विभाग यांच्या वतीने फिरते पथक, स्थिर पथकाची नियुक्ती केली जाते. याशिवाय प्रत्येक शाळेत दोन पोलिसही नियुक्त केले जातात. हा सर्व लवाजमा असतानाही या शाळेत सामूहिक कॉपी झालीच कशी, या प्रश्नाचे उत्तर गुलदस्त्यात आहे. या शाळेत जीवशास्त्र विषयाची कॉपी करताना प्रत्येक खोलीत टीव्हीवरून उत्तरं लिहून देण्यात आले असल्याचेही विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.**

# सेवानिवृत्त पोलिस अधिकाऱ्याच्या घरात १६ लाखांची चोरी

◆ **कारंजा लाड, ३ मे**

येथील मेमन कॉलनी भाग ३ मध्ये सेवानिवृत्त पोलिस अधिकाऱ्याच्या घरात अज्ञात चोरांनी शनिवारी मध्यरात्रीनंतर १६ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जमील रहीम शेख मुंबई पोलिस दलातून पोलिस निरीक्षक पदावरून गतवर्षी सेवानिवृत्त झाले. अज्ञात चोरांनी त्यांच्या घराच्या दरवाज्याची कडी उघडून आत प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील लोखंडी कपाटातील लॉकर फोडून मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला. चोरीस गेलेल्या ऐवजात १० तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, विविध दागिने, अंगठ्या, नेकलेस सेट, चेन, मनगटी घड्याळे तसेच ६० हजार रुपयांची रोख रक्कम असा १६.३० लाख रुपयांचा माल समाविष्ट आहे.

सर्व दागिने एका पर्समध्ये ठेवले होते. या प्रकरणात कारंजा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच ठाणेदार दिनेशचंद्र शुक्ला यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक जयदीप पवार, गणेश जाधव, मयुरेश तिवारी, उमेशकुमार बीबेकर, मोहम्मद परसुवाले, अनिस निनसुरवाले, अमित भगत, नितीन पाटील आदींनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. ◀(तभा वृत्तसेवा)

# पुण्यातील तीन तरुणांचा पवना नदीत बुडून मृत्यू

◆ **पिंपरी-चिंचवड, ३ मे**

मावळ तालुक्यातील थुगाव गावाजवळील पवना नदीत रविवारी दुपारी घडलेल्या दुर्दैवी घटनेत पुण्यातील तीन तरुणांचा बुडून मृत्यू झाला. सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आलेल्या मित्रांवर काळाने घाला घातल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्रथमेश शिंदे, आश्विन भालेराव आणि आयान शेख हे सर्व रा.पुणे येथील आहे. ही घटना रविवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. सुट्टी असल्याने हे तिघे मित्र मावळ परिसरात फिरण्यासाठी आले होते. थुगाव गावाजवळील पवना नदी पात्रात ते पोहण्यासाठी उतरले. मात्र नदीतील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तिघेही पाण्यात बुडाले. स्थानिक नागरिकांनी आणि बचाव पथकाने तिघांना नदीबाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना कामशेत येथील खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर तिघांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. ◀(तभा वृत्तसेवा)

# अंतराळात भारतीय स्टार्टअपची 'दृष्टी'

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

बंगळुरूतील अंतराळ स्टार्टअप कंपनी गॅलेक्सी आयचा दृष्टी नावाचा उपग्रह रविवारी कॅलिफोर्नियातून स्पेस एक्सच्या फाल्कन-९ रॉकेटमधून प्रक्षेपित करण्यात आला.

मिशन दृष्टी हा जगातील पहिला ऑप्टोएसएआर उपग्रह आहे. हा इलेक्ट्रो-ऑप्टिकल (ईओ) आणि सिंथेटिक ॲपर्चर रडार (एसएआर) सेन्सर्सला एकाच मंचावर एकत्रित करतो, असे कंपनीने सांगितले. ईओ सेन्सर सूर्यप्रकाश आणि स्वच्छ आकाशात उच्च रिझोल्युशन प्रतिमा घेतात, तर एसएआर सेन्सर रडार पल्स वापरून सर्व हवामान आणि सर्वकालीन प्रतिमा प्रदान करतात.



**स्पेस एक्सने प्रक्षेपित केला उपग्रह**

उपग्रह आता यशस्वीरीत्या कक्षेत असल्याने आमचे तत्काळ लक्ष त्याचे कार्य पूर्ण करण्यावर आहे. आम्ही या टप्प्यातून पुढे जात असताना आमच्या ऑप्टोएसएआर पेलोडद्वारे सक्षम केलेल्या भिन्न डेटासेटमध्ये जगाचे लक्ष वेधले गेल्याचे आम्हाला दिसून येत आहे, असे गॅलेक्सी आयचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुयश सिंह यांनी सांगितले.

हा उपग्रह पारंपरिक प्रणालींच्या दीर्घकालीन मर्यादांचे निराकरण करण्यात मदत करेल आणि विविध पर्यावरणीय परिस्थितींमध्ये अधिक विश्वासार्ह आणि सातत्यपूर्ण डेटा मिळवण्यात मदत करेल, असे कंपनीने म्हटले. या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचा दुहेरी वापर शक्य आहे. मिशन संरक्षण, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, सागरी देखरेख आणि पायाभूत सुविधांच्या नियोजनासाठी याचा वापर शक्य आहे.

इस्रोच्या अलिकडील वार्षिक अहवालात नमूद केलेल्या २९ सक्रिय पृथ्वी निरीक्षक उपग्रहांसह भारताच्या व्यापक उपक्रमांनाही हा उपग्रह पूरक ठरेल, अशी अपेक्षा आहे. गॅलेक्सी आयने भारतासाठी एक मजबूत आणि सार्वभौम पृथ्वी निरीक्षण पायाभूत सुविधा विकसित करून मिशन दृष्टीला २०३० पर्यंत १० उपग्रहांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले कौतुक



**गॅलेक्सी आयने जगातील पहिली ऑप्टोएसएआर उपग्रह मोहीम मिशन दृष्टीच्या प्रक्षेपणाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. हा नाविन्य आणि राष्ट्रनिर्माणाप्रती असलेल्या युवावर्गाच्या ध्यासातील एक पुरावा असल्याचे संबोधले.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### फिलिपिन्समध्ये मायॉन ज्वालामुखीचा हाहाकार

**अल्बे** : फिलिपिन्सच्या अल्बे प्रांतात एक धोकादायक नैसर्गिक घटना घडली आहे. रविवार, ३ मे रोजी मायॉन ज्वालामुखीचा पुन्हा उद्रेक झाला. सुमारे सहा किलोमीटरचा परिसर सील करण्यात आला असून या भागातून हजारो लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. दरम्यान, प्रशासनाने लाव्हा आणि भूस्खलनाचा इशारा दिला आहे. मनिलाच्या आग्नेयेला असलेल्या अल्बे प्रांतात मायॉन ज्वालामुखीची हालचाल पुन्हा वाढल्यानंतर हजारो लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. राखेचा लोट आकाशात पसरला असून त्याने आजूबाजूचा परिसर झाकून टाकला. ज्वालामुखीच्या ६ किलोमीटर परिसरात प्रवेश करण्यास लोकांना मनाई करण्यात आली आहे. ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर, धोक्याची पातळी ५ वरून ३ पर्यंत वाढवण्यात आली आहे. रहिवाशांना लाव्हा, भूस्खलन आणि पुढील उद्रेकांच्या धोक्याचा इशारा देण्यात आला आहे.

# बाजारात येणार भरघोस कच्चे तेल

## 'ओपेक प्लस 'चा मोठा निर्णय; भारतावर थेट परिणाम

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

तेल उत्पादक गट 'ओपेक प्लस'ने रविवारी जून महिन्यासाठी कच्च्या तेलाच्या उत्पादन कोट्यात वाढ जाहीर केली. हा निर्णय अशा वेळी आला आहे, जेव्हा संयुक्त अरब अमिरातीने अलीकडेच या संघटनेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. या संघटनेचे सात सदस्य देश (अल्जेरिया, इराक, कझाकस्तान, कुवेत, ओमान, रशिया आणि सौदी अरेबिया) यांनी संयुक्तपणे जूनमध्ये दररोज १,८८,००० बॅरल उत्पादन वाढवण्याची घोषणा केली आहे. यामुळे भारतातील तेल आयातीतही वाढ होऊ शकते.



ही वाढ तेल बाजारातील स्थिरता राखण्याच्या त्यांच्या सामूहिक वचनबद्धतेचा एक भाग आहे. गत आठवड्यात, उत्पादन कोट्यावरून दीर्घकाळापासून सुरू असलेल्या मतभेदानंतर संयुक्त अरब अमिरातीने ओपेक आणि ओपेक प्लस या दोन्ही गटांमधून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे.

तज्ज्ञांच्या मते, ही वाढ अपेक्षित होती. मार्च आणि एप्रिलमध्ये, संयुक्त अरब अमिरातीचा वाटा वगळून, दररोज सुमारे २,००,००० बॅरलची अशीच वाढ लागू करण्यात आली होती. तज्ज्ञांच्या मते, उत्पादन कोट्यातील ही वाढ केवळ कागदोपत्रीच राहू शकते. कारण की, अनेक सदस्य देश आधीच त्यांच्या वचन दिलेल्या पातळीपेक्षा कमी उत्पादन करत आहेत.

**होर्मुझ संकटाचा परिणाम**

२८ फेब्रुवारीला अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला करून आखातातील तणाव वाढवला. याला प्रत्युत्तर म्हणून, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नाकेबंदी लादली. या नाकेबंदीमुळे तेल निर्यातीवर गंभीर परिणाम झाला आहे. आखाती देशांच्या अतिरिक्त उत्पादन क्षमतेचा मोठा भाग सध्या जागतिक बाजारपेठेत पोहोचू शकत नाही. (वृत्तसंस्था)

### भारताला किमती नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल

ओपेक प्लसच्या उत्पादन वाढवण्याच्या निर्णयाचा आणि संयुक्त अरब अमिरातीच्या गटातून बाहेर पडण्याचा भारतावर संमिश्र आणि महत्त्वपूर्ण परिणाम होईल. भारत आपल्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के आयात करतो. त्यामुळे आखाती देशांमधील प्रत्येक घडामोडीचा आपल्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. संयुक्त अरब अमिरातीने माघार घेतल्यानंतरही या गटाचा सहभाग कायम राहिल्यास किमती अनियंत्रित होण्यापासून रोखता येऊ शकते. भारताला कच्च्या तेलाच्या स्थिर किमती पेट्रोल आणि डिझेलच्या किमती नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल.

# 'ॲम्का'साठी आंध्रप्रदेशात ६०० एकर जमीन

## राज्य सरकारने दिली मंजुरी

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

देशाच्या पहिल्या स्वदेशी लढाऊ जेट ॲडव्हान्स्ड मिडियम कॉम्बॅट एअरक्राफ्ट अर्थात् ॲम्काच्या निर्मितीसाठी आंध्रप्रदेश सरकारने ६०० एकर जमिनीला मंजुरी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ॲम्काचा प्रकल्प श्री सत्य साई जिल्ह्यात उभारला जाणार आहे.



या प्रकल्पात अंतिम जुळवणी, मूळ प्रतिकृती तयार करणे, मैदानी चाचणी, फ्लाईट कॉम्प्लेक्स आणि वैज्ञानिकांसाठी घरांची उभारणी केली जाणार आहे. येथे जवळपास १४० ॲम्का स्टेल्थ विमाने तयार केली जातील. या प्रकल्पात जवळपास एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येण्याची अपेक्षा आहे. यात टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम, एल ॲण्ड टी आणि भारत फोर्जसारख्या खाजगी कंपन्या भागीदारीत का करतील. महत्त्वाचे म्हणजे,या प्रकल्पापासून हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेड अर्थात् एचएएलला दूर ठेवण्यात आले आहे. यात खाजगी क्षेत्राची भागीदारी वाढेल आणि काम वेगाने होईल.

प्रकल्पासाठी निवडलेली जागा बंगळुरूतील एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सीपासून जवळ आहे. त्यामुळे येथे प्राधान्य देण्यात आले. येथे अगोदरच ॲम्काची संरचना आणि विकासाचे काम सुरू आहे. या परिसरात हवाईपट्टीही असून, ती चाचणीसाठी उपयुक्त आहे. या प्रकल्पासाठी आंध्रप्रदेशाला प्राधान्य मिळावे, यासाठी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी २०२५ पासून प्रयत्न केले होते. आता कॅबिनेटने याला मंजुरी दिली.

या प्रकल्पामुळे भारताचे विदेशी लढाऊ जेट्सवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत मिळेल. खाजगी कंपन्यांच्या भागीदारीमुळे तंत्रज्ञानाचे हस्तांतरण वेगाने होईल आणि रोजगारातही भर पडेल. एकूणच हा प्रकल्प भारताच्या एअरोस्पेस उद्योगाला नवीन उंची देईल. (वृत्तसंस्था)

### ॲम्का स्टेल्थ फायटर नेमके काय?

ॲम्का हे भारताचे पाचव्या पिढीतील स्टेल्थ लढाऊ विमान आहे. शत्रूचे रडार या विमानाचा सहजासहजी मागोवा घेऊ शकणार नाही. यात अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुपरक्रूझ वेग, उत्कृष्ट एव्हियॉनिक्स आणि मल्टिरोल क्षमता आहे. हे विमान सुखोई-३० एमकेआय आणि राफेलपेक्षा जास्त प्रगत असेल. याची मूळ प्रतिकृती २०२७ पर्यंत तयार होणे अपेक्षित आहे.

# ॲमेझॉन इंडिया करणार २८०० कोटींची गुंतवणूक

## कर्मचारी सुविधा, डिलिव्हरी नेटवर्क करणार बळकट

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

ॲमेझॉन इंडियाने भारतातील आपल्या ऑपरेशन्स नेटवर्कचा विस्तार करण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षितता व कल्याणासाठी तब्बल २८०० कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. ही गुंतवणूक डिलिव्हरी सेवा अधिक जलद, सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्यासोबतच हजारो कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, विमा आणि सामाजिक सुरक्षेसाठी वापरली जाणार आहे, असे कंपनीने सांगितले.

ही गुंतवणूक भारतात २०३० पर्यंत ३५ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक करण्याच्या मोठ्या योजनेचा भाग आहे. या योजनेत व्यवसाय विस्तारासोबतच एआय आधारित डिजिटलायझेशन, निर्यात वाढ आणि रोजगार निर्मितीवर विशेष भर दिला जाणार आहे. ॲमेझॉनने भारतात आपले फुलफिलमेंट सेंटर्स, सॉर्टेशन सेंटर्स आणि डिलिव्हरी नेटवर्क आणखी मजबूत करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे देशातील मोठ्या शहरांसोबतच छोट्या शहरांमध्येही जलद डिलिव्हरी शक्य होणार आहे. कंपनी आपली क्विक कॉमर्स सेवा 'ॲमेझॉन नाऊ' देखील अधिक शहरांमध्ये विस्तारण्याच्या तयारीत आहे.

आमच्या नेटवर्कच्या केंद्रस्थानी कर्मचारी आहेत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षा, आरोग्य आणि आर्थिक स्थैर्यासाठी आम्ही मोठी गुंतवणूक करत आहोत, असे ॲमेझॉन इंडिया आणि ऑस्ट्रेलियाचे उपाध्यक्ष (ऑपरेशन्स) अभिनवसिंग यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### कर्मचाऱ्यांसाठी वातानुकूलित विश्रांती केंद्र

**कंपनीने कर्मचाऱ्यांच्या आरोग्य आणि कल्याणासाठी अनेक नवीन उपक्रम जाहीर केले आहेत. 'प्रोजेक्ट आश्रय'अंतर्गत डिलिव्हरी कर्मचाऱ्यांसाठी वातानुकूलित विश्रांती केंद्रांची संख्या वाढवली जाणार आहे. या केंद्रांमध्ये बसण्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छ प्रसाधनगृहे, मोबाइल चार्जिंग पॉईंट आणि प्राथमिक उपचार सुविधा असतील. सध्या दिल्ली, मुंबई, बेंगळुरू आणि चेन्नईसारख्या शहरांमध्ये ही सुविधा उपलब्ध आहे.**


# काका-पुतण्याचे मृतदेह सापडले

## बर्गी क्रूझ अपघातः मायलेकावर एकत्र अन्त्यसंस्कार

◆ **जबलपूर, ३ मे**

जबलपूरमधील बर्गी क्रूझ अपघातात बेपत्ता असलेल्यांपैकी दोघांचे मृतदेह सापडले आहे. रविवारी सकाळी काका कामराज आर. आणि त्यांचा पुतण्या मयूरनचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. हे दोघेही त्रिची (तामिळनाडू) येथून आले होते. या अपघातात आतापर्यंत १३ लोकांचा मृत्यू झाला आहे.





यापूर्वी शनिवारी सायंकाळी दोन मुलांचे मृतदेह सापडले होते. त्यापैकी एकाची ओळख श्रीतमिल कामराज आणि दुसऱ्याची विराज कृष्ण सोनी, अशी झाली होती. अपघाताच्या दिवशी ३० एप्रिलला ४ मृतदेह, दुसऱ्या दिवशी ५, तिसऱ्या दिवशी २ आणि चौथ्या दिवशी रविवारी दोन मृतदेह सापडले आहेत. मृतकांमध्ये ४ मुले आणि ८ महिलांचा समावेश आहे.

दरम्यान, धरणात दिल्लीतील मधूर मसीह, त्यांची कन्या मैरीना आणि नातू त्रिशान यांचा मृत्यू झाला. मैरीनाने आपल्या चार वर्षांचा पुत्र त्रिशानला छातीशी बांधले होते आणि त्याच स्थितीत मायलेकाचे मृतदेह आढळले. या घटनेने देश हळहळला. या मायलेकांवर रविवारी द्वारका येथील दफनभूमीत अंन्त्यसंस्कार करण्यात आले. दोघांचेही मृतदेह एकाच शवपेटीत ठेवण्यात आले. (वृत्तसंस्था)

# भारत ठरणार गुंतवणुकीचा महाकुंभ

## पाच वर्षांत ७६ लाख कोटींची उलाढाल

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

जागतिक कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आणि मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक ब्रोकरेज फर्म मॉर्गन स्टॅनलेने भारतीय अर्थव्यवस्थेवर एक अत्यंत सकारात्मक अहवाल प्रसिद्ध केला आहे. मॉर्गन स्टॅनलेच्या मते, सध्याचे संकट भारतासाठी दीर्घकालीन गुंतवणुकीच्या वाढीची एक संधी बनू शकते. अहवालानुसार, भारताचे गुंतवणूक ते जीडीपी गुणोत्तर पूर्वीच्या ३६.५% च्या अंदाजावरून वाढून आर्थिक वर्ष २०३० पर्यंत ३७.५% पर्यंत पोहोचू शकते. याचा अर्थ पुढील ५ वर्षांत अंदाजे ८०० अब्ज डॉलर्स (७६ लाख कोटी रुपये) अतिरिक्त भांडवली गुंतवणूक होईल, असा दावा करण्यात आला आहे.

ब्रोकरेज फर्मच्या मते, हे गुंतवणूक चक्र भारतीय शेअर बाजाराला लक्षणीयरीत्या मजबूत करेल. जीडीपीमध्ये कॉर्पोरेट नफ्याचा वाटा वाढेल. यामुळे कॉर्पोरेट कमाईमध्ये १५% पेक्षा जास्त सीएजीआर होऊ शकतो. या गतीमुळे आर्थिक वर्ष २०२१ पर्यंत भारतीय बाजारपेठ तिच्या कमाईच्या १० पटींपर्यंत पोहोचू शकते, असा अंदाजही मॉर्गन स्टॅनलेने वर्तवला आहे.

### ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या ८५ टक्के आणि नैसर्गिक वायूच्या ५० टक्के गरजा आयात करतो. मध्य-पूर्वेतील संकटाने या अवलंबित्वातील धोके अधोरेखित केले आहेत. सरकार आता सामरिक तेल साठ्यांचा विस्तार करणे. देशांतर्गत कोळसा उत्पादन आणि गॅसिफिकेशनला प्रोत्साहन देणे. नूतनीकरणक्षम ऊर्जा आणि ग्रीड पायाभूत सुविधांना गती देणे, यावर काम करत आहे.

भारताचे उद्दिष्ट आर्थिक वर्ष २०३१ पर्यंत संरक्षण खर्च जीडीपीच्या २% वरून २.५% पर्यंत वाढवणे आहे. हा उपक्रम खाजगी क्षेत्राचा सहभाग आणि मेड इन इंडिया शस्त्रांवर लक्ष केंद्रित करत आहे. डेटा लोकलायझेशन धोरणे आणि जागतिक अनिश्चिततेमुळे जागतिक कंपन्या त्यांच्या डेटा पायाभूत सुविधा भारतात आणत आहेत. भारताची डेटा सेंटर क्षमता आर्थिक वर्ष २०३१ पर्यंत सध्याच्या १.८ गिगावॅटवरून १०.५ गिगावॅटपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. (वृत्तसंस्था)

# जन्मदात्याचा गतिमंद मुलीवर अत्याचार

**लातूर** : जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातून बाप -लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. जन्मदात्या बापानेच आपल्या अल्पवयीन गतिमंद मुलीवर वारंवार अत्याचार केल्याची घटना उघडकीस आल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. धक्कादायक म्हणजे, पीडित मुलगी गर्भवती आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने १७ एप्रिलला जळकोट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अज्ञात व्यक्तीकडून मुलीवर अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, पीडित मुलगी सुमारे १९ आठवडे २ दिवसांची गर्भवती असल्याचे समोर आले होते.




### माननीय राष्ट्रीय अध्यक्षजी...

**भाजपा** हा पार्टी विथ डिफरन्स म्हणजे अन्य पक्षांपेक्षा वेगळा पक्ष म्हणून ओळखला जातो. भाजपाची शिस्त आणि कार्यसंस्कृती ही वेगळीच आहे. या पक्षात राष्ट्रीय अध्यक्षांचे वेगळे महत्व आणि स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यामुळे नितीन नवीन यांची जे.पी. नड्डा यांच्या जागेवर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्यावर नितीन नवीन माझेही अध्यक्ष आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणे सांगितले. तसे पाहिले तर नवीन हे पक्षात अनेक नेत्यांना खूप ज्युनियर आहेत. पण अध्यक्ष झाल्यानंतर त्यांचा आणि त्याच्या पदाचा मान राखण्याचे निर्देश पक्षांच्या सर्व नेत्यांना देण्यात आले. कोणीही नवीन यांचा उल्लेख माननीय नितीनजी वा माननीय नवीनजी असा करु नये तर माननीय अध्यक्षजी असा करावा, असे सगळ्यांना सांगण्यात आले. भाजपाचे सर्व ज्येष्ठ नेते या निर्देशांचे पालनही करतात,

आपचे सात राज्यसभा सदस्य काही दिवसांपूर्वी भाजपात सहभागी झाले, त्यानंतर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांना भेटण्यासाठी राघव चढ्डा आणि अन्य आप खासदार भाजपा मुख्यालयात आले. नवीन यांच्या भेटीच्या वेळी बोलतांना राघव चढ्डा यांनी त्यांचा उल्लेख माननीय नितीन नवीन जी असा केला. असे दोनतीन वेळा झाले, त्यामुळे भाजपा महासचिव तरुण चुग यांनी अतिशय सौम्य शब्दात नितीन नवीन यांचा उल्लेख माननीय अध्यक्षजी असा करण्याची सूचना चढ्डा यांना केली. पहिल्या दिवशीच आप आणि भाजपात काय फरक असल्याचे राघव चढ्डा आणि अन्य आप खासदारांना कळून आले.

●● ●●

### अखिलेश यादव आणि आ. अनुपमा जायस्वाल जुगलबंदी

**लोकसभा** तसेच विधानसभांत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत फेटाळले गेल्यानंतर भाजपाने देशभर नारी शक्ती वंदन अभियान राबवले. भाजपाने आपल्या महिला मंत्री, आमदार आणि खासदार यांच्या नेतृत्वात देशभर निदर्शने केली, या विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या नेत्यांचे पुतळे जाळण्यात आले. उत्तरप्रदेशातील बहराईच येथे भाजपा आमदार अनुपमा जायस्वाल यांच्या नेतृत्वात भाजपा महिला आघाडीने सपानेते अखिलेश यादव यांचा पुतळा जाळण्याचा प्रयत्न केला. पुतळा जाळतांना अचानक आ. जायस्वाल भाजल्या गेल्या, त्यांना तातडीने गुरुग्रामच्या मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांच्यासह अनेक भाजपा नेत्यांनी त्यांची भेट घेतली. मात्र ज्यांचा पुतळा जाळण्याचा अनुपमा जायस्वाल यांनी प्रयत्न केला, ते सपानेते अखिलेश यादव यांनी मेदांता रुग्णालयात जात आ. जायस्वाल यांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केले. राजकारण आपल्या जागी आहे, मानवी संबंध एका जागी, सद्भाव आणि सौहार्द कायम राहावे, अशी आमची भूमिका असल्याचे यादव म्हणाले. समाजात आग लागावी, असे आम्हाला वाटत नाही, समाजात सौहार्दाचा वर्षाव व्हावा, असे आम्हाला वाटते, सकारात्मक राजकारणाच्या स्वस्थ परंपरेने आम्हाला हेच शिकवले आहे, त्यामुळेच मी आ. अनुपमा जायस्वाल यांना भेटायला आलो, असे अखिलेश यादव यांनी म्हटले.

आ. अनुपमा जयस्वाल यांनी भेटीबद्दल अखिलेश यादव यांना धन्यवाद देतांना आशा आहे, महिला आरक्षणाबाबतच्या तुमच्या पक्षाच्या भूमिकेत बदलही होईल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. मातृशक्तीचा अधिकार आणि सन्मानासाठी वेळ पडली तर माझ्या प्राणाचे बलिदान द्यायलाही मी तयार असल्याचे आ. जायस्वाल यांनी म्हटले.

●● ●●

### दिग्विजयसिंह बदलले, हिंदुत्ववादी झाले...

**काँग्रेसचे** ज्येष्ठ नेते आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह हे तसे आपल्या हिंदुत्वविरोधी भूमिकेसाठी ओळखले जातात. आपल्या वादग्रस्त विधानाने ते नेहमीच वाद निर्माण करत होते. कोणत्याही कारणाने चर्चेत राहण्याची हातोटी त्यांना साधली होती. अशा या दिग्गीराजाचा राज्यसभा सदस्य म्हणून कार्यकाळ संपला आहे, ते तिसऱ्यांदा पुन्हा राज्यसभेवर येऊ शकत नाही, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे दिग्गीराजा आता काय करणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

दिग्विजयसिंह यांनी एकेकाळी अयोध्यातील राममंदिराच्या प्राणप्रतिष्ठेला विरोध केला होता, तसेच रामललाच्या मूर्तीवरही आक्षेप घेतला होता. रामललाची मूर्ती ही बालरुपातील नसल्याचा त्यांचा दावा होता. त्याच दिग्विजयसिंह यांनी यावर्षीच्या रामनवमीला अयोध्येला भेट देत रामलला तसेच हनुमानगढीचे दर्शन घेतले होते. रामललाच्या दर्शनाला जातांना सिंह यांनी कपाळाला टिळा लावला होता, तर गळ्यात रामाचे चित्र असलेला भगवे उपरणे होते. रामाचे बोलावणे येते, तेव्हा ती व्यक्ती अयोध्येकडे खेचली जातो, असे ते म्हणाले होते.

तर अशा रामभक्त झालेल्या दिग्गीराजांनी राघोगड या आपल्या गावात १८ मे २८ मे या काळात १५१ कुंडीय श्रीराम महायज्ञाचे आयोजन केले आहे. यासोबत वेदपुराण, श्रीमतभागवत तसेच श्री रामचरित्रमानसचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी त्यांनी देशातील चारही पीठाच्या शंकराचार्यांना तसेच देशभरातील अनेक मान्यवरांना आमंत्रित केले आहे, यात रामकथा वाचक आणि प्रसिध्द कवी कुमार विश्वास यांचाही समावेश आहे. आयुष्यभर हिंदुत्वाला शिव्या देणाऱ्या दिग्विजयसिंह यांच्यात आयुष्यात उत्तरार्धात झालेला हा बदल सगळ्यांना आश्चर्यचकित करणारा म्हणावा लागेल.

●● ●●

### विधानसभेत महिला पदाधिकाऱ्यांची हॅट्ट्रिक

**दिल्ली** विधानसभेने नारी शक्ती वंदन अधिनियमावर चर्चा करण्यासाठी एक दिवसाचे विशेष अधिवेशन बोलावले होते. या अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणजे सभागृहात सभापती, मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते या तीनही पदावर महिलाच विराजमान होत्या. दिल्लीत मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते या दोन प्रमुख पदावर महिला आहेत, रेखा गुप्ता या दिल्लीच्या मुख्यमंत्री आहेत, तर आतिशी या विरोधी पक्षनेत्या. दिल्ली विधानसभेचे सभापती विजेंदर गुप्ता यांनी त्या दिवसाचे सभागृहाचे कामकाज चालवण्यासाठी भाजपाच्या ग्रेटर कैलाशच्या आमदार शिखा रॉय यांना आमंत्रित केले. राखी बिर्ला आणि वंदनाकुमारी या विधानसभेच्या उपसभापती होत्या, पण दिल्ली विधानसभेच्या इतिहासात आतापर्यंत एकही महिला सभापती झाली नाही. विजेंदर गुप्ता यांनी एक दिवसासाठी का होईना शिखा रॉय यांना सभापतिपदावर बसवत महिलांचा सन्मान केला.

● **दिल्लीवाला**




मणिपूर हिंसाचाराला तीन वर्षे झाली. राज्यातील कुकी नार्को दहशतवाद संपवा आणि शांतता निर्माण करा, अशी मागणी करीत महिलांनी रविवारी नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केले

# शिपायाचा महाप्रताप, सरकारला लावला पाच कोटींचा चुना

## दोन पत्नींसह सासू व सात महिलांच्या नावे पैसे हस्तांतरित

◆ **पिलिभीत, ३ मे**

उत्तर प्रदेशातील पिलिभीतमध्ये एका शिपायाचा महाप्रताप समोर आला आहे. जिल्हा शाळा निरीक्षक कार्यालयात कार्यरत एका वर्ग ४ कर्मचाऱ्याबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या ठगबाज शिपायाने बनावट लाभार्थी तयार करुन सरकारी खात्यातून दोन वर्षांत तब्बल पाच कोटी रुपये हडपले आहेत. या महाठगाने ही रक्कम त्याच्या दोन पत्नींसह सासू व सात महिला नातेवाईकांच्या नावे हस्तांतरित केली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी सात महिलांना अटक केली आहे. इल्हम उर रहमान शम्सी, असे आरोपी शिपायाचे नाव आहे.



या ठगबाज शिपायावर कर्मचाऱ्यांची पगार बिले आणि टोकन तयार करण्याची जबाबदार होती. प्रत्यक्षात, एका इंटर कॉलेजमध्ये शिपाई असलेला इल्हम उर हा डीआयओएस कार्यालयात कार्यरत होता. त्याने सहजपणे हा भ्रष्टाचार केला. इल्हमने बनावट लाभार्थी ओळखपत्र तयार करून २०२४ ते २०२६ दरम्यान एका सरकारी खात्यातून तब्बल ५ कोटी रुपये हडपले.

पोलिस उपअधीक्षक विक्रम दहिया यांनी सांगितले की, जिल्हा शाळा निरीक्षक राजीव कुमार यांनी १३ फेब्रुवारीला यासंदर्भात कोतवाली पोलिसात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत शिपाई इल्हम उरवर बनावट लाभार्थी ओळखपत्रे तयार करणे आणि ट्रेझरी सिस्टीमचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. १२ सप्टेंबर २०२४ पासून आजपर्यंत इल्हमने ९८ व्यवहारांद्वारे त्याची पत्नी अर्शी खातूनच्या खात्यात १,०१,९५,१३५ चा अपहार केला होता. जेव्हा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असता ही धक्कादायक तथ्ये समोर आली. (वृत्तसंस्था)

### ५,५०,५४,५९४ रुपये गोठवले

**पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत ५३ संशयास्पद खात्यांमधील अंदाजे ५,५०,५४,५९४ रुपये गोठवले आहेत. आरोपीने नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांच्या खात्यांमध्ये मोठी रक्कम हस्तांतरित केली होती. यात पहिली पत्नी लुबनाच्या खात्यात २.३७ कोटी रुपये, दुसरी पत्नी अझाराच्या खात्यात २.१२ कोटी रुपये, मेहुणी फातिमा नवीच्या खात्यात १.०३ कोटी रुपये, दुसरी मेहुणी अफियाच्या खात्यात ८० लाखांहून अधिक रुपये, सासू नाहिदच्या खात्यात ९.५ दशलक्ष रुपये, ओळखीची परवीन खातूनच्या खात्यात ४.८ दशलक्ष रुपये आणि आशकारा परवीनच्या खात्यात ३.८ दशलक्ष रुपये हस्तांतरित केल्याचा समावेश आहे.**



मला डॉक्टर व्हायचं होतं, परंतु मार्क कमी मिळाले म्हणून मी अॅडमिशन घेतली नाही. प्रीतम ताईंना वकील व्हायचं होतं, परंतु त्या डॉक्टर झाल्या. येसू ताई वकील झाल्या. धनु भाऊ मात्र भाग्यवान आहेत, त्यांना राजकारणी व्हायचं होतं आणि ते राजकारणातच आले.
**- पंकजा मुंडे**, मंत्री


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

**सोलापूर,** सोमवार, ४ मे २०२६ ३


आमच्यावर कितीही केसेस दाखल झाल्या तरी आम्हाला त्याची भीती नाही. आम्हाला नोकऱ्या लागणार नाहीत. जे व्हायचंय ते होऊ द्या. सर्व समाजातील लोक एकत्र गुण्यागोविंदाने राहतात. फक्त दोन-चार लोक चुकीचे वागतात म्हणून संपूर्ण समाजाला दोष देणे चुकीचे आहे.
**- मनोज जरांगे पाटील,** मराठा आंदोलक



## एसीच्या स्फोटामुळे इमारतीला आग



# दिल्लीत होरपळून नऊ जणांचा मृत्यू



◆ **नवी दिल्ली, ३ मे**

**दिल्लीच्या विवेक विहारमधील एका चार मजली इमारतीला रविवारी पहाटे लागलेल्या आगीत किमान नऊ जण होरपळून ठार, तर चार जण यात गंभीर जखमी झाले आहेत. वातानुकूलन यंत्राच्या (एसी) स्फोटामुळे ही आग लागल्याचा प्राथमिक निष्कर्ष काढण्यात आला.**

भीषण आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे १२ बंब घटनास्थळी पाठवण्यात आले. आगीत मृत्युमुखी पडलेल्या नऊ जणांपैकी पाच जणांचे मृतदेह इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून बाहेर काढण्यात आले. इतर तीन मृतदेह जिन्यात सापडले. पहिल्या मजल्यावर एका व्यक्तीचा मृतदेह सापडला आहे.

पहिल्या मजल्यावर मृत्युमुखी पडलेल्यांत शिखा जैन यांचा समावेश आहे. दुसऱ्या मजल्यावर अरविंद जैन, अनिता जैन, निशांत जैन, आंचल जैन आणि एक वर्षाच्या मुलाचा मृतदेह सापडला. तिसऱ्या मजल्यावर नितीन जैन, शैली जैन यांचा मृत्यू झाला. सम्यक जैन, नवीन जैन हे जखमी झाले आहेत. या आगीत चार पुरुष, चार महिला आणि एका बालकाचा मृत्यू झाला आहे.

इमारतीतून १२ पेक्षा जास्त लोकांची सुटका करण्यात आली. येथील मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली. इमारतीला आग लागल्याची माहिती प्रशासनाला पहाटे ३.४७ वाजताच्या सुमारास मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाचे बंब लगेच पोहोचले.

इमारतीच्या दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावरील अर्पाटमेंटला आग लागली. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू करण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी दिली. आगीचे नेमके कारण समोर आलेले नाही.

या घटनेवर संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी दुःख व्यक्त केले. जखमींच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी प्रार्थना केली. दिल्लीचे नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी पीडितांच्या कुटुंबीयांबद्दल शोक व्यक्त केला. अधिकाऱ्यांना जखमींना सर्व आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याचा निर्देश दिला आहे, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### अतिशय दुःखद घटना : रेखा गुप्ता

**ही घटना अत्यंत दुःखद आहे, असे दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दुर्घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले आणि जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला. जखमींवर उपचार सुरू आहेत आणि ते लवकरात लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना करते. अधिकारी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत आणि शक्य ती सर्व मदत उपलब्ध करीत आहेत, असे रेखा गुप्ता यांनी सांगितले.**

## सीवानमध्ये चकमकीत कुख्यात सोनू यादव ठार

◆ **सीवान, ३ मे**

बिहारमधील सीवान जिल्ह्यातील बहुचर्चित हर्ष सिंह हत्याकांड प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत मुख्य आरोपी सोनू यादव याला रविवारी सकाळी झालेल्या चकमकीत ठार केले. हुसैनगंज परिसरातील सरैया गावात ही चकमक झाली असून, या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात पुन्हा एकदा तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

२९ एप्रिल रोजी सीवानमध्ये झालेल्या एका किरकोळ वादातून भाजपचे माजी आमदार मनोज सिंह यांचे भाचे हर्ष सिंह यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता. आंदर ढाला उड्डाणपुलाजवळ झालेल्या या घटनेत हर्ष सिंह यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे वडील गंभीर जखमी झाले होते. गाडीच्या किरकोळ धक्क्याच्या वादातून हा वाद सुरू झाला होता. हल्ल्याचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. मुख्य आरोपी सोनू यादव याच्यावर २५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यांमध्ये दहा पेक्षा अधिक गंभीर गुन्हे आहेत. (वृत्तसंस्था)

# एनसीबीचे दोन अधिकारी निलंबित

### बीएसएफ कॉन्स्टेबलचे कोठडी मृत्यू प्रकरण

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

एका बीएसएफ कॉन्स्टेबलचा १९-२० मार्चच्या रात्री कोठडीत झालेल्या मृत्युप्रकरणी माकपदार्थ नियंत्रण विभाग अर्थात् एनसीबीच्या अंतर्गत कार्यरत एक तपास अधिकारी आणि सहाय्यक संचालकाला निलंबित करण्यात आले, अशी माहिती सूत्रांनी रविवारी दिली.

या दुर्दैवी घटनेत बीएसएफ कॉन्स्टेबल जसविंदरसिंगचा समावेश होता. हृदयविकाराच्या दोन झटक्यांनंतर पल्स हॉस्पिटलमध्ये उपचार घेताना त्याचा मृत्यू झाला होता. अमृतसरमध्ये दाखल झालेल्या एका गुन्ह्याशी संबंधित तपासासंदर्भात एनसीबीने सिंगला जम्मूमध्ये अटक केली होती आणि त्याला पंजाबमधील अमृतसर येथे नेले जात होते. रिमांड अर्जात त्याचे पंजाबशी असलेले संबंध अधोरेखित करून जम्मूतील विशेष एनडीपीएस न्यायाधीशांनी त्याला कोठडीत पाठवले होते.

सिंग कथितपणे पाकिस्तानातील सूत्रधारांशी दोन व्हर्च्युअल नंबरच्या संपर्कात होता. बीएसएफमध्ये कॉन्स्टेबल असलेल्या त्याच्या एका साथीदाराला एनसीबीच्या दोन प्रकरणांमध्ये आणि पंजाब पोलिसांसोबत मादकपदार्थांशी संबंधित चार पकरणांमध्ये अटक करण्यात आली आहे.

जम्मूहून आणत असताना सिंगला छातीत तीव्र वेदना होऊ लागल्या. थोडे पाणी प्यायल्यावर त्याची प्रकृती सुधारली. एनसीबी पथक १९ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास अमृतसरला पोहोचले. रात्री पावणेदहा वाजताच्या सुमारास त्याच्या छातीत पुन्हा दुखू लागले. त्याला रात्री दहा वाजता पल्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. वैद्यकीय प्रयत्नांनंतरही त्याला हृदयविकाराचे दोन झटके आले आणि शेवटी २० मार्च रोजी पहाटे त्याचा मृत्यू झाला होता. (वृत्तसंस्था)

# बैजयंत पांडा सार्वजनिक उपक्रम समितीचे अध्यक्ष

### के. सी. वेणुगोपाल यांच्याकडे लोकलेखा

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज विविध सांसदीय समित्यांच्या अध्यक्षांची घोषणा केली. भाजपाचे बैजयंत पांडा यांची सार्वजनिक उपक्रम समितीचे तर काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल यांची लोक लेखा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली.

ओम बिर्ला यांनी २०२६ २७ या वर्षासाठी पांडा यांची सार्वजनिक उपक्रम समितीचे तर वेणुगोपाल यांची संसदेच्या लोकलेखा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. सामान्यपणे लोकलेखा समितीचे अध्यक्ष हे लोकसभेतील विरोधी पक्षनेते असतात. पण विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या समितीचे अध्यक्षपद न स्वीकारता ते



बैजयंत पांडा



के. सी. वेणुगोपाल

वेणुगोपाल यांच्याकडे देण्याची सूचना केली.

वेणुगोपाल यांची लोकलेखा समितीचे अध्यक्ष म्हणून फेरनिवड झाली आहे. १ मे २०२६ ते ३० एप्रिल २०२७ या काळासाठी ही नियुक्ती आहे. लोकलेखा समितीत २१ सदस्य असतात, यातील १५ सदस्य लोकसभेचे तर ६ सदस्य राज्यसभेचे असतात. बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वातील सार्वजनिक उपक्रम समितीत २२ सदस्य असून यातील १५ लोकसभेचे तर ७ राज्यसभेचे आहेत.

भाजपाचे फग्गनसिंह कुलस्ते यांना अनुसूचित जाती आणि जमाती समितीच्या अध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले असून या समितीत ३० सदस्य असतात. यात लोकसभेच्या २० तर राज्यसभेच्या १० सदस्यांचा समावेश असतो. भाजपाचे संजय जयस्वाल यांनी प्राकलन समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. या समितीतही ३० सदस्य असतात, त्यातील लोकसभेच्या २० तर राज्यसभेच्या १० सदस्याचा समावेश असतो. (तभा वृत्तसेवा)

## ड्रग्ज प्रकरणातील आरोपीला अटक

**मुंबई** : मुंबईत विद्यार्थ्यांना पार्टीत मादक पदार्थ पुरवणाऱ्या प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी महेश खेमलानी याला वनराई पोलिसांनी अटक केली. तो काही दिवसांपूर्वी देशाबाहेर पळून गेला होता. पण १ मे रोजी तो मुंबई

विमानतळावर येताच त्याला अटक केली आहे. नेस्को येथील कार्यक्रमात मद्य आणि मादक पदार्थांच्या अतिसेवनामुळे दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर महेश खेमलानीवर संशय आल्याने तो मिरा रोडवरून थेट बँकॉकला पळून गेला. त्याला पकडण्यासाठी मुंबई पोलिसांनी देशातील सर्व विमानतळांवर लूकआऊट नोटीस जारी केली होती.

# हशीश तेल करण्याचे ८०० लिटर रसायन जप्त

◆ **भुवनेश्वर, ३ मे**

ओडिशा पोलिसांनी रविवारी मलकानगिरी जिल्ह्यातील एस्सार चक्कजवळ एका वाहनातून हशीश तेल तयार करण्यासाठी वापरली जाणारी जवळपास ८०० लिटर रसायने आणि सॉल्व्हंट्स जप्त केले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

वाहनातून सुमारे ५० किलो गांजा आणि दोन लिटर हशीश तेलही जप्त करण्यात आले असून, वाहनच चालक पळून जाण्यात यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले. तस्करांनी चित्रकोंडा परिसरात हशीश तेल उत्पादन युनिट स्थापन करण्याची योजना आखली होती. परंतु, पोलिसांची नजर असल्याने ते तसे करू शकले नाहीत, असा दावा त्यांनी केला.

पोलिसांच्या तपासणीपासून वाचण्यासाठी त्यांना वाहनाच्या आत एक प्रोसेसिंग युनिट स्थापन केले. यात बनावट नंबर प्लेट होती, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. सुमारे ८०० लिटर रसायने हशीश तेल तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सॉल्व्हंट्सशिवाय ते काढण्यासाठी उपयुक्त असलेली उपकरणेही वाहनातून जप्त करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या चालक आणि इतर व्यक्तींना पकडण्यासाठी पथके तयार करण्यात आली आहेत, असे मलकानगिरीचे पोलिस अधीक्षक विनोद पाटील यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### मिस्टर परफेक्टचा ‘एक दिन’




**मुंबई** : आमिर खान प्रॉडक्शन्सचा आगामी चित्रपट ‘एक दिन’ सध्या सिनेप्रेमींमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. एक नाजूक, मनाला भिडणारी आणि जादुई प्रेमकथा म्हणून ओळखली जाणारी ही फिल्म तिच्या आकर्षक ट्रेलर आणि सुरेल गाण्यांमुळे लोकांच्या पसंतीस उतरली आहे. या चित्रपटात जुनैद खान एका अत्यंत लाजाळू मुलाचा रोल साकारत आहे, जो साई पल्लवी साकारत असलेल्या आत्मविश्वासू आणि मिसळखोर मुलीच्या प्रेमात पडतो. विशेष म्हणजे, आमिरला ही कथा त्याच्या स्वतःच्या स्वभावाशीही जोडलेली वाटते. ‘एक दिन’ या चित्रपटाद्वारे आमिर खान आणि मंसूर खान ही गाजलेली जोडी पुन्हा एकत्र आली आहे. याआधी त्यांनी ‘कयामत से कयामत तक’ आणि ‘जो जीता वही सिकंदर’ सारखे क्लासिक चित्रपट दिले आहेत. या चित्रपटात साई पल्लवी आणि जुनैद खान मुख्य भूमिकेत असून सुनील पांडे यांनी दिग्दर्शन केले आहे. हा चित्रपट आज, १ मे २०२६ रोजी प्रदर्शित झाला आहे.

### हिट है भाई ‘राजा शिवाजी’

**मुंबई** : रितेश देशमुख दिग्दर्शित आणि अभिनीत ऐतिहासिक चित्रपट ‘राजा शिवाजी’ १ मे रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला असून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित या चित्रपटाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महाराजांच्या जीवनातील संघर्ष, युद्धनीती आणि स्वराज्य स्थापनेचा थरार मोठ्या पडद्यावर प्रभावीपणे सादर करण्यात आल्याने चित्रपट चर्चेत आला आहे. या चित्रपटात रितेश देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली असून, बॉलिवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक नामांकित कलाकारांनीही महत्त्वाच्या भूमिका निभावल्या आहेत. संजय दत्त, अभिषेक बच्चन यांसारख्या कलाकारांच्या सहभागामुळे चित्रपटाची भव्यता अधिक वाढली आहे. तर अजय-अतुल या संगीतकार जोडीने दिलेल्या संगीतामुळे चित्रपटातील भावनिक आणि युद्धदृश्यांना अधिक प्रभावीपणा लाभला आहे.



### ग्लॅमर सोडून अध्यात्माचा स्वीकार

**मुंबई** : टीव्ही आणि मनोरंजन क्षेत्रात काम करून ओळख निर्माण केलेली अन्ना जयसिंघानी हिने अभिनय क्षेत्राला अलविदा करत पूर्णपणे अध्यात्माचा मार्ग स्वीकारला आहे. आता ती भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीत लीन असून वृंदावन येथे वास्तव्यास आहे. या निर्णयानंतर तिने आपले नाव बदलून अन्ना परी हरिवंशी असे ठेवले आहे. अन्नाने आपल्या आध्यात्मिक प्रवासाची माहिती स्वतःच्या ‘मेरो वृंदावन’ या यूट्यूब चॅनलवर शेअर केली आहे. ग्लॅमरच्या जगातून बाहेर पडत तिने भक्तिमार्ग स्वीकारल्याने तिचा हा बदल चर्चेचा विषय ठरत आहे. `ग्वाल्हेर येथील अन्नाला लहानपणापासून नृत्य आणि अभिनयाची प्रचंड आवड होती.



# धावत्या विमानातून प्रवाशाने मारली उडी

### चेन्नई विमानतळावरील धक्कादायक घटना

◆ **चेन्नई, ३ मे**

चेन्नई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी पहाटे एका प्रवाशाने धावत्या विमानाचा आपत्कालीन दरवाजा अचानक उघडून उडी मारल्याने प्रचंड खळबळ उडाली. शारजाहहून चेन्नईला आलेल्या एअर अरेबियाच्या विमानात २३१ प्रवासी होते. एका प्रवाशाच्या धाडसी आणि धोकादायक कृत्यामुळे विमानात असलेल्या प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. सुरक्षा दलांनी तात्काळ प्रतिसाद देत एक मोठी दुर्घटना टाळली.

मिळालेल्या माहितीनुसार, विमान उतरल्यानंतर मुख्य धावपट्टीवरून टॅक्सीवेवर (धावपट्टी आणि टर्मिनलला जोडणारा मार्ग) जात असताना ही धक्कादायक घटना घडली. अचानक, एका पुरुष प्रवाशाने आपत्कालीन दरवाजा उघडून धावत्या विमानातून उडी मारली. अचानक घडलेल्या घटनेमुळे विमानात घबराट पसरली आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या. पायलटने तात्काळ आपत्कालीन ब्रेक लावून विमान थांबवले आणि जमिनीवरील सुरक्षा पथकाला त्वरित सतर्क केले.

प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, विमान प्रवासादरम्यान त्या प्रवाशाची प्रकृती लक्षणीयरीत्या खालावली होती. विमानतळ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रवाशाने विमानात अस्वस्थ वाटते आणि उलट्या होत असल्याची तक्रार केली होती. (वृत्तसंस्था)



संयुक्त जनता दलाने बिहारमध्ये सद्भाव यात्रेचे आयोजन केले आहे. ही यात्रा राज्याच्या कानाकोपऱ्यात जाणार आहे. पूर्व चंपारण्य जिल्ह्यातील पिपरा कोठी येथे माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांचे स्वागत करताना कार्यकर्ते

# १९५ तिरंग्यांद्वारे जगाला शांतता-बंधुत्वाचा संदेश

### उदयपूरच्या डॉ. इक्बाल यांनी रचला जागतिक विक्रम

◆ **उदयपूर, ३ मे**

उदयपूरचे प्रसिद्ध सोनार डॉ. इक्बाल सक्का यांनी आपल्या अद्वितीय कौशल्याने पुन्हा एकदा देशाला गौरव मिळवून दिला आहे. जागतिक शांतता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यासाठी त्यांनी १९५ चांदीचे तिरंगा ध्वज तयार करून एक नवीन जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. विशेष म्हणजे, त्यांनी हे सर्व ध्वज केवळ १९५ मिनिटांत तयार केले, जे त्यांच्या सूक्ष्म कारागिरीचे आणि अनेक वर्षांच्या अनुभवाचे उत्तम उदाहरण आहे.

डॉ. सक्का यांच्या या अद्वितीय कामगिरीची रिपब्लिक बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे. एकाच वेळी १९५ ध्वज तयार करणारे ते पहिले कलाकार आहे. ही कामगिरी केवळ त्यांचे वैयक्तिक कौशल्यच दर्शवत नाही, तर उदयपूर आणि देशाच्या कला परंपरेला जागतिक ओळख मिळवून देते. डॉ. इक्बाल सक्का यांनी सांगितले की, जगभरातील १९५ देशांना शांतता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यासाठी त्यांनी हा उपक्रम सुरू केला आहे.




वाढता जागतिक तणाव, विशेषतः इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील सध्याची परिस्थिती पाहता, त्यांनी भारताच्या वतीने शांततेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, डॉ. सक्का यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती आणि गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. त्यांनी भारताला या देशांमध्ये शस्त्रसंधी घडवून आणण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

### ही देशासाठी अभिमानाची बाब

**ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ आणि आचार्य डॉ. मुकेश शर्मा यांनी डॉ. सक्का यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, ही संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब आहे. असे उपक्रम केवळ कलेला एक नवीन ओळखच देत नाहीत, तर जागतिक शांततेसाठी प्रेरणा म्हणूनही काम करतात.**

### आतापर्यंत २०० हून अधिक विक्रम प्रस्थापित

**विशेष म्हणजे, डॉ. इक्बाल सक्का यांनी आतापर्यंत २०० हून अधिक जागतिक विक्रम प्रस्थापित केले आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमध्ये इतकी सूक्ष्म सोन्याची साखळी तयार करण्याचा समावेश आहे. ती पाहण्यासाठी भिंगाची मदत घ्यावी लागते.**

## मुंबईत झाडांना मिळाला नवजीवनाचा श्वास

◆ **मुंबई, ३ मे**

मुंबईमध्ये पर्यावरण जपण्यासाठी राबवलेल्या ‘वृक्ष संजीवनी’ या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. या मोहिमेद्वारे शहरातील तब्बल १०७१ झाडांना काँक्रीटच्या जाचातून मुक्त करण्यात आले. अनेक वर्षांपासून झाडांच्या बुंध्याभोवती सिमेंट आणि काँक्रीटचा थर जमा झाला होता. त्यामुळे झाडांच्या मुळांना हवा, पाणी आणि पोषकद्रव्ये मिळत नव्हती. हा थर काढून टाकल्यामुळे आता झाडांना पुन्हा नैसर्गिकरीत्या वाढण्यास मदत होणार आहे. मुंबई महापालिकेच्या उद्यान विभागाने १ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ दरम्यान ही मोहीम राबवली. या काळात झाडांवर लावलेले खिळे, वायर आणि जाहिराती काढून टाकण्यात आल्या. झाडांमध्ये जाहिराती आणि केबल्स लावण्यासाठी ठोकलेले तब्बल ४,२४० खिळे काढण्यात आले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजापूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# काय चूक होती त्या लेकराची?

साडेतीन वर्षांची चिमुकली, अजून नीट जगही पाहिलं नव्हतं तिनं. आईच्या कुशीतून, खेळातून, निरागस हसण्यातून तिचं छोटंसं जग फुलत होतं. पण एका ६५ वर्षांच्या विकृत नराधमानं त्या कोवळ्या जीवावर अत्याचार केला आणि दगडानं ठेचून तिचं अवघं ४२ महिन्यांचं आयुष्य संपवलं. काय चूक होती त्या लेकराची? ती मुलगी होती, हीच का तिची चूक? माणूस म्हणून आपल्याला स्वतःचीच लाज वाटावी, अशी ही घटना पुणे जिल्ह्यातील नसरापुरात घडली. हजार टाचण्या काळजाला टोचल्यानंतर जशा असह्य वेदना होतात, तशाच वेदना कुठल्याही संवेदनशील माणसाला या घटनेनंतर जाणवायला हव्यात. दगडानं चिमुकलीला ठेचून तो नराधम जरी तुरुंगात गेला असला, तरी तिच्या रक्ताचे थेंब समाज म्हणून आपल्या प्रत्येकाच्या अंगावर उडालेले आहेतच. समाजातील कोणत्याही जाती, धर्माच्या माय-बापाला कायमची भयभीत, अस्वस्थ करणारी ही घटना आहे. यापुढे ही घटना इतिहासाच्या कुठल्यातरी पानावर असेल आणि अशा घटनांची गर्दी त्या पुस्तकात झालेली असेल. समाज आणि माणूस म्हणून आपल्या नैतिक पराभवाची ती जाहीर कबुली असेल. असे कलंक पुसण्यासाठी केवळ निषेध पुरेसा नसतो; न्याय, कठोरात कठोर शिक्षा आणि सामाजिक बदलांची मानसिकता आवश्यक असते. यंत्रणेने अशा नराधमाला लवकरात लवकर मृत्युदंडाची शिक्षा होईल, यासाठी मनापासून प्रयत्न करायला हवेत..

जुलै २०१६ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी येथे अल्पवयीन शाळकरी मुलीवर अत्यंत क्रूरपणे बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र संतापला, लाखोंचे मोर्चे निघाले आणि जलदगती न्यायालयात खटला चालवण्याची घोषणा झाली. घटनेनंतर सुमारे १७ महिन्यांनी, नोव्हेंबर २०१७ मध्ये जिल्हा व सत्र न्यायालयाने तिन्ही आरोपींना दोषी ठरवत फाशीची शिक्षा सुनावली. मात्र, खरा प्रश्न इथेच सुरू होतो, फाशीची शिक्षा सुनावली म्हणजे न्याय पूर्ण झाला का? अजिबात नाही. त्यानंतर उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, दयेचा अर्ज आणि अनेक कायदेशीर प्रक्रिया यामध्ये वर्षानुवर्षे निघून जातात. न्यायालयाचा निकाल आला, पण शिक्षेची अंतिम अंमलबजावणी वर्षानुवर्षे लांबली, तर कायद्याचा धाक समाजात कसा निर्माण होणार? दहा वर्षांचा काळ जाऊनही आरोपी कारागृहात जिवंत आहेत. फास्ट ट्रॅक न्यायालये केवळ राजकीय घोषणांसाठी असतात. मुळात न्याय आणि जलद ही आपल्या व्यवस्थेत विसंगती मानली जाते. आपल्या देशात 'जलद न्याय' ही फक्त घोषणा असते; प्रत्यक्षात मात्र न्यायाची पायरी चढता चढता पीडितांचे आयुष्यच संपते. न्यायप्रक्रियेतला विलंब म्हणजे पीडितेवर दुसऱ्यांदा अन्याय. एका अभागी मुलीवर झालेल्या अत्याचारानंतर तिचं कुटुंब धैर्याने न्यायालयात जातं, पण तिथे त्यांना मिळतो अपमान, थकवा आणि एक अंतहीन प्रतीक्षा.

न्याय मिळायला अशी वर्षानुवर्षे लागत असतील, तर 'जनतेच्या न्यायालयात द्या' अशी मागणी होणारच. नसरापुरातील घटनेनंतर नागरिकांच्या संतप्त प्रतिक्रिया स्वाभाविकच होत्या. आपल्या देशात न्याय ही गोष्ट कधीतरी मिळणारी आणि प्रचंड प्रतीक्षेत अडकलेली प्रक्रिया बनली आहे. पीडित कुटुंब न्यायासाठी झिजत राहते, तर आरोपी कायद्याच्या पळवाटा शोधत राहतात. अशा वेळी लोकांच्या मनात व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण होणारच. त्यामुळेच कायद्याचा धाक उरत नाही आणि संतापाचा उद्रेक रस्त्यावर दिसू लागतो. शासन आणि प्रशासन यांनी किमान अशा प्रकरणांमध्ये तरी संवेदनाशून्य न वागता तातडीने काम करण्याची आवश्यकता आहे. न्यायावरचा, यंत्रणेवरचा विश्वास उडाला की लोक अस्वस्थ होतात. प्रश्न केवळ न्यायव्यवस्थेचा नाही; प्रश्न समाजाच्या मानसिकतेचाही आहे. एखादी घटना घडली की आपण आरोपीला शिव्या देतो, संताप व्यक्त करतो; पण आपल्या घरात, आपल्या संस्कारांत, आपल्या बोलण्यात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती शुद्ध आहे, याचा विचार करतो का? मुलीला 'सावध राहा' सांगणारा समाज मुलाला 'संयम शिक' हे किती वेळा सांगतो? महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न फक्त पोलिस, न्यायालये किंवा शासनावर टाकून आपण मोकळे होऊ शकत नाही. विकृतीचा जन्म संस्कार, विचारांतून होतो. समाजाच्या गप्प राहण्यातूनही विकृती फोफावत असते. साडेतीन वर्षांच्या मुलीकडेही वासनेच्या नजरेने पाहणारा माणूस अचानक तयार होत नाही; तो विकृत संस्कारांतून तयार होतो. छोटे अपराध खपून जातात तेव्हा असे नराधम आकाराला येतात. घरात स्त्रीचा अपमान करणारे शब्द, मुलींवर बंधने आणि मुलांना मोकळीक, स्त्रीच्या स्वातंत्र्याकडे संशयाने पाहणारी दृष्टी, हे सगळे त्या विकृतीला खतपाणी घालतात. महिला सुरक्षा ही कायद्याची जबाबदारी नंतर आहे; सामाजिक संस्कारांची लढाई त्या आधी येते. महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारांची संख्या सातत्याने वाढत असून २०२२ मध्ये राज्यात महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांची तब्बल ४९,३३१ प्रकरणे नोंदवली गेली. २०२१ मध्ये ही संख्या ३९,५२६ होती. म्हणजेच अवघ्या एका वर्षात सुमारे १५ टक्क्यांनी वाढ झाली होती. याचा अर्थ, सरासरी दर तासाला सुमारे ५ गुन्हे महिलांविरुद्ध घडत होते. या वर्षात बलात्काराच्या २,९०४ प्रकरणांची नोंद झाली आणि यात महाराष्ट्र देशात चौथ्या क्रमांकावर होता. महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रमाण हे पती किंवा नातेवाईकांकडून होणाऱ्या क्रूरतेचे आहे. त्यानंतर अपहरण, विनयभंग आणि बलात्कार अशा घटना मोठ्या प्रमाणात आहेत. हे चित्र अधिक भयावह आहे, कारण अनेक प्रकरणे अजूनही पोलिसांपर्यंत पोहोचतच नाहीत. बलात्कार, छेडखानी, घरगुती हिंसा, बाल लैंगिक अत्याचार अशा घटनांची आकडेवारी म्हणजे आपल्या सामाजिक अपयशाच्या नोंदी आहेत. प्रत्येक घटनेनंतर मेणबत्त्या पेटतात, निषेधाचे मोर्चे निघतात, सोशल मीडियावर संताप व्यक्त होतो; पण काही दिवसांनी सर्व काही शांत होते. पीडितेच्या घरात दुःख कायम वास्तव्य करीत असते. बाकी लोक नव्या घटनेसाठी मेणबत्त्या पेटवण्याची वाट पाहत असतात आणि कायदा पुन्हा कागदपत्रांत आणि तारखांत हरवतो. समाज म्हणून आपण एवढे संवेदनाहीन झालो आहोत का? या प्रश्नाचा कधी तरी गांभीर्याने विचार व्हायला हवा. आपण स्वतःलाच विचारले पाहिजे की, आणखी किती चिमुकल्या मुलींवर अत्याचार झाले म्हणजे आपण समाज म्हणून कामाला लागू? घटना घडली की नेत्यांच्या भेटीगाठी, आश्वासने, कठोर कारवाईची भाषा आणि विरोधक-सत्ताधाऱ्यांमधील आरोप-प्रत्यारोप सुरू होतात. पीडित कुटुंबाला प्रत्यक्ष मदत, न्यायासाठी आवश्यक पाठबळ कोणाकडूनही मिळत नाही, हे वास्तव आहे. काळीज पिळवटून टाकणाऱ्या घटनाही राजकीय फायद्याच्या मोजपट्टीवर मोजल्या जातात. अत्याचारित मुलीच्या मृत्यूवरही राजकारण करणाऱ्या व्यवस्थेपेक्षा निर्लज्ज दुसरे काही असू शकत नाही. महिला सुरक्षेचा प्रश्न समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. आपली आई सुरक्षित नसेल, मुलगी सुरक्षित नसेल, तर कोणत्याही प्रगतीचा अभिमान निरर्थक आहे. विकासाच्या मोठ्या घोषणा, स्मार्ट सिटीची स्वप्ने आणि आधुनिकतेचे दावे तेव्हाच अर्थपूर्ण ठरतात, जेव्हा एका चिमुकलीला सुरक्षित जगण्याचा अधिकार मिळतो. नसरापुरातील त्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीसाठी आता आपण काहीच करू शकत नाही. तिचं बालपण, तिचं हसू, तिचं भविष्य, सगळं त्या दगडाखाली चिरडलं गेलं आहे. पण तिचा मृत्यू व्यर्थ जाऊ देऊ नये, ही जबाबदारी आपली सर्वांची आहे. तिच्या रक्ताचे डाग केवळ आरोपीच्या हातावर आहेतच; ते आपल्या आजपर्यंतच्या सामूहिक मौनावरही लागलेले आहेत. समाज म्हणून आता निर्णय घ्यावा लागेल, की आपण फक्त निषेध करणारे राहणार आहोत, की बदल घडवणारे नागरिक होणार आहोत? न्याय त्वरित, अतिशय कठोर आणि निर्विवाद झाला पाहिजे. विकृतीला सामाजिक बहिष्कारच मिळाला पाहिजे. मुलांना स्त्रीचा सन्मान शिकवणारे संस्कार इथल्या मातीत रुजायला हवेत. शासनाने 'फास्ट ट्रॅक'च्या घोषणांऐवजी प्रत्यक्ष न्यायाची हमी दिली पाहिजे. नाहीतर उद्या पुन्हा एखादी चिमुरडी मरेल, पुन्हा समाज संतापेल, पुन्हा राजकारण होईल आणि पुन्हा तोच प्रश्न उरेल, काय चूक होती त्या लेकराची?

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# दोन हत्तींच्या भांडणात...!

एक आफ्रिकन म्हण आहे, 'दोन हत्तींच्या भांडणात चिरडले जाते ते गवत.' वाळवंट आणि उंट असलेल्या आखाती देशांमध्ये हिरवेगार गवत नसले तरी कच्चे तेल व वायू याच्या भरवशावर या देशांमध्ये सुखसमृद्धीचा जो हिरवा मखमली गालिचा अंथरला गेला आहे, तो दोन हत्तींच्या म्हणजे अमेरिका व चीनच्या भांडणात उधडला जात आहे. एक योगायोग म्हणजे राष्ट्रपती ट्रम्प यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह हत्ती आहे आणि चीनमध्ये निवडणुका वगैरे होत नसल्याने राष्ट्रपती जिन पिंग हेच त्या देशाचे 'चिन्ह' मानले जाते.

**३ ट्रिलियन!** : ३ ट्रिलियन डॉलर! ३ वर १२ शून्य म्हणजे ३,०००,०००,०००,००० डॉलर. दोन हत्तींच्या या भांडणात जगाचे आजवर एवढे नुकसान होऊन गेलेले आहे. आणि नुकसानीचा हा आकडा किती वाढेल हे सांगण्याच्या स्थितीत कुणीही नाही. जागतिक दर्जाच्या काही आर्थिक संस्थांनी हा निष्कर्ष काढला आहे.

**भारताचा क्रमांक घसरला** : अमेरिका-इराण युद्ध सुरू होण्यापूर्वी भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर पोहोचत होती, ती आता सहाव्या क्रमांकावर घसरली आहे. ३१ ट्रिलियनच्या अर्थव्यवस्थेसह अमेरिका पहिल्या क्रमांकावर आहे तर १९ ट्रिलियन अर्थव्यवस्था असेलला चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. जर्मनी ४.७ ट्रिलियनसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. जपान चौथ्या, ब्रिटन पाचव्या क्रमांकावर आहे आणि भारत सहाव्या क्रमांकावर घसरला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे डॉलरच्या तुलनेत रुपयाची झालेली घसरण. युद्ध सुरू झाल्यापासून रुपयाची जी पडझड सुरू झाली त्याचा हा परिणाम मानला जातो. भारताला अधिक दराने कच्चे तेल व नैसर्गिक वायूची खरेदी करावी लागत आहे. याचा फटका सामान्य जनतेला बसत आहे. काही लहान उद्योग ठप्प झाले आहेत. मोठ्या उद्योगांनाही याची झळ बसेल अशी स्थिती तयार होत आहे.

**इराणचे नुकसान** : स्वाभविकच इराणचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. इराणमधून होणारी कच्च्या तेलाची निर्यात थांबली आहे. इराणच्या सर्वांत मोठ्या नैसर्गिक वायू उत्पादन प्रकल्पाला या युद्धाचा मोठा फटका बसला आहे. अमेरिका- इस्रायल यांच्या हल्ल्यात इराणमधील काही पायाभूत प्रकल्प उद्ध्वस्त झाले आहेत. त्यातील काहींची फेरउभारणी केल्याचा दावा इराणने केला आहे. मात्र इराणचे नुकसान हजारो कोटींच्या घरात आहे.

नव्या माहितीनुसार इराण कच्च्या तेलाचे उत्पादन तर करीत आहे, पण होर्मुझ बंद असल्याने त्याची तेल निर्यात थांबली आहे. दुसरीकडे तेल उत्पादन तर सुरू आहे. या तेलाची आणखी फक्त २२ दिवस साठवणूक करता येईल एवढीच इराणची क्षमता आहे. म्हणजे २२ दिवसांत होर्मुझ सुऐ न झाल्यास, इराणला आपले दैनंदिन तेल उत्पादन घटवावे लागेल. तेल उत्पादनात घट म्हणजे जागतिक तेल किमतीत वाढ.

**अमेरिकालाही नुकसान** : आखाती देशांमध्ये अमेरिकेचे जे लष्करी तळ होते, त्याला इराणने लक्ष्य केले होते. यात अमेरिकेचे मामुली नुकसान झाल्याचे प्रारंभी मानले जात होते. मात्र आता समोर आलेल्या नव्या माहितीनुसार या हल्ल्यांमुळे अमेरिकेचे हजारो कोटी डॉलर्सचे नुकसान झाले आहे. या तळांवर उभी असलेली अमेरिकेची अद्ययावत विमाने इराणच्या हल्ल्यात पार निकामी झाली असल्याचे आता मान्य केले जात आहे. याचाच परिणाम म्हणजे 'पेंटॉगॉन' या लष्करी मुख्यालयाने अमेरिकन काँग्रेसकडे काही लाख कोटींची मागणी केली आहे. यातील मोठी रक्कम आखाती देशातील नष्ट झालेले हवाई तळ दुरुस्त करण्यावर खर्च केली जाणार आहे.

**आखाती देशांचे नुकसान** : सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कतार, कुवैत व बहरीन या पाच देशांनाही या युद्धाचा मोठा फटका बसला आहे. कतारचे नैसर्गिक वायू उत्पादन केंद्राचे भरपूर नुकसान झाले असून ते पूर्ववत सुरू होण्यास किमान दोन वर्षे लागतील असा अंदाज वर्तविला जात आहे. याशिवाय संयुक्त अरब अमिरात म्हणजे दुबई व सौदी अरेबिया यांच्यातील पर्यटनाला या युद्धाचा मोठा फटका बसला आहे.

**दुहेरी नाकेबंदी** : अमेरिकेने होर्मुझची नाकेबंदी करून इराणची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे तर त्याला उत्तर म्हणून इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद करून साऱ्या जगाची आर्थिक नाकेबंदी केली आहे. या दोन नाकेबंदींच्या तडाख्यात जागतिक अर्थव्यवस्था सापडली आहे.

**व्यापक परिणाम** : होर्मुझची नाकेबंदी व आखाती देशांमधील लष्करी हालचालींमुळे जागतिक सागरी व्यापार वाहतुकीवर परिणाम झाला आहे. जहाज कंपन्यांचे व्यवहार एकतर ठप्प झाले आहेत वा कमी झाले आहेत. याचा परिणाम जहाज कंपन्यांच्या दरवाढीवर झाला आहे. स्वाभाविकच या जहाजांमधून पाठविल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमती वाढणार आहेत आणि त्याची झळ सरळसरळ सामान्य ग्राहकाला बसणार आहे.

**उद्योग प्रभावित** : नैसर्गिक वायूचा पुरवठा प्रभावित झाल्याने अनेक उद्योगांना त्याचा फटका बसणे सुरू झाले आहे. यात सेमीकंडक्टर, मायक्रोचिप क्षेत्राचा विशेष उल्लेख केला जातो. याने जागतिक पुरवठ्याची साखळी खंडित झाली आहे. ती पूर्ववत होण्यास बराच काळ लागण्याची भीती वर्तविली जात आहे. कृषी क्षेत्रही यामुळे प्रभावित होणार असून रासायनिक खतांचा पुरवठा खंडित वा विलंबित होणार आहे. भारतासह आशियातील देशांना याचा फटका बसण्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

**एक अंदाज** : यूएनडीपी म्हणजे युनायटेड नेशन्स डेव्हलमपेंट प्रोग्रामने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, जगात काही लाख लोक द्रारिद्ररेषेच्या खाली जाणार आहेत. अविकसित देशांना याचा सर्वाधिक फटका बसणार असल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे.

**४० टक्के आखातातून** : परदेशात काम करणारे भारतीय भारतात जो पैसा पाठवितात त्यातील ४० टक्के रक्कम आखाती देशांमधून भारतात पाठविली जाते. आखाती देशांमध्ये जवळपास १ कोटी भारतीयांना रोजगार मिळाला आहे. या युद्धाचा या देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणे अपरिहार्य आहे. स्वाभाविकच तेथे कार्यरत भारतीयांच्या रोजगारांवर काही प्रमाणात गदा येईल असे मानले जाते. तसेच हे भारतीय आपल्या मायदेशी म्हणजे भारतात जो पैसा पाठवीत होते, त्यातही घट होईल असाही अंदाज वर्तविला जात आहे.

**२८ फेब्रुवारी...** : होर्मुझच्या सामुद्रधुनीतून २८ फेब्रवारीपूर्वी ज्या मुक्तपणे जहाजांची ये-जा सुरू होती, ती यापुढे होणार नाही असे इराणने वारंवार स्पष्ट केले आहे. २८ फेब्रवारीपूर्वी होर्मुझ सामुद्रधूनीतून ये-जा करणाऱ्या जहाजांवर इराण कोणतेही शुल्क लावीत नव्हता. मात्र आता त्याने असे शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. पनामा कालवा व सुएझ कालवा यातून जाणाऱ्या जहाजांकडून एक विशिष्ट शुल्क लावले जाते, तसेच ते होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर लावले जाईल असे इराणने म्हटले आहे. याला अमेरिकेने विरोध केला. पण, इराण आपल्या भूमिकेवर ठाम आहे. युद्धात इराणचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आता आम्हाला असे शुल्क लावणे आवश्यक आहे असे इराणने म्हटले आहे. अमेरिका-इराण यांच्यातील हा गतिरोध लवकर न संपल्यास जागतिक अर्थव्यवस्था प्रभावित होणार असल्याचे निष्कर्ष वेगेवेगळ्या संस्थांनी काढले आहेत. मूडीज या पत मानांकन करणाऱ्या संस्थेने भारताचा जीडीपी ६.८ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर घटविला आहे. मात्र तरीही भारताची आर्थिक स्थिती स्थिर राहील असे सांगितले आहे.

साऱ्या जगाला अडचणीत आणणाऱ्या या संघर्षातील दुसरा हत्ती म्हणजे चीनचा ड्रॅगन. तो शांतपणे सारा खेळ घडवीत आहे.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# उष्णतेची लाट तीव्र होणार

सध्या ढगाळ वातावरणामुळे पारा काही अंशी कमी झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. परंतु, एका जागतिक हवामान विश्लेषणानुसार २०२६ हे सर्वाधिक उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता आहे. एप्रिल महिन्यात संपूर्ण विदर्भ रखरखत्या उन्हाने होरपळून निघाला. सर्वाधिक झळ अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर या चार जिल्ह्यांना बसली. ढगाळ वातावरण निवळताच विदर्भात पुन्हा उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून यंदा पावसाळा लवकर दाखल होण्याचे संकेत वेधशाळेने दिले आहेत. परंतु, पावसाळा लांबला तर मे आणि जून महिन्यातही विखारी उन्हाचा सामना विदर्भवासीयांना करावा लागणार आहे.

२०१३ हे वर्ष विदर्भासाठी सर्वाधिक उष्ण ठरले होते. २०१३ च्या मे महिन्यात पारा ४८ अंशांपर्यंत पोहोचल्याने सर्व विक्रम मोडीत निघाले होते. त्यानंतर आता २०२६ मध्ये पारा ४६.९ अंशांपर्यंत पोहोचला. उन्हाळ्याचा आणखी १ महिना शेष आहे. अशा परिस्थितीत पुन्हा उष्णतेची लाट आल्यास नव्या विक्रमाची नोंद होऊ शकते. जगातील १० सर्वाधिक उष्ण शहरांमध्ये विदर्भातील ४ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. दरवर्षी उन्हाळ्यात चंद्रपूर जिल्ह्याचे तापमान अधिक असते. यंदा मात्र अमरावती, अकोला आणि वर्धा जिल्ह्याने चंद्रपूरला मागे सोडले आहे. २९ एप्रिल २०१३ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात ४७.६ अंश तापमान नोंदविण्यात आले होते. यंदा मात्र याच तारखेला चंद्रपूर जिल्ह्यात ४५ अंश तापमानाची नोंद झाली.

२३ मे २०१३ रोजी नागपूर जिल्ह्याचा पारा ४७.९ अंशांपर्यंत पोहोचला होता. हा एक प्रकारचा विक्रम ठरला होता. यंदा अद्याप हा विक्रम मोडीत निघालेला नाही. परंतु, मे महिन्यात उन्हाचा कडाका वाढल्यास नागपूरकरांना २०१३ चा अनुभव पुन्हा येऊ शकतो. २६ एप्रिल २०२६ रोजी अकोला जिल्ह्यात ४६.९ इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. देशातील हे या दिवसाचे सर्वाधिक कमाल तापमान ठरले. यंदा मान्सून वेळेवर किंवा त्यापूर्वीच दाखल होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तविली आहे. केरळमध्ये मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस दाखल होऊ शकतो. महाराष्ट्रात साधारणतः मान्सूनचे आगमन १०-१२ जूनदरम्यान होते. यंदा हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, २ ते ३ जूनदरम्यान मान्सून महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. पावसाळा जवळ आल्यास अवकाळी पाऊस सक्रिय होऊन वातावरण आबादानी होते. परंतु, हवामान तज्ज्ञांचा अंदाज नेहमी खरा ठरत नाही. पावसाळ्याच्या मार्गात काही अडथळा आल्यास नागरिकांना दमट वातावरणाचा सामना करावा लागतो. २०२५ मध्ये विदर्भात तब्बल ८८६.४ मिलिमीटर पाऊस कोसळला. हा पाऊस सरासरीच्या ४ टक्के अधिक होता. जून ते सप्टेंबरदरम्यान विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांमध्ये समाधानकारक पावसाची नोंद झाली. काही ठिकाणी तर अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश पाऊस कोसळला. अशाही परिस्थितीत २०२६ चा उन्हाळा विदर्भवासीयांची परीक्षा पाहणारा ठरत आहे. २०२५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात १,२३५.८ मिलिमीटर इतक्या पावसाची नोंद करण्यात आली. हा पावसाचा एकप्रकारे विक्रम ठरला. अन्य जिल्ह्यांतही कमी-अधिक प्रमाणात याच धर्तीवर पाऊस कोसळला. वर्धा, यवतमाळ आणि वाशीम जिल्ह्यात तर ऑगस्ट महिन्यात पावसाने हाहाकार उडवून दिला होता. तरीही प्रखर उन्हाळा का जाणवत आहे? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

विदर्भात प्रखर उन्हाळा तापण्याची अनेक कारणे आहेत. यातील विदर्भ हा प्रदेश समुद्र किनाऱ्यापासून दूर असणे हे एक प्रमुख कारण आहे. विदर्भ महाराष्ट्राच्या पूर्वेला आहे. परिणामी, हा प्रदेश पश्चिम घाटाच्या रेन शॅडो झोनमध्ये येत नाही. त्यामुळे उन्हाळ्यात तापमान वाढते. शिवाय उन्हाळ्यात विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत सूर्याची किरणे थेट पडतात. त्यामुळे पोळून काढणाऱ्या उन्हाचा सामना येथील नागरिकांना करावा लागतो. उष्माघातामुळे मागील दोन दशकांत विदर्भात ५०० पेक्षाही अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यात २०१६ आणि २०२२ मध्ये सर्वाधिक बळी गेले. यंदा विदर्भात नेमके किती मृत्यू उष्माघातामुळे झाले, याबाबतची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही. परंतु, दरवर्षी विदर्भात उन्हामुळे बळी जातात, ही बाब कोणीही नाकारू शकत नाही. मे महिन्याची सुरुवात ढगाळ वातावरणाने झाली. शिवाय काही ठिकाणी तुरळक पावसाची नोंद करण्यात आली. अवकाळी पावसाचे ढग खूप उंचीवर असतात. त्यामुळे या काळात गारपिटीची शक्यता वाढते. काही ठिकाणी अद्याप ढगाळ वातावरण कायम आहे. त्यामुळे अवकाळी पावसासोबत गारपिटीचा धोका आहे. त्यानंतर मात्र पुन्हा उन्हाचा जाच वाढण्याची शक्यता आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# भय आणि वास्तवाचे चिंतन

नुकतेच नोएडा येथे कामगारांद्वारा पगारवाढीच्या मागण्यांसाठी हिंसक आंदोलन करण्यात आले. यामध्ये अनेक कंपन्यांवर दगडफेक करण्यात आली, रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्या फोडण्यात आल्या, जाळपोळ करण्यात आली. पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. दीडशेपेक्षा अधिक कामगारांना बंदी बनवण्यात आले. याचा तपास पोलिस आता करत आहेत. त्यामध्ये असे लक्षात आले आहे की घटनेच्या काही दिवसांपूर्वीच कामगारांना चिथावणी देण्याचे प्रकार व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून सुरू होते आणि त्याचा स्फोट एका दिवशी करण्यात आला. दीडशेपेक्षा अधिक लोकांना तुरुंगवास झालेला आहे. यामध्ये विदेशी शक्तींचा हात आहे का, हे सुद्धा शोधले जात आहे.

या घटनेचा विचार आपण केला, तर असे लक्षात येते की ज्या कंपन्यांमध्ये आपण काम करतो, ज्यांच्या भरवशावर अनेक वर्षांपासून आपले घर चालविले जात आहे, आपली मुलंबाळं शाळेमध्ये शिकत आहेत, त्याच कंपनीवर दगडफेक करणे, त्यांचे नुकसान करणे हे कितपत योग्य आहे, याचा विचार सर्वसामान्य कामगारांनी करणे आवश्यक आहे. कोणीही असो, पण ते आपल्या इतक्या जवळचे कसे झाले? त्यांच्या आवाहनावर आणि आश्वासनावर इतका आपला विश्वास कसा काय बसतो? हा सुद्धा प्रश्न आहे. कामगारांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असणे हे एक कारण असू शकते. कंपनी व्यवस्थापनाच्याद्वारे वारंवार त्यांचे होणारे शोषण हे सुद्धा कारण असू शकते. आपला पगार वाढला पाहिजे, ही भावना मनामध्ये असणे हे पण एक कारण असू शकते. परंतु आंदोलन सुरू झाल्याबरोबर लगेचच उत्तर प्रदेश सरकारने २० टक्के पगारवाढीची गोष्ट केली. हिंसक आंदोलन करण्यापेक्षा, जर सर्वच कंपन्यांमधील कामगारांनी सुट्टीच्या दिवशी एकत्र येऊन काही लाख कामगारांचा एक भव्य मोर्चा काढला असता आणि सरकारला आपले निवेदन दिले असते, तरीसुद्धा इतकी मोठी व्होट बँक म्हणजे मतदार नाराज आहे हे पाहून कुठल्याही सरकारने ताबडतोब यावर कारवाई केलीच असती. त्यासाठी हिंसेचा आधार घेणे कितपत योग्य होते? आज ज्यांना तुरुंगवास झालेला आहे, त्यांचे कुटुंब कसे चालेल? व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरची चिथावणी देणारे ते चालवतील का? आणि चालवतील तरीसुद्धा किती दिवस? उद्या त्यांनी आपला व्हॉट्सअ‍ॅप नंबर बंद केला, तर ''कोणी आम्हाला मेसेज केले,'' याबद्दल आम्ही काय सांगू शकणार? याचाही विचार केला पाहिजे. त्यांनी सांगितलेली त्यांची नावे



कितपत खरी आहेत, हे सुद्धा किती कामगारांनी तपासून पाहिले असेल? त्यांचा कामगार चळवळीचा अभ्यास किती आहे? किती वर्षांपासून ते कामगार चळवळीमध्ये काम करत आहेत? ज्या संघटनेचे ते नेतृत्व करत आहेत, त्या संघटनेचा इतिहास काय आहे? या सर्व गोष्टी तपासून पाहण्याची गरज कामगारांना का वाटत नाही, हे सुद्धा एक चिंतेचे कारण आहे.

अनेक वेळा पगारवाढ, पेन्शन अशा मुद्यांवर अनेक कामगार नेते कामगारांना भडकविण्याचे काम करीत असतात. त्यांची पोळी शेकली जाते, त्यांना मोठी पदे मिळतात, काही लोक आमदार, खासदार सुद्धा होतात; पण ऊस तोडणारा मजूर हा त्याचेच काम करीत असतो आणि त्यांचा नेता हा फॉर्च्युनर गाडीमध्ये फिरत असतो. त्यामुळे कामगारांनी हे लक्षात घेतले पाहिजे की नेते हे त्यांना आकर्षक आश्वासन देऊ शकतात, आकर्षक जीवन नाही. मग आकर्षक जीवन कोण देऊ शकतो, याचा शोध घेणे आवश्यक आहे.

कोरोनानंतर जगाचा चीनवरील विश्वास मोठ्या प्रमाणावर डळमळीत झालेला आहे. ज्या देशांमध्ये वीज, पाणी, मुबलक जमीन, मनुष्यबळ उपलब्ध असेल, त्या देशांमध्ये आपले कारखाने टाकण्यासाठी जगातील मोठमोठ्या कंपन्या सुरक्षित भूमीचा शोध घेत आहेत. परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की त्यांना मनुष्यबळ म्हणजे केवळ माणसं नको आहेत, तर त्यांना कुशल कामगारांची आवश्यकता आहे. कुशल कामगार म्हणजे काय? तर कुठल्याही कंपनीमध्ये जे काही काम होते, ज्या काही मशीन आहेत, उपकरणे आहेत, त्या सर्वांचा उपयोग करत, त्यांचे योग्य संचालन करीत उत्पादन काढू शकणारा कामगार म्हणजे कुशल कामगार आहे.

नागपूरमध्ये एक विमानांचे सुटे भाग बनविणारी कंपनी आहे. त्या कंपनीने नागपुरातील एका औद्योगिक प्रशिक्षण संस्थेशी करार केला आहे. त्या संस्थेने सुद्धा विमान कंपनीमध्ये चालणारे कार्य समजून घेत, त्यांना कोणते काम करायला कसे कुशल कामगार पाहिजेत हे त्यांच्याकडून जाणून घेतले आणि त्यानंतर आपल्या संस्थेत तशा पद्धतीचा अभ्यासक्रम सुरू केला. आता त्यांच्या संस्थेत दरवर्षी उत्तीर्ण होणारे सर्व विद्यार्थी हे त्या विमान कंपनीत घेतले जातात. त्याचप्रमाणे भारतामध्ये तशा पद्धतीचा अभ्यासक्रम फार कुठे नसल्यामुळे इतरही विमान कंपन्या त्यांच्याकडील विद्यार्थ्यांना मागत आहेत. यावरून आपल्या काय लक्षात येते? की रोजगार आहे; परंतु त्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ देणे हे प्रशिक्षण संस्थांचे कार्य आहे. आता जे कामगार अशा संस्थांमध्ये जाऊ शकत नाहीत, ज्यांचे वय सुद्धा जास्त झालेले आहे, त्यांनी काय करावे असा प्रश्न समोर येऊ शकतो. त्यांनी आहे त्या कंपनीमध्ये अधिकाधिक गोष्टी मला कशा शिकता येतील, याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

नागपुरातील एका विमानाचे सुटे भाग बनविणाऱ्या कंपनीमध्ये असताना, तेथे काही कुशल व अकुशल कामगार विविध विभागांमध्ये काम करीत होते. त्यावेळेस ज्यांचे आयटीआय झालेले नव्हते, फक्त दहावी किंवा बारावीच्या भरवशावर ते तिथे लागलेले होते, अशा मुलांना प्रेरणा देऊन त्यांना आयटीआय करायला लावले. ज्यांचे आयटीआय झालेले होते, अशा विद्यार्थ्यांना कंपनीची परवानगी घेऊन डिप्लोमा करण्यासाठी लावले. आता ते सर्व ऑफिसर झालेले आहेत. मला असं वाटते की सामाजिक प्रतिष्ठा, मान-सन्मान, पैसे वाढविण्यासाठी स्वतःची शैक्षणिक आणि कामातील ज्ञान-गुणवत्ता वाढविणे सुद्धा आवश्यक आहे; हेच वास्तव आहे.

भयाचे राजकारण करणारे कितीही असो, परंतु स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून नवनवीन संधी शोधणारे कामगार हे कधीच मागे राहणार नाहीत. नुकताच कामगार दिवस साजरा करण्यात आलेला आहे. या वास्तवाची जाणीव ठेवून आपण कामगार दिवस साजरा केला पाहिजे, असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### आरोपीला जन्माची अद्दल घडविण्याची गरज

रविवार तरुण भारत ३ मे च्या अंकातील 'बालिकेवर अत्याचार करून निर्घृण हत्या' ही नसरापूरची व तशीच म्हाळुंगे परिसरात ३ वर्षांच्या बालकाच्या अत्याचार व हत्येची बातमी, या दोन्ही खरोखरच मन सुन्न करणाऱ्या बातम्या आहेत. बालिकेच्या प्रकरणात ज्येष्ठ नागरिक तर मुलाच्या हत्या प्रकरणात अल्पवयीन आरोपी हे आणखीनच क्लेशदायक आहे. मुलीच्या अत्याचार व खून प्रकरणातील आरोपी तर यापूर्वी लिंगपिसाट कृत्यांच्या प्रकरणातील (पुतणीवरही अत्याचार) सराईत गुन्हेगार होता, पण जामिनावर सुटून मोकाट होता. त्यामुळे आता पहिल्याच प्रयत्नात आरोपी ठरलेल्यांना कायद्यातील पळवाटांच्या मार्गाने सुटका होऊ न देता आरोप सिद्ध झाल्यावर जन्माची अद्दल घडवणारी शिक्षा केलीच पाहिजे. पालकांनीही आपल्या पाल्यांना चांगल्या-वाईट स्पर्शाची, अनोळखी व्यक्तींना टाळण्याची शिकवण लहान वयातच देणे ही काळाची गरज आहे.

**श्रीपाद कुलकर्णी**/९४२२५१५६४०

### पुणे येथून वंदे भारत एक्सप्रेस सुरू व्हाव्यात!

पर्यटन क्षेत्रात सध्या फार मोठी संधी उपलब्ध आहे. नागरिक मोठ्या प्रमाणावर पर्यटनासाठी जात आहेत. म्हणून पुणे रेल्वे स्टेशनवरून पुढीलप्रमाणे वंदे भारत एक्सप्रेस सुरू होणे आवश्यक आहे. १) पुणे- इंदूर-पुणे (या रेल्वेमुळे मध्यप्रदेशमधील उज्जैन, ओंकारेश्वर, महेश्वर, मांडू, इंदूर या ठिकाणी पर्यटन विकास होईल.) २) पुणे-बडोदा-पुणे (या रेल्वेमुळे सरदार पटेल स्टॅच्यू ऑफ युनिटी, गरुडेश्वर, मोघेंच्या, बडोदा, अहमदाबाद या ठिकाणी पर्यटन विकास होईल) ३) पुणे- गोवा-पुणे. या रेल्वेमुळे गोवा, कारवार इ. ठिकाणी पर्यटनात मोठी वाढ होईल. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मध्यप्रदेश, गुजरात, गोवा या राज्यांतूनही पर्यटक मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातील गड किल्ले, प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी येतील. म्हणून या मार्गावर रेल्वे मंत्रालयाने वंदे भारत एक्सप्रेस गाड्या सुरू कराव्यात. पुणे व परिसरातील लोकप्रतिनिधींनी यासाठी पाठपुरावा करावा ही विनंती.

**मोहन रानडे**/पुणे. ९८२३३७५३००

## वाचक पत्रे

### नागपूर मनपाने जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे

नागपूर महानगर पालिकेच्या अंतर्गत असलेल्या अनेक वसाहतींमध्ये अमृत वाहिनी योजनेअंतर्गत काम सुरू आहे. अगदी रस्त्याच्यामधून पाईप टाकून ही योजना राबविणार आहे. योजना चांगली आहे. जनतेच्या घरात पावसाचे पाणी जाणार नाही याची खबरदारी म्हणून ही योजना सुरू आहे. या योजनेच्या कामाला कालबद्ध कार्यक्रम असणे आवश्यक आहे. रवींद्रनगरमध्ये गेल्या ४ महिन्यांपासून काम सुरू आहे. रवींद्रनगरच्या पाटीपासून पूर्ण रस्ता उखडून टाकून तो रस्ता पूर्णपणे बंद केला आहे. आता पाईपलाईन टाकली तरी तो उखडलेला रस्ता तसाच आहे. काम झाल्यावर रस्ता पूर्ववत करावा ही माफक अपेक्षा आहे. तिथे अनेक दुचाकीस्वार पडलेले आहेत. त्यांना इजा झाली आहे. तसेच काम करीत असताना नळाची पाईपलाईन फुटली. त्यातूनही बरंच पाणी वाहून गेलं. प्रत्येक गल्लीमध्ये कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. अनेक चेम्बर्स उघडे आहेत. रात्री कोणाचाही अपघात होऊ शकतो.

आपण 'स्वच्छ नागपूर सुरक्षित नागपूर' या दृष्टीने बघण्याचा प्रयत्न करतो. दोन महिन्यांपूर्वी राधे मंगलम चौकात तीन अपघात झालेत तेव्हा तिथे तात्पुरता सिग्नल लावला. परंतु तो नेहमी बंदच असतो. अशा अनेक गोष्टी निदर्शनास येतात तेव्हा नागपूर महानगर पालिकेला विनंती आहे की त्यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. आम्ही जनता म्हणून सुद्धा मनपाला सहकार्य करू ही खात्री आम्ही देतो. करिता वसाहतीतील नागरिक व मनपा प्रशासन दोघे मिळून स्वच्छ नागपूर, सुरक्षित नागपूर ही संकल्पना राबवू शकतो. आमचे नगरसेवकही आमच्या तक्रारींची ताबडतोब दखल घेतातच, परंतु काही तक्रारी मनपा प्रशासनच सोडवू शकते. त्यामुळे मनपाला नम्र विनंती आहे की लक्ष्मीनगर झोनमधील रवींद्रनगर वसाहतीची समस्या सोडवावी.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

### मृत्युदंड शिक्षेची अंमलबजावणी होणे आवश्यक

बलात्कार करून निर्घृण हत्या असो की इतर कुठल्याही गंभीर गुन्ह्यातील मानवतेला काळिमा फासणारी हत्या असो अशा प्रकरणातील बऱ्याच प्रकरणात मृत्युदंडाची शिक्षा आरोपीला होते. प्रकरण ताजे असताना जनतेचा रोष, समाज माध्यमांवरून अल्प काळ पाठपुरावा वगैरे होतो, परंतु पुन्हा नवीन घटना घडली की जुन्या प्रकरणाचा विसर पडतो हे सत्य आहे. खालच्या न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत अनेक वर्षे खटले सुरू असतात. सर्वोच्च न्यायालय गंभीर प्रकरणातही मृत्युदंडाऐवजी जन्मठेप अशी शिक्षा देते. बरे मृत्युदंड कायम ठेवला तरीही मग राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज मग पुढे शिक्षा अंमलबजावणीस उशीर झाला म्हणून मृत्युदंड रद्द असेही घडते आणि गुन्हा घडला त्यावेळेसचा जनतेचा रोष विरलेला असतो. त्यामुळे मृत्युदंडाचा निर्णय झाल्यास कुठलीही दयामाया न दाखवता अतिशय अल्प काळात आरोपी कसा फासावर लटकेल यावर विचार होणे आवश्यक आहे.

**राम राजे**/९४२१७७९९४५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### बारावी परीक्षेत अहिल्याबाई प्रशालेची राणी श्रीमंडी प्रथम

**सोलापूर, दि. ३ मे-**

इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेत अहिल्याबाई प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयाची राणी श्रीमंडी हिने ६३.00% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. शाहिस्ता झाकीर हुसेन हिने ६२.१७% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर पुनम सोलंकर हिने ५७.00% गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव प्राचार्य इस्माईल शेख यांनी केला. या प्रसंगी प्रा. अनंत सुरते, प्रा. शितल राठोड, प्रा. महेंद्र ढवाण, प्रा. अर्चना दीक्षित, प्रा. धनाजी धेंडे आदी उपस्थित होते. संस्थापक-सचिव हाजी बंदेनवाज शेख यांनीही अभिनंदन केले.

### शांती ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के

**सोलापूर, दि. ३ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या परीक्षेत संतोषनगर, विजापूर रोड येथील शांती ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर अण्णाराव पाटील, प्राचार्य रजुला मॅक यांनी अभिनंदन केले आहे. प्रथम तीन विद्यार्थी : जोजारे पुर्वा ८३.६७%, गंभीरे स्नेहा ८३.३३%, काबरा यश ८१.५०%.

### सिद्धेश्वर मंदिर परिसरात पार्क केलेला आठ लाखांचा टेम्पो चोरीस

**सोलापूर, दि. ३ मे-**

सिद्धेश्वर मंदिर परिसरात पार्क केलेला आठ लाख रुपये किमतीचा अशोक लेलँड टेम्पो लंपास केल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चांदसाब जावेदअहमद शेख (रा. ७७८ उत्तर कसबा, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीने त्यांच्या मालकीचा टेम्पो ( क्रं. एम एच १३ डी क्यु ८६६१ ) दि.२ में रोजी दु.१२ वा ते सायंकाळ ७.४५ वा चे दरम्यान, सिध्देश्वर मंदिर येथे पार्क केला असता अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवलदार घुगे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### मयत बहिणीच्या विधीसाठी घरी आलेल्या दोघा मेव्हण्यांना मारहाण

**सोलापूर, दि. ३ मे-**

मयत बहिणीच्या तिसऱ्या दिवसाच्या विधीसाठी विचरणा करण्यासाठी घरी आलेल्या दोघा मेव्हण्यांना मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी भाऊजीसह दोघा जणांविरुद्ध एमआयडीसी पोलिसा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविकांत हुच्चे आणि किरण चंद्रकांत हुच्चे (रा.कुमठा नाका सोलापूर ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत श्रीकांत विठ्ठल गवळी (वय २५ वर्षे, रा. जाफराबाद, गुलबर्गा, कर्नाटक) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे २८ एप्रिल रोजी सकाळी कुमठा नाका येथे त्यांच्या मामा सोबत बहिणीच्या तिसऱ्या दिवसाच्या विधीसाठी विचरणा करण्यासाठी गेले असता तेथे भाऊजी व त्याचा भाऊ या दोघा आरोपींनी तु इथे कशाला आला, तुला सोडत नाही असे म्हणून दमदाटी करुन फिर्यादीस दगड, लाथाबुक्यांनी व डोक्यावर काठीने मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार कांबळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### जिल्हा कारागृह आवारात कैद्याकडून पोलिसास शिवीगाळ करून मारहाण

**सोलापूर, दि ३ मे-**

येथील जिल्हा कारागृह आवारात एका कैद्याने एका पोलीस शिपायाला शिवीगाळ व मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उफरान ऊर्फ पाप्या मुनीर गोलंदाज ( रा. गवळी वस्ती, दमाणी नगर, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत पो. कॉ. ढोबळे (नेमणूक - पोलीस मुख्यालय सोलापूर शहर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे दि.२ में रोजी सायं. ५च्या सुमारास येथील जिल्हा कारागृह येथे कर्तव्यावर असताना वरील आरोपीस कारागृह परीसरातुन बाहेर काढत असताना तो फिर्यादीस तु कोण मला सांगणार, मी कारागृहचे कुंभार सर यांना तुझे नाव सांगतो, मी कोणालाही घाबरत नाही, असे म्हणून दमदाटी करुन अश्लिल शिवीगाळ करुन फिर्यादीचे अंगावर धावून आला आणि फिर्यादीच्या युनिफॉर्मची कॉलर पकडुन डोक्यावर बुक्की मारुन ढकलुन दिले. त्यामुळे फिर्यादी हे दोन्ही गुडघ्यास जबर मार लागुन जखमी झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक चानकोटी हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### छत्रपती शिवाजी बारावी कलाचा ७८.१५; वाणिज्यचा ९४ टक्के निकाल

**सोलापूर, दि.३ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यातर्फे फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेचा कला विभागाचा निकाल ७८.१५% तर वाणिज्य विभागाचा निकाल ९४% इतका लागला आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि घर सांभाळून रात्र महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी, विशेषतः मुलींनी यंदाच्या निकालात बाजी मारली आहे. दिव्यांग विद्यार्थी योगीराज धनवे याने ६०% गुण मिळवून यश मिळवले. त्यांचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे, जनरल सेक्रेटरी महेश माने, शालेय समिती चेअरमन राजेंद्र शिंदे, प्राचार्या मंजुश्री पाटील, ज्येष्ठ शिक्षक संभुदेव गावडे, क्रीडा शिक्षक सचिन गायकवाड आदींनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी : कला :** गायत्री साळुंखे (८२.६७%), भाग्यश्री शेवाळकर (८१%), उषा भडकवाड (७८.८३%). **वाणिज्य :** सिद्धार्थ साखरे (७८.३३%), प्रेरणा हरिदास (७१.५०%), पौर्णिमा खटके (६७.५०%).

# अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी ५० लाखांचा निधी देणार

### महापौर विनायक कोंड्याल यांची ग्वाही

### क्रांतीवीर लहुजी शक्ती सेनेतर्फे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे गुणवंत कामगार पुरस्काराचे वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

गुणवंत कामगारांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचे काम क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना करत आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळा सुशोभीकरणासाठी ५० लाखापर्यंतचा निधी म हापालिकेच्या वतीने देण्याची ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने क्रांतीवीर लहुजी शक्ती सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 'गुणवंत कामगार पुरस्कार' वितरण प्रसंगी ते बोलत होते. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथे पक्षनेते नरेंद्र काळे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा झाला. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, काम गार नेते रवींद्र मोकाशी, नगरसेवक समाधान आवळे, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक प्रशांत पल्ली नगरसेवक रवीसिंग कय्यावाले, श्रीकांत बोराडे, भरतकुमार मोरे, अनिल लोंढे, लेखक किशोर जाधव, लष्कर मातंग समाजाध्यक्ष भीमराव गायकवाड, रोहित खिलारे, प्रवीण वाडे, जिल्हाध्यक्ष किसन पाटोळे, प्रदेश युवक कार्याध्यक्ष गोविंद कांबळे सावित्री महिला संघटनेच्या प्रमिला जाधव डॉ. आतिश बोराडे आदींची उपस्थिती होती. प्रारंभी अण्णाभाऊ साठेंच्या पुतळ्यास अभिवादन केले. प्रास्ताविक प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी केले. विश्वेश्वर गायकवाड, महेश तेजबिंदे, मुकेश गायकवाड, ओमकार पटवा आदींनी परिश्रम घेतले.

**यांचा झाला पुरस्काराने सन्मान**

असफ फुलमामडी (आरोग्य सेवक), विक्रम पाटोळे( लाईट विभाग, सोमपा), अक्षय लोंढे (भूमी मालमत्ता सुपरवायझर), अक्षय पवार, पुष्पांजली राठोड (आरोग्य सेविका), राजी सागालोलू , रेखा केंदळे, राजू डोलारे(मोदी स्मशानभूमी ऑपरेटर विद्युत दाहिनी), मरिम्मा बोदुर , कविता दास, नेहा भोवळ , नागराज भोवळ ( बांधकाम कामगार), पार्वती विटेकर, रत्नमा बोदुर.



## मित्र नगर शेळगी येथे कामगार कार्ड वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

श्रमिक बांधकाम कामगार कल्याणकारी सेवाभावी संस्थातर्फे मित्र नगर शेळगी भागात महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त अर्जुन सलगर व शिवसेना (शिंदे गट) कामगार आघाडी जिल्हा अध्यक्ष सायबण्णा तेगेळ्ळी यांचा हस्ते बांधकाम कामगारांना कामगार कार्ड वाटप करण्यात आले.श्रमिक बांधकाम कामगार कल्याणकारी सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रफिक हणगी यांचा सत्कार सायबण्णा तेगेळ्ळी यांचा हस्ते करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष रियाज शेख यांच्या हस्ते सायबण्णा तेगेळ्ळी यांचा सत्कार करण्यात आला. शरणू गुडियवरू यानी बांधकाम कामगाराचे शासनाचे योजनाची माहिती सांगितली. यावेळी लता सामल, राधिका चिप्पा, यास्मीन बागवान, प्रियांका मलपेदी, शंकर सुंचु, वनिता सोमा, लता सामल, बोगा कामगार कार्ड वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मलीक भूसणूर, पोतन, आण्णासाहेब वाघचवरे, शोएब शेख, बाबू इंगवे, रुपनूर यांनी परिश्रम घेतले व आभार झीहान बागवान यांनी मानले.

## 'वालचंद'च्या बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९८.६१ टक्के

### कला शाखेचा ८०.२९ टक्के, खडके व ढंगे प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एचएससी (इयत्ता १२वी) बोर्ड परीक्षेत वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स महाविद्यालयाने विज्ञान शाखेचा ९८.६१ टक्के तर कला शाखेचा ८०.२९ टक्के निकाल नोंदविण्यात आला आहे.

विशेष म्हणजे विज्ञान शाखेतील गणित विषयात २ विद्यार्थ्यांनी, तर कला शाखेतील अर्धमागधी विषयात ७ विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, स्वयंअर्थसहाय्य विभाग प्रमुख सारिका महिंद्रकर आदी उपस्थित होते.

**प्रथम तीन विद्यार्थी : विज्ञान :** अनिकेत लक्ष्मण खडके (९२.८३%), हसिनी संतोष शेगुरे (८९.५०%), नितीन किशोर कोंकाटी (८६.६७%).

**कला :** संचिता सचिन ढंगे (९०%), अनुष्का किशोर रच्चा (८९.६७%), रोशनी सुरेश श्रीराम (८८.३३%)



## हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सचा ९८.०६% निकाल

### खिलती शहा आणि ईशान शहा संयुक्तपणे प्रथम

**सोलापूर, दि. ३ मे-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूरने यंदाच्या इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेत निकाल तब्बल ९८.०६% लागला आहे.

खिलती हेमल शहा आणि ईशान शंतनू शहा यांनी प्रत्येकी ९४.५०% गुण मिळवत संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला. रिया सिद्धार्थ गांधी आणि सनोबर मोईनुद्दीन नदाफ यांनी ९३% गुण मिळवत द्वितीय तर तनिष्का प्रभाकर काटवे हिने ९२.६७% गुणांसह तृतीय क्रमांक संपादिला. प्रणाली बिराप्पा चेंडके हिने अकाउंटन्सी विषयात १०० पैकी १०० गुण तसेच तनिष्का प्रभाकर काटवे हिने अर्थशास्त्र विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवून आपली बौद्धिक क्षमता अधोरेखित केली. त्यांचे वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, समस्त विश्वस्त, प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, एमबीए विभाग प्रमुख डॉ. प्रितम कोठारी,समन्वयक सारिका महिंद्रकर आदींनी अभिनंदन केले.

### गांधी नाथा रंगजी विद्यालयाचे घाटोळे, साळुंके प्रथम

**सोलापूर, दि.३ मे-**





बारावी बोर्ड परीक्षामध्ये गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जन मंगल प्रतिष्ठान संचालित गांधी नाथा रंगजी कॉमर्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज सायन्स विभागाचा निकाल ९०: ३८ तर कॉमर्स विभागाचा निकाल ८८:२३ टक्के लागला आहे. त्यांना अमोल कांबळे व क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, प्राचार्य स्मिता रणदिवे यांनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन विद्यार्थी : सायन्स :** ऐश्वर्या संजय घाटोळे, समृद्धी किरण मेहता, आयुष प्रमोद सुतार. **कॉमर्स :** सुदर्शन अनंत साळुंखे, अभिजीत कृष्णा नवगिरे, रविराज दत्तात्रय भोसले तृतीय

## माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार व उज्वलाताई शिंदे यांचा लग्नाचा वाढदिवस उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

सुख-दुःखाच्या प्रत्येक क्षणी सावलीसारखी साथ देणारे आणि प्रत्येक प्रसंगात एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आदर्श दांपत्य म्हणून ओळखले जाणारे, आदर्श माता, आदर्श पिता, माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार व उज्वलाताई शिंदे यांच्या लग्नाच्या वाढदिवस काँग्रेस भवन येथे उत्साहात पार पडला.

जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार व शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या हस्ते केक कापून हा वाढदिवस साजरा करण्यात आला.



उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिंदे दांपत्याला हार्दिक शुभेच्छा देत त्यांच्या सहजीवनासाठी आनंदी, निरोगी व प्रेरणादायी वाटचालीच्या सदिच्छा व्यक्त केल्या. यावेळी माजी महापौर सुशिलाताई अबुटे, माजी स्थायी समिती सभापती बाबा मिस्त्री, महाराष्ट्र प्रदेश सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष सुदीप चाकोते, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, कार्याध्यक्ष हनुमंत सायबोळु, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, ब्लॉक अध्यक्ष उदयशंकर चाकोते, बाबुराव म्हेत्रे, नागनाथ कदम, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपडंला, भटक्या विमुक्तचे अध्यक्ष युवराज जाधव, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक खन्ना, असंघटित कामगार सेल अध्यक्ष सुभाष वाघमारे, कामगार सेल अध्यक्ष सायमन गद्दू, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, विश्वनाथ साबळे, बसवराज म्हेत्रे, सिद्धाराम चाकोते, सिद्राम सलवदे, सर एन. के. क्षीरसागर, अशोक कलशेट्टी, रुस्तुम कंपली, मोतीराम चव्हाण, अय्याज आळंद, भीमराव शिंदे, नूरअहमद नलवार, माजी महिला अध्यक्ष सुमन जाधव, अॅड. करीमुनिसा बागवान, शुभांगी लिंगराज, मुमताज तांबोळी, संघमित्रा चौधरी, ज्योती गायकवाड, अनिता भालेराव, मीना गायकवाड, राजेश झंपले, कालिदास काळपगार, धीरज खंदारे, चंद्रकांत टिक्के, अॅड. श्रीशैल रणकंबे, राजकुमार राठोड, दत्ता नामकर, संजय कुराडे, आप्पा सलगर, गोपी खांडेकर, शुकूर शेख, मोहसीन फुलारी, दशरथ सामल, हणमंतु रुपनर, शिवाजी साळुंखे, अभिलाष अच्युगटला, दीपक मठ, जितराज गराड, जब्बार शेख, आयन नडीवाले, दत्तात्रय गजभार, हाजी मेहमूद शेख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बार्शीत 'कंपनी स्कीम'च्या नावाखाली गृहिणीची फसवणूक

### दोन अज्ञात महिलांनी २१ हजारांचा ऐवज लांबवला; कसबा पेठेतील घटना

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ३ मे-**

बार्शी शहरातील कसबा पेठ परिसरात 'कंपनीची स्कीम' असल्याचे आमिष दाखवून दोन अज्ञात महिलांनी एका गृहिणीची २१ हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कसबा पेठेतील बारंगुळे गल्ली येथे राहणाऱ्या राजश्री विनायक बारंगुळे (वय ४०) या २३ एप्रिल रोजी सकाळी १०.४५ वाजता घराबाहेर शाबुदाणा पापड घालण्याचे काम करत होत्या. त्यावेळी दोन अनोळखी महिला भांडी विकण्याच्या बहाण्याने त्यांच्या घरी आल्या. पिण्यासाठी पाणी मागितल्यानंतर त्यांनी चहाही घेतला आणि बोलण्यात गुंतवून विश्वास संपादन केला.




यानंतर त्यांनी 'कंपनीची नवीन स्कीम' असल्याचे सांगत, सोन्याच्या चार वस्तू दिल्यास ४० हजार, तर पाच वस्तू दिल्यास ५० हजार रुपये मिळतील. त्यातील ५ हजार रुपये कमिशन म्हणून आम्ही ठेवू आणि उर्वरित रक्कम व आकर्षक भेटवस्तू तुम्हाला देऊ, अशी बतावणी केली. या भूलथापांना बळी पडून राजश्री यांनी स्वतःचे व मुलीचे सोन्याचे दागिने यामध्ये काळ्या मण्यांचे मंगळसूत्र, कानातील टॉप्स, सोन्याच्या अंगठ्या, कानातील रिंगा व एक पितळी घागर असा एकूण अंदाजे २१ हजार रुपयांचा ऐवज त्यांच्या ताब्यात दिला.

हे सोने कंपनीला दाखवून दुपारी १ वाजेपर्यंत परत येतो, असे सांगून त्या दोन्ही महिला तेथून निघून गेल्या. मात्र बराच वेळ उलटूनही त्या परत न आल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच राजश्री यांनी पोलिसांत धाव घेतली.

या प्रकरणी राजश्री बारंगुळे यांच्या फिर्यादीवरुन बार्शी शहर पोलिसांनी दोन अज्ञात महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

**पोलीसांचे नागरिकांना आवाहन**

शहरात अशा प्रकारच्या फसवणुकीच्या घटना वाढत असून, नागरिकांनी अनोळखी व्यक्तींवर सहज विश्वास ठेवू नये. कोणतीही 'स्कीम' किंवा आमिष दाखवले गेल्यास त्याची खातरजमा केल्याशिवाय मौल्यवान वस्तू देऊ नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## सिंहगड महाविद्यालयात आजपासून रसायनशास्त्र प्राध्यापकांसाठी विशेष प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी (MSFD) यांच्या पुढाकारातून एक आठवड्याचा प्राध्यापक विकास कार्यक्रम एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे होत आहे. क्षमता उजागर करणे : रसायनशास्त्र शिक्षणतज्ज्ञांना सशक्त बनविणे या विषयावर आधारित या उपक्रमास ४ मे पासून सुरवात होणार आहे. हा उपक्रम ८ मेपर्यंत होणार असून रसायनशास्त्र व संबंधित शाखांतील प्राध्यापकांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

SINHGAD INSTITUTES SPSPM || ज्ञान दान पवित्र दान ||

आधुनिक तंत्रज्ञान, संशोधनातील नवे ट्रेंड, उद्योग-शिक्षण समन्वय आणि अध्यापनातील नवकल्पना या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन मिळणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवार, विद्यापीठाच्याच रासायनिक विज्ञान शाळेचे संचालक डॉ. ए. ए. घनवट सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शंकर नवले, सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस एच पवार यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत याचे उद्घाटन होणार आहे.

**देशातील नामांकित शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञांचे मार्गदर्शन**

कार्यक्रमासाठी देशातील नामांकित शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. यामध्ये पद्मश्री डॉ. गणपती डी. यादव, डॉ. दिनेश आमलेरकर, डॉ. संजय चराटी, डॉ. प्रकाश वाडगांवकर, डॉ. एस. एच. पवार, डॉ. जी. एस. ग्रोव्हर, डॉ. सुनिता बर्वे यांच्यासह सीएसआयआर-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (CSIR-NCL), पुणे येथील अनेक वरिष्ठ वैज्ञानिकांचा समावेश आहे. तसेच उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विविध विद्यापीठांतील प्राध्यापकही मार्गदर्शन करणार आहेत.




## महत्त्वाचे

### मानस धामणेला कझाकस्तान एटीपी चॅलेंजरचे उपविजेतेपद



**शिमकेंट** : भारताचा किशोरवयीन टेनिसपटू आणि उदयोन्मुख स्टार खेळाडू मानस धामणे याला त्याच्या पहिल्याच चॅलेंजर एकेरीच्या अंतिम सामन्यात विजेतेपदाने हुलकावणी दिली. मानसला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. रविवारी कझाकस्तानमधील शिमकेंट येथे झालेल्या अत्यंत अटीतटीच्या अंतिम लढतीत १८ वर्षीय मानसला बेल्जियमच्या बुवायसार गदामौरीकडून पराभव पत्करावा लागला. दोन तासांहून अधिक काळ चाललेल्या अंतिम लढतीत मानसला ६-७(८), ४-६ अशा गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. हा पराभव पत्करावा लागला असला तरी, धामणेसाठी हा आठवडा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रगतीचा ठरला आहे. तो पहिल्यांदाच जागतिक क्रमवारीत अव्वल-४०० खेळाडूंमध्ये स्थान मिळवण्याच्या उंबरठ्यावर आहे. सोमवारी जेव्हा नवीन क्रमवारी जाहीर होईल, तेव्हा तो बहुधा आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम अशा ३८४ व्या क्रमांकावर पोहोचेल अशी दाट शक्यता आहे.

### महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षपदी मुरलीधर मोहोळ बिनविरोध



**पुणे** : महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षपदी केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पुण्याच्या बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नाव अध्यक्षपदासाठी चर्चेत होते. मात्र त्या नुकत्याच खो-खो असोसिएशनच्या माध्यमातून सदस्य झाल्या असल्याने या पदावर मोहोळ यांची निवड निश्चित झाली.

### निशांत सिंधूचे पदार्पण

**अहमदाबाद** : रविवारी येथे नरेंद्र मोदी स्टेडियमवर पंजाब किंग्जविरुद्धच्या आयपीएल गुजरात टायटन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्याच्या माध्यमातून डावखुरा फिरकी गोलंदाज निशांत सिंधू गुजरातकडून आयपीएलमध्ये पदार्पण करीत आहे, असे गिलने जाहीर केले. नाणेफेक जिंकल्यावर जीटीचा कर्णधार शुभमन गिल म्हणाला की, आम्ही प्रथम गोलंदाजी करणार आहोत. गेल्या काही सामन्यांमध्ये आम्ही लक्ष्याचा चांगला पाठलाग करत आहोत आणि आमची गोलंदाजीही चांगली कामगिरी करत आहे, त्यामुळे हीच लय कायम ठेवू. आम्ही आमच्या मधल्या फळीने सामना संपवण्याबद्दल बोललो होतो आणि राहुल भाईने ज्या प्रकारे कामगिरी केली ती अप्रतिम होती. सुरुवातीला गोलंदाजांसाठीही संधी असते. योग्य वेळी सर्वोत्तम कामगिरी करणे महत्त्वाचे आहे.

### मनीष पांडेच्या पुनरागमनामुळे केकेआर ट्रोल

**कोलकाता** : कोलकाता नाईट रायडर्सच्या संघ निवडीमुळे सोशल मीडियावर एकच चर्चा सुरू झाली आहे. आयपीएलमध्ये मनीष पांडेच्या पुनरागमनावर अनेक चाहत्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. त्याच्या नावाचा सर्वत्र प्रोमोज, पोस्टर्स आणि मोहिमांमध्ये बोलबाला होता, पण आतापर्यंत त्याला अंतिम एकादशमध्ये फारशी संधी मिळाली नव्हती, याकडे लक्ष वेधणाऱ्या प्रतिक्रियांचा सोशल मीडियावर पाऊस पडला आहे. चाहत्यांच्या एका गटाने उपहासात्मक सूर लावला आहे. त्यांनी याला 'भूतकाळातील खेळी' असे संबोधले असून, तरुण खेळाडूंवर विश्वास ठेवण्याऐवजी पुन्हा जुन्याच सूत्राकडे वळत असल्याची मस्करी केली आहे. काहींनी तर या फ्रॅन्चायझीला उदयोन्मुख प्रतिभेसाठी एक कठीण ठिकाण असल्याचे म्हटले आहे. विशेषतः तेजसवी आणि सार्थक यांसारखे खेळाडू अजूनही आपल्या संधीची वाट पाहत असताना, ही टीका अधिकच तीव्र झाली आहे.

### मार्ता कोस्त्युकला प्रथमच माद्रिद ओपनचे जेतेपद

**माद्रिद** : मार्ता कोस्त्युकने मिरा आंद्रीयेवाला हरवून पहिले विजेतेपद पटकावले. डब्ल्यूटीए १००० स्तरावरील तिची पहिलीच ट्रॉफी आणि या हंगामातील तिचे दुसरे विजेतेपद ठरले. मार्ता कोस्त्युकने मिरा आंद्रीयेवाला ६-३, ७-५ अशा फरकाने पराभूत करत, पहिल्यांदाच माद्रिद ओपनचे विजेतेपद पटकावले. जागतिक क्रमवारीत २३ व्या स्थानी असलेल्या कोस्त्युक ही माद्रिद ओपन जिंकणारी, जागतिक क्रमवारीतील अव्वल २० खेळाडूंच्या यादीबाहेरील ती केवळ दुसरीच खेळाडू ठरली आहे. या वर्षाच्या सुरुवातीला ब्रिस्बेनमध्ये जेव्हा कोस्त्युक आणि आंद्रीयेवा यांच्यात एकमेव सामना झाला होता.

# रघुवंशीची 'अजिंक्य' खेळी

## कोलकाताची हैदराबादवर ७ गड्यांनी मात



सामनावीर वरुण चक्रवर्ती

◆ **हैदराबाद, ३ मे**

१९ व्या आयपीएल हंगामात रविवारी येथील राजीव गांधी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने यजमान सनरायझर्स हैदराबादचा विजय रथ रोखला. हैदराबादने विजयासाठी ठेवलेले १६६ धावांचे लक्ष्य कोलकाताने १८.२ षटकांत ३ गडी गमावित सहज गाठले. अजिंक्य रहाणेची (४३) दमदार फलंदाजी व अंगकृश रघुवंशीच्या (५९) अर्धशतकी खेळीच्या बळावर कोलकाता नाईट रायडर्सने १० चेंडू शिल्लक ठेवित ७ गडी राखून विजय संपादन केला. फिरकीपटू वरूण चक्रवर्तीने हैदराबादच्या डावाला खिंडार पाडल्यामुळे केकेआर समोर विजयाचे सोपे लक्ष्य राहिले. ३६ धावांत ३ बळी टिपणारा वरुण सामनावीर ठरला.

या विजयानंतरही कोलकाता (७ गुण) गुणतालिकेतील आठव्या स्थानी तसेच पराभवानंतरही हैदराबाद (१२ गुण) तिसऱ्या स्थानी कायम राहिले.

सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु अव्वल फळी वगळता त्यांना अपेक्षेप्रमाणे फलंदाजी करता आली नाही.

अभिषेक शर्मा (१५) व ट्रॅव्हिस हेडने ४४ धावांची सलामी भागीदारी करत हैदराबादच्या डावाची चांगली सुरुवात केली. कार्तिक त्यागीने अभिषेकला ग्रीनकडून झेलबाद केले. मात्र त्यानंतर ट्रॅव्हिस हेड आणि ईशान किशनने दुसऱ्या गड्यासाठी ४४ धावांची भागीदारी करत संघाला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. वरुण चक्रवर्तीच्या फिरकीला बळी पडण्यापूर्वी ट्रॅव्हिस हेडने २८ चेंडूंत ६१ धावांची खेळी केली, यात त्याने ९ चौकार व ३ षट्कार हाणले. पुढे ईशान किशनने एक टोक सांभाळीत संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु दुसऱ्या टोकावरून त्याची सहकारी कोलकात्याच्या गोलंदाजांसमोर खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरू शकले नाही. कोलकाताची घसरगुंडी उडत गेली. हेनरिक क्लासेन (११), रविचंद्रन स्मरण (४), अनिकेत वर्मा (६) व सलील अरोरा (२) तंबूत परतत गेले. नंतर ईशान किशनही सुनील नरेनच्या गोलंदाजीत अनुकूल रॉयतकडून झेलबाद झाला. ईशान बाद झाला, त्यवेळी हैदराबादची स्थिती १६ षटकांत ७ बाद १४८ धावा अशी होती. ईशान किशनने २९ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारांसह ४२ धावांची भर घातली.

पुढे कर्णधार पॅट कमिन्सने संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु कमिन्स (१०) याच्यासह शिवांग कुमार (१), हर्षल पटेल (६) कोलकात्याच्या प्रभावी माऱ्यासमोर फार वेळ टिकाव धरू शकले नाही आणि सनरायझर्स हैदराबादचा संपूर्ण संघ १९ षटकांत १६५ धावांत बाद झाला. कोलकाताकडून फिरकीपटू वरुण चक्रवर्तीने ३ बळी, सुनील नरेन व कार्तिक त्यागीने प्रत्येकी २ बळी, तर वैभव अरोरा, कॅमेरॉन ग्रीन व अनुकूल रॉयने प्रत्येकी १ बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना कर्णधार अजिंक्य रहाणे व फिन ॲलनने ४९ धावांची दमदार सलामी भागीदारी करून आपल्या संघाचा विजयाचा इरादा स्पष्ट केला. कमिन्सने ही सलामी जोडी फोडली. क्लासेनकडून झेलबाद होण्यापूर्वी फिन ॲलनने १३ चेंडूंत २९ धावांची भर घातली. पुढे रहाणे व अंगकृश रघुवंशीने स्वैर फलंदाजी करत केकेआरच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या. मात्र अशातच साकिब हुसेनने अजिंक्य रहाणेला स्मरणकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. त्यामुळे रहाणेचे अर्धशतक हुकले. अजिंक्य रहाणेने ३६ चेंडूंत ४ चौकार व एका षट्कारसह ४३ धावांची खेळी केली. अंगकृशने रिंकू सिंगच्या साथीने केकेआरला विजयाच्या समीप आणले असतानाच शिवांग कुमारने अंगकृशला मलिंगाकडून झेलबाद केले. अंगकृश रघुवंशीने ४७ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह ५९ धावांची अर्धशतकी खेळ केली. रिंकू सिंग व कॅमेरॉन ग्रीने नाबाद खेळी करत केकेआरच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. रिंकूने नाबाद २२ धावांची, तर ग्रीनने नाबाद ३ धावांची विजयी खेळी केली. हैदराबादकडून पॅट कमिन्स, शिवांग कुमार व साकिब हुसेनला प्रत्येकी एक बळी टिपण्यातच यश आले. (वृत्तसंस्था)



अंगकृश रघुवंशी
धावा ५९
चेंडू ४७
चौकार ५
षट्कार २

# राजस्थान रॉयल्सच्या मालकीमध्ये नवीन वळण

## उद्योजक लक्ष्मी मित्तल यांनी विकत घेतली फ्रॅन्चायझी



◆ **जयपूर, ३ मे**

राजस्थान रॉयल्सच्या मालकीबाबतच्या घडामोडींमध्ये एक अनपेक्षित वळण आले असून, भारतीय अब्जाधीश उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांनी आणखी एक प्रमुख भारतीय उद्योगपती आदर पूनावाला यांच्यासह, १.६५ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या (सुमारे १५,६६० कोटी रुपये) मोबदल्यात या संघाची मालकी मिळविली आहे.

मित्तल कुटुंब आणि पूनावाला हे एका समूहाचा भाग आहेत; या समूहात राजस्थान रॉयल्सचे विद्यमान प्रमुख मालक मनोज बदले यांचाही समावेश आहे. या व्यवहारामध्ये रॉयल्स ब्रॅण्ड अंतर्गत एसए-२० आणि सीपीएल या लीगमध्ये खेळणाऱ्या पार्ल रॉयल्स आणि बार्बाडोस ट्रायडंट्स या दोन फ्रॅन्चायझींच्या मालकीचाही समावेश आहे.

मित्तल कुटुंबाने राजस्थान रॉयल्सच्या संपूर्ण फ्रॅन्चायझी पोर्टफोलिओची मालकी मिळविण्यासाठी, त्याचे मागील मालक बदले आणि त्यांच्या समूहाशी 'निर्णायक करार' केला आहे. हा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर, राजस्थान रॉयल्सची सुमारे ७५ टक्के मालकी मित्तल कुटुंबाकडे असेल, तर आदर पूनावाला यांच्याकडे सुमारे १८ टक्के मालकी असेल, असे या अधिग्रहण प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व पक्षांनी रविवारी जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे.

उर्वरित सुमारे ७ टक्के मालकी ही, मनोज बदले यांच्यासह, यापूर्वीच मान्यता मिळालेल्या विद्यमान गुंतवणूकदारांकडे राहील, असेही यात नमूद करण्यात आले आहे.

या नवीन व्यवहारामुळे, मार्च महिन्यात राजस्थान रॉयल्सला विकत घेण्यासाठी अमेरिकेतील क्रीडा क्षेत्रातील उच्चभ्रू गुंतवणूकदारांच्या एका समूहाशी झालेला १.६३५ अब्ज डॉलर्सचा (सुमारे १५,२९० कोटी रुपये) व्यवहार मागे पडला आहे. ती बोली ॲरिझोना येथील तंत्रज्ञान उद्योजक कल सोमानी यांच्या नेतृत्वाखालील एका समूहाने लावली होती; या समूहात दोन फ्रॅन्चायझींचे मालक - रॉब वॉल्टन (डेन्व्हर ब्रॉन्कोस) आणि मायकल हॅम्प (डेट्रॉईट लायन्सच्या मालक शीला फोर्ड हॅम्प यांचे पुत्र) - यांचाही समावेश होता. (वृत्तसंस्था)

# बारानिकाने स्वतःचाच राष्ट्रीय विक्रम मोडला

## इंडियन इनडोअर ओपन ॲथ्लेटिक्स | ४.२३ मीटरची झेप घेतली

◆ **भुवनेश्वर, ३ मे**

भुवनेश्वर येथे आयोजित इंडियन इनडोअर ओपन संयुक्त ॲथ्लेटिक्स स्पर्धेत शनिवारी कुलदीप कुमारने पुरुषांच्या बांबू उडी स्पर्धेतील राष्ट्रीय विक्रम मोडला आणि रविवारी महिलांच्या बांबू उडी स्पर्धेत तामिळनाडूच्या बारानिका एलांगोवनने ४.२३ मीटरची उंची पार करत, महिलांच्या गटातील स्वतःचाच राष्ट्रीय विक्रम अधिक उंचावला.

एप्रिलमध्ये झालेल्या इनडोअर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये ४.२२ मीटरचा मागील राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करणाऱ्या बारानिकाने सुरुवातीला ३.९० मीटर आणि ३.९५ मीटर अशा माफक उंची पार केल्या; त्यानंतर मात्र तिने टप्प्याटप्प्याने उंची वाढवत नेली.

त्यानंतर तिने ४.०० मीटर आणि ४.१० मीटरची उंची पहिल्याच प्रयत्नात पार केली. अखेरीस, ४.२३ मीटरच्या उंचीसाठीच्या आपल्या तिसऱ्या आणि अंतिम प्रयत्नात ती यशस्वी ठरली आणि अशा प्रकारे तिने आपल्या राष्ट्रीय विक्रमात सुधारणा केली.



या वर्षाच्या सुरुवातीला, इंडियन ओपन जम्प्स स्पर्धेत बारानिकाने ४.१० मीटरचा टप्पा पार केला होता; याद्वारे तिने ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाने आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी निश्चित केलेली पात्रता मर्यादा गाठली होती. सध्या ही उंच उडीपटू राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी आवश्यक असलेल्या ४.४५ मीटरच्या पात्रता निकषाचा पाठपुरावा करीत आहे. (वृत्तसंस्था)

### आयपीएल २०२६ गुणतालिका

| संघ | सामने | विजय | पराभव | गुण | नेट रनरेट |
|---|---|---|---|---|---|
| पंजाब किंग्स | ९ | ६ | १ | १३ | १.०४३ |
| रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू | ९ | ६ | ३ | १२ | १.४२० |
| सनरायझर्स हैदराबाद | १० | ६ | ४ | १२ | ०.६४४ |
| राजस्थान रॉयल्स | १० | ६ | ४ | १२ | ०.५१० |
| गुजरात टायटन्स | ९ | ५ | ४ | १० | -०.१९२ |
| चेन्नई सुपर किंग्स | ९ | ४ | ५ | ८ | ०.००५ |
| दिल्ली कॅपिटल्स | ९ | ४ | ५ | ८ | -०.८९५ |
| कोलकाता नाईट रायडर्स | ९ | ३ | ५ | ७ | -०.५३९ |
| मुंबई इंडियन्स | ९ | २ | ७ | ४ | -०.८०३ |
| लखनौ सुपर जायंट्स | ८ | २ | ६ | ४ | -१.१०६ |

# मुंबई, लखनौ यांच्यात अस्तित्वासाठीची लढत

◆ **मुंबई, ३ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी वानखेडे स्टेडियमवर यजमान मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. मुंबई तसेच लखनौला बाद फेरीची आशा कायम राखण्यासाठी हा सामना जिंकणे अत्यावश्यक आहे, मात्र या लढतीत कोण बाजी मारतो, हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

या हंगामातील आयपीएलच्या प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवण्याची शक्यता आता पूर्णपणे मावळली असली, तरीही गुणतालिकेत तळाशी असलेल्या लखनौ सुपर जायंट्सचा सामना करताना, आपले सध्या अडचणीत असलेले स्टार खेळाडू हार्दिक पांड्या व सूर्यकुमार यादव चांगली कामगिरी करतील, अशी आशा पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सला असेल.

शनिवारी झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सवर मात करून त्यांना स्पर्धेच्या बाहेर होण्याच्या उंबरठ्यावर आणून सोडले. लखनौ संघाचीही तीच गती आहे आणि अशा परिस्थितीत आता मुंबईला लखनौशी दोन हात करायचे आहे. मुंबईने नऊ पैकी दोन सामन्यात विजय मिळविले असून सात सामन्यांत पराभवाचा सामना केला. मुंबई ४ गुणांसह दहा संघांच्या गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहेत, तर लखनौने आठ सामन्यांपैकी दोन सामन्यांत विजय नोंदविले व सहा सामन्यात पराभव पत्करला. ते ४ गुणांसह तळाच्या स्थानी आहे.



हार्दिक पांड्या



ऋषभ पंत

**आजचा सामना**
**मुंबई वि. लखनौ**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

आयपीएल प्ले-ऑफच्या शर्यतीत टिकून राहण्याची त्यांची आशा आता जवळपास संपुष्टात आली असली, तरीही पात्र ठरण्याची एक पुसटशी शक्यता अजूनही शिल्लक आहे.पण त्याआधी, मुंबई इंडियन्सला त्यांच्या भारतीय खेळाडूंनीच संघाची मुख्य धुरा सांभाळणे गरजेचे आहे, जी गोष्ट आतापर्यंत घडलेली नाही. (वृत्तसंस्था)



मुंबई येथे इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स मॅनेजमेंट (आयआयएसएम) मध्ये आयोजित पदवीदान समारंभादरम्यान, एका उत्तीर्ण विद्यार्थिनीला पदवी प्रदान करताना भारतीय महिला संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार (उजवीकडे) आणि क्रिकेटपटू जेमिमाह रॉड्रिग्ज

### ४ बाय १०० मिश्र रिलेत भारतीय संघाचा विक्रम

**चेन्नई** : जागतिक ॲथ्लेटिक्स रिले २०२६ स्पर्धेत रविवारी पार पडलेल्या हीट्स (प्राथमिक फेरी) दरम्यान भारतीय संघाने ४ बाय १०० मिश्र रिले शर्यतीचा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. राहुल कुमार, नित्या गंधे, अनिमेष कुजूर आणि स्नेहा एस.एस. या चार धावपटूंच्या संघाने ४१.३५ सेकंदांची वेळ नोंदवित, यापूर्वीचा ४२.३० सेकंदांचा विक्रम सुधारला. हा आधीचा विक्रम मार्च महिन्यात चंदीगड येथे झालेल्या ओपन रिले स्पर्धेदरम्यान लालू प्रसाद, उन्नती अयप्पा, हरिता भद्रा आणि जयराम डी. यांनी प्रस्थापित केला होता. या शर्यतीत राष्ट्रीय विक्रम नव्याने लिहिला गेला असला, तरी ही वेळ भारतीय संघाला अंतिम फेरीत स्थान मिळवून देण्यासाठी पुरेशी ठरली नाही.



# टेबल टेनिस स्पर्धेत महाराष्ट्रास उपविजेतेपद

## सोलापूरच्या मनीष रावत, अनंत कुलकर्णी यांचा संघात समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

पुणे बालेवाडी येथे झालेल्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राने ५० वर्षांवरील गटात उपविजेतेपद संपादिले. अंतिम सामन्यात महाराष्ट्राला गुजरातकडून कडव्या लढतीनंतर २-३ असा पराभव स्वीकारावा लागला. या संघात सोलापूरच्या मनीष रावत व अनंत कुलकर्णी यांच्याबरोबरच मुंबईच्या ग्रोवर शरद, नचिकेत देशपांडे व अमित श्रॉफ यांचा समावेश होता. यांनी गुजरातबरोबरत कडवी झुंज दिली. परंतु गुजरातने बहारदार खेळी करीत विजेतेपद खेचून आणले.

महाराष्ट्र संघाच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, डॉ. नितीन तोष्णीवाल व झेड. एम. पुणेकर यांनी अभिनंदन केले.

# लोकमंगल पतसंस्था पाच गटात प्रथम

## लोकमंगल समूह क्रीडा स्पर्धा : लोकमंगल कॉलेजला व्हॉलिबॉल स्पर्धेत विजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मे-**

लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशन आयोजित लोकमंगल समूह क्रीडा स्पर्धेत लोकमंगल पतसंस्थेने क्रिकेट, खो-खो पुरुष व महिला गटात, कबड्डी तसेच महिलांच्या रस्सीखेच अशा पाच गटात विजेतेपद पटकाविले. लोकमंगल महाविद्यालयाने व्हॉलिबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. क्रिकेट स्पर्धेत लोकमंगल बँकेने उपविजेतेपद संपादिले.

लोकमंगल परिवाराचा वर्धापन दिन, लोकमंगल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच लोकमंगल समूह क्रीडा स्पर्धा २०२५ चा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि प्रेरणादायी वातावरणात लोकमंगल कॉलेज, वडाळा येथे लोकमंगल परिवाराचे कुटुंब प्रमुख आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते पार पडला. यावेळी लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख, लोकमंगल कॉलेजच्या सचिव डॉ. अनिता ढोबळे, लोकमंगल पतसंस्थेच्या व्यवस्थापिका अलका देवडकर, कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सरोजनी निकम, सचिव सदन सुरवसे, दीपाली कोठारी, शोभा बोल्ली आदी उपस्थित होते. प्रास्ताविक रोहन देशमुख यांनी केले.



### उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा गौरव

यावेळी आयोजित वक्तृत्व स्पर्धेत परमेश्वर जाधव, रेणुका वाघमोडे, स्वप्निल कदम, अजित कुरे, सतीश लोंढे व सुदन सुरवसे यांनी सहभाग घेतला. विभागस्तरावर उत्कृष्ट कर्मचारी म्हणून अभिजीत भोईटे, रेवणसिद्ध सिद्धापुरे, सुनील शिंदे, पार्वती निचरे, गणेश भोपळे, हेमंत भोसले, मयुरा अवताडे व नितीन अलकुंटे यांचा गौरव करण्यात आला. तसेच लोकमंगल परिवाराकडून उत्कृष्ट कर्मचारी म्हणून सचिन फुगे, अमोल शिंदे, सचिन परमशेट्टी, अंकुश गायकवाड, मेहबूब शेख, अंजीखनी व राजश्री यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात एकपात्री नाटक, भारूड, समूह नृत्य आदी सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत आणली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





सोलापूर : पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चिमुकलीवर झालेल्या अत्याचारप्रकरणी चौपाड विठ्ठल मंदिरात सभा झाली. यावेळी संताप व्यक्त करताना खा. ज्योती वाघामारे.

# अक्कलकोट तालुक्याचा बारावीचा निकाल ६४.६२ टक्के

## निकालाची घसरण सुरुच; गेल्या वर्षी पेक्षा २ टक्यांनी कमी निकाल

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि ३ मे -**

अक्कलकोट तालुक्याचा उच्च माध्यमिक ( बारावी ) परीक्षेचा एकुण निकाल ६४.६२ टक्के इतका लागला. गेल्या वर्षी पेक्षा यंदाचा निकाल २ टक्यांनी कमी लागला आहे. त्याच्या आदल्या वर्षी २७ टक्यांनी कमी झाला होता. तालुक्याची निकालाची घसरण सुरूच असून ९३.४३ टक्केचा निकाल घसरून गेल्या वर्षी ६६.४३ इतका लागला होता.आता तो परत दोन टक्क्यांनी घसरून ६४.६२ लागला.

शनिवारी दुपारी विद्यार्थ्यांनी मोबाईलवर निकाल पाहिला.अक्कलकोट तालुक्यातुन २५९७ विद्यार्थी अर्ज भरले होते, त्यापैकी परीक्षेस २५४१ विद्यार्थी बसले. त्यापैकी १६४२ (६४.६२ टक्के) विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये फक्त ३१ विद्यार्थी विशेष प्राविण्यात असून २३५ विद्यार्थी प्रथम श्रेणी व ९३३ द्वितीय श्रेणी व पास श्रेणीमध्ये तब्बल ४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकाल जाणुन घेतल्यानंतर त्याची प्रिंट घेण्यासाठी कॉम्पयुटर सेंटरवर गर्दी केली. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी लक्ष्मी दुग्धालय व स्वीट दुकानातून पेढा खरेदीसाठी पालकांनी गर्दी केली. सी.बी.खेडगी महाविद्यालयाचा शास्त्र शाखेचा निकाल ८७.६८ टक्के, कला शाखेचा निकाल ४५.४५ टक्के, वाणिज्य शाखेचा ५८.६६ टक्के असा एकुण ६९.२४ टक्के निकाल लागला. मंगरूळे ज्युनिअर कॉलेजचा निकाल ३९.८० टक्के, बसवराज ज्युनिअर कॉलेज (करजगी) चा निकाल ५५.८८ टक्के, चपळगांव ग्रामीण विद्याविकास ज्युनिअर कॉलेजचा निकाल ४८.२७ टक्के, मैंदर्गी शाब्दी उर्दु कॉलेजचा शास्त्र शाखेचा ९४.५९ टक्के, कला शाखेचा ६० टक्के, एकुण निकाल ७६.६२ टक्के, श्री सिद्धरामेश्वर तोळणुर ज्युनिअर कॉलेजचा निकाल २३.३३ टक्के, चुंगी ज्युनिअर कॉलेजचा निकाल ४५.८३ टक्के, तडवळचा ४७.३६ टक्के, नागणसुरचा ४२.१० टक्के लागला.

सिद्धाराम म्हेत्रे ज्युनिअर कॉलेज स्टेशनचा निकाल ९०.३२ टक्के, शिवचलेश्वर मैंदर्गी कॉलेजचा शास्त्र शाखेचा १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ५० टक्के, एकुण ७३.३३ टक्के, रूध्देवाडी सिद्धाराम म्हेत्रे कॉलेजचा विज्ञान शाखेचा ८९.२७ टक्के व कला शाखेचा २६.०८ एकुण ६६.१२ टक्के, कोन्हाळी ज्युनिअर कॉलेजचा विज्ञान शाखेचा ७३.०७, कला शाखेचा २२.५८ टक्के एकुण निकाल ५४.२१ टक्के, नागनळ्ळी आश्रमशाळेचा विज्ञान शाखेचा ८६.६६ टक्के व कला शाखेचा ४६.१५ टक्के एकुण निकाल ७४.४१ टक्के, केगांव बु ३६.११ टक्के, श्री गुरुशांतलिंगेश्वर महाविद्यालय (दुधनी) विज्ञान शाखेचा ८९.७९ टक्के व कला शाखेचा ५७.५३ टक्के एकुण निकाल ७०.४९ टक्के, कडबगांवचा विज्ञान शाखेचा ९८.४८ टक्के व कला शाखेचा ७२.९७ टक्के एकुण निकाल ८९.३२ टक्के, एस. एस. शेळके महाविद्यालय (वागदरी ) विज्ञान शाखेचा ८४.७४ टक्के, वाणिज्य शाखेचा १९.३५ टक्के व कला शाखेचा २० टक्के एकुण निकाल ५१.६६ टक्के, अनंत चैतन्य हन्नुरचा ६३.३३ टक्के, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कॉलेजचा वाणिज्य ७९.०६ टक्के व विज्ञान शाखेचा १०० टक्के व कला शाखेचा ६८.५७ टक्के एकुण निकाल ८६.५७, गौडगांव बु जे. पी. कॉलेजचा निकाल ७४.५४ टक्के, जेऊरचा श्री काशीविश्वेश्वर महाविद्यालय ४८.३८ टक्के, काशिराया काका पाटील अक्कलकोट कॉलेजचा ३२.३५ टक्के लागला. इंडियन माँडेल स्कूल शास्त्र शाखा १०० टक्के, खेडगी व्होकेशनल ६८.९१ टक्के, चप्पळगांव व्होकेशनलचा निकाल ४२.१० टक्के तर बसवराज माध्यमिक व्होकेशनलचा निकाल ३०.३० निकाल लागला.

### यंदा तीन महाविद्यालयांचा १०० टक्के निकाल

गेल्या वर्षी तालुक्यात एकाही कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला नव्हता. त्या आधीच्या वर्षी तालुक्यात नऊ कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला होता. यंदा तीन कॉलेजचा निकाल शंभर टक्के लागला. त्यामध्ये शिवचलेश्वर हायस्कूल मैंदर्गी, सौ. सुरेखा कल्याणशेट्टी महाविद्यालय व इंडियन मॉडेल स्कूल या तीन शाळेच्या निकाल शंभर टक्के लागला.

### कॉपीमुक्त अभियान यशस्वी

अक्कलकोट तालुक्याचा बारावीचा निकाल ६४.६२ टक्के लागला. यंदा कॉपीमुक्त अभियानांतर्गत तालुक्यात कडक परीक्षा घेण्यात आल्या. परिणामी गेल्यावर्षीपेक्षा २ टक्के ने निकाल कमी लागला.

# कारचालकाच्या प्रसंगावधानामुळे वाचले विद्यार्थिनीचे शैक्षणिक वर्ष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मे-**

प्रसंगावधान आणि माणुसकी जिवंत असेल, तर कठीण प्रसंगातही मार्ग सापडतो, याचाच प्रत्यय आज सोलापुरात पाहायला मिळाला. परीक्षेसाठी चुकीच्या केंद्रावर पोहोचलेल्या एका विद्यार्थिनीला अवघ्या ५ मिनिटांत योग्य केंद्रावर पोहोचवून, कार चालक विरेश कंदगुळे यांनी तिचे वर्ष वाया जाण्यापासून वाचवले. त्यांच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे.



रविवार, ३ मे २०२६ रोजी परीक्षा होती. सोलापुरातील अक्कलकोट रोडवरील एस व्ही सी एस शाळा येथे एका विद्यार्थिनीला तिच्या आईने परीक्षा केंद्रावर सोडले. आत गेल्यावर शिक्षकांनी कागदपत्रे तपासली असता, तिचे परीक्षा केंद्र हे अक्कलकोट रोड एस व्ही सी एस नसून भवानी पेठ एस व्ही सी एस असल्याचे समोर आले. या गोंधळात वेळ दुपारी १:२२ ची झाली होती. केंद्राचे गेट दुपारी १:३० वाजता बंद होणार होते. हाती फक्त ८ मिनिटे होती. आईला फोन लावला असता तो लागला नाही, ज्यामुळे विद्यार्थिनी घाबरून रडायला लागली.

विद्यार्थिनीचे रडणे पाहून तेथील शिक्षकांनी केंद्राबाहेरील पालकांना मदतीचे आवाहन केले. त्यावेळी तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष आणि डॉ. अरुंधती हराळकर यांच्या मुलाला परीक्षेसाठी सोडण्यासाठी आलेले मिताली ट्रॅव्हल्सचे चालक विरेश कंदगुळे हे तातडीने पुढे आले. वेळेचे गांभीर्य ओळखून १:२४ वाजता त्यांनी विद्यार्थिनीला कारमध्ये बसवले. अक्कलकोट रोड ते भवानी पेठ हे अंतर कापण्यासाठी त्यांच्याकडे खूपच कमी वेळ होता. जर १:३० च्या आत ती पोहोचली नसती, तर तिचे वर्षभराचे कष्ट वाया गेले असते. कोणताही विलंब न लावता, विरेश कंदगुळे यांनी शिताफीने गाडी चालवत अवघ्या ५ मिनिटांत म्हणजेच १:२९ वाजता भवानी पेठ येथील परीक्षा केंद्र गाठले. अवघ्या एक मिनिटाचा अवधी शिल्लक असताना ती विद्यार्थिनी केंद्रात प्रवेश करू शकली.

ओळखीचा संबंध नसताना केवळ एका विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या उदात्त भावनेतून विरेश कंदगुळे यांनी केलेल्या या मदतीमुळे सोलापूरच्या स्मार्ट माणुसकीचे दर्शन घडले आहे. शिक्षकांनी आणि पालकांनी त्यांचे मनापासून आभार मानले आहेत.



# माजी विद्यार्थी बनला शाळेचा मुख्याध्यापक

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. ३ मे**

येथील चंद्रशेखर विद्यालयात शिक्षण घेवून डीएडनंतर याच शाळेत शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळालेले शंकर यादव आज मुख्याध्यापक म्हणून विराजमान झाले. १ मे कामगार दिनाचे औचित्य साधत पहिल्याच दिवशी तिरंगा राष्ट्रीय ध्वज फडकावण्याचा मान त्यांना मिळाला .

मुळचे श्रीपूरचेच असलेले शंकर यादव यांनी ३५ वर्षांपूर्वी चंद्रशेखर विद्यालय प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून सेवेस सुरुवात केली. शाळेच्या प्रत्येक उपक्रमात हिरीरीने भाग घेण्याच्या त्यांच्या कृतीमुळे व अंगभूत स्काऊट गाईडचे आकर्षणामुळे त्यांना शाळा व्यवस्थापनाने त्याची जबाबदारी सोपवली. ही जबाबदारी उत्तम पार पाडत त्यांना जिल्हा ट्रेनिंग कमिशनर या पदावर बढती मिळाली. त्यांनी विद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांना स्काऊट गाईडचे प्रशिक्षण दिले. अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनींची राष्ट्रीय पातळीवर नवी दिल्ली येथे सुवर्ण बाण स्पर्धेत निवड होऊन पुरस्कार प्राप्त झाले. या बरोबरच शंकर यादव यांनी लहान मुलांना पुस्तक वाचण्याची आवड निर्माण होण्यासाठी तसेच संस्कारक्षम पुस्तकांची निर्मितीही केली आहे. शाळेचे अध्यक्ष डॉ. रामदास देखमुख यांनी सुरेखा जाधव निवृत्त झाल्यानंतर मुख्याध्यापक म्हणून शंकर यादव यांची नियुक्ती केली. चतुरस्त्र असणाऱ्या व्यक्तिमत्वाचा हा सन्मानच आहे. श्रीपूरमधील अनेक संस्थांनी शंकर यादव यांचे अभिनंदन केले आहे.

# पंढरपूरच्या निर्भया पथकाला बालविवाह रोखण्यात यश

## दीड महिन्यात सलग तिसरा बालविवाह रोखण्यात यश

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. ३ मे -**

पंढरपूर तालुका निर्भया पथकाने ३ मे रोजी तलुका हद्दीत होणारा बालविवह रोखला. दीड महिन्यात तिसरा बालविवाह रोखून आपली उत्कृष्ट कामगिरी सिद्ध केली आहे.



सहायक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांना बालकल्याण समिती अध्यक्ष समीर सय्यद यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे पंढरपूर तालुका हद्दीत एक बालविवाह होत असल्याचे बातमी मिळाली. त्यानंतर त्यांच्या सूचनेनूसार निर्भया पथक पंढरपूर यांनी सदर ठिकाणी तात्काळ जावुन चौकशी केली. तेव्हा सुरुवातीला मुलीचे नातेवाईकांनी मुलीचे वय १८ वर्षे पुर्ण आहे. तिची बारावी होवून खुप वर्षे झाल्याचे सांगितले, मात्र निर्भया पथकाने चौकशी करुन ती शिकत असलेल्या शाळेतुन तिचे बोनाफाईड प्रमाणपत्र घवून आले असता तिचे वय हे १७ वर्षे ५ महिने दिसुन आले. त्यानंतर तो होणारा विवाह तिचे आई वडीलांना समज देवुन तत्काळ रोखण्यात आला आहे. त्या अल्पवयीन मुलीस बालकल्याण समिती, सोलापूर यांचेसमक्ष पुढील कार्यवाहीसाठरी हजर करण्यात आले.

निर्भया पथक, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, पंढरपूर ग्रामीण तसेच करकंब पोलीस ठाणे हद्दीतील जनतेला आपले हद्दीत, आपल्या नातेवाईकांमध्ये अशा प्रकारचे बालविवाह होत असल्यास आम्हास, निर्भया पथकास संपर्क करावा (९१११२२२६३५२) व यापुढे कोणी अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करेल अशा लोकांवर कडक कारवाई केली जाईल,असे सांगितले आहे.

ही कारवाई अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण प्रितम यावलकर , अप्पर पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण, प्रशांत डगळे, सहा. पोलीस अधिक्षक (भा.पो.से) पंढरपूर विभाग, पोलीस निरिक्षक तय्यब मुजावर पंढरपूर तालुका यांचे मार्गदर्शनाखाली निर्भया पथक प्रमुख महिला पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया यादव(रावण) म. पोकॉ. वाघमारे, पोकॉ सावंत, म. पोकॉ. काझी, पंढरपूर तालुका पो.स्टे. नेमणुकिस असलेले पोहेकॉ.ऋ भोसले यांनी पार पाडली.

# पोलिस दलामध्ये भरती झालेल्या विद्यार्थ्यांचा रिपाइंतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३ मे-**

हालाखीच्या परिस्थितीतून मार्ग काढत महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेल्या सानिका वाडकर, सद्दाम शेख, प्रज्वल धनवटे, कर्तव्य धनवटे, नागेश साठे आणि मनीषा धनवटे यांचा रिपाइं आठवले गटाचे तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



जिल्हा परिषद सदस्या मीनाक्षी मिलिंद सरतापे, वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, शहराध्यक्ष शरद साबळे, बॉबी वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, माजी सदस्य गणेश साठे, लहुजी फाऊंडेशनचे अध्यक्ष अजित साठे, धनाजी धांडोरे, प्रदीप वाडकर, दादा शिवपालक, ओंकार सरतापे, प्रथमेश केसकर, एकनाथ बाबळे, विश्वतेज सरतापे, ऋषी मगर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रजनीश बनसोडे होते. यावेळी बनसोडे, मिलिंद सरतापे, हनुमंत वायदंडे व अजित साठे यांनी मनोगत व्यक्त केले. रजनीश बनसोडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अथक परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले असून, त्यांचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घ्यावा. सूत्रसंचालन व नियोजन तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

### ही केवळ नोकरी नसून स्वप्नपूर्ती

खडतर संघर्षाच्या वाटेवरून जिद्दीने पुढे जात, प्रचंड इच्छाशक्तीच्या बळावर धनवटे कुटुंबातील दोन सख्या भावांनी मुंबई पोलीस होण्याचा मान पटकावला. ही केवळ नोकरी नसून स्वप्नपूर्ती, कष्ट आणि जिद्दीची जिंकलेली लढाई आहे. त्यांच्या आई-वडील व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन, असे तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी नमूद केले.



# वेळापूर ग्रामपंचायत येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा

**वेळापूर, दि. ३-**

वेळापूर ग्रामपंचायत येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. कामगार दिनाचे औचित्य साधून सरपंच रजनीश बनसोडे यांनी झेंडावंदनाचा मान ग्रामपंचायत कर्मचारी धनाजी धांडोरे यांना दिला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या मीनाक्षी सरतापे, उपसरपंच नानासो मुंगुस्कर, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे यांच्यासह ग्राम पंचायत सदस्य अमृत माने, देशमुख, शिवाजी पनासे पाटील, रविराज गायकवाड, प्रियंका आडत, सीमा खाडे तसेच रायचंद खाडे, रहीम मुलाणी आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामपंचायतीचे कर्मचारी व ग्रामस्थही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# लिंगायत राज्यस्तरीय वधु-वर पालक परिचय मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

मातोश्री सिद्धवाबाई संस्कृतिक भवन हत्तुरे वस्ती विमान स्थळ समोर सभागृहात राज्यस्तरीय लिंगायत वधु- वर व पालक परिचय मेळावा उत्साहात झाला. सुमारे २५० वधू -वर व पालकांनी लाभ घेतला. प्रारंभी शिवयोगी सिद्धरामेश्वर व महात्मा बसवेश्वर यांचे प्रतिमेची पूजा उद्योजक शंकर लिंगे, जागतिक लिंगायत महासभा अध्यक्ष प्रा.शिवानंद गोगाव यांच्या हस्ते झाली. जागतिक लिंगायत महासभा प्रदेश कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे अध्यक्षस्थानी होते. मेळाव्यासाठी स्वागताध्यक्ष आप्पासाहेब शेगावे, कार्यवाहक प्रियांका शेगावे, सुनिल दलाल, निलेश पाटील, श्रीशैल पॅडशिंगे, निलेश पाटील यांनी परिश्रम घेतले. प्रियांका शेगावे यांनी आभार मानले.

# दक्षिण तालुका अखिल भारतीय किसान सभेची कार्यकारिणी जाहीर

**दक्षिण सोलापूर, दि. ३ मे -**

अखिल भारतीय किसान सभा दक्षिण सोलापूर तालुका अधिवेशन उत्साहात पार पडले. अधिवेशनात नुतन तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी हमीभाव, कर्जमाफी, वीज दर कमी, सिंचन सुविधा वाढविणे तसेच शेतीमालाला योग्य बाजारपेठ आदी मुद्यांवर चर्चा करण्यात आली. अधिवेशनात तालुक्यातील शेतकरी, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी तालुकाध्यक्ष म्हणून कॉ. जावेद आवटे, सचिव म्हणून कॉ. भीमाशंकर झळके आणि खजिनदार म्हणून उमेश पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. अधिवेशनास जिल्हा सचिव कॉ. सुलेमान शेख व जिल्हा सहसचिव कॉ. दत्ता चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कॉ दत्ता चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. नूतन कमिटीत अध्यक्ष-जावेद आवटे, उपाध्यक्ष-परमेश्वर पुजारी, उपाध्यक्ष-सिकंदर मकानदार, सचिव - भीमाशंकर झळके, कार्याध्यक्ष-मल्लिकार्जुन कांबळे, सहसचिव-चिदानंद बगले, खजिनदार-महेश पाटील. सदस्य - सोमनिंग पुजारी, विश्वनाथ बबलेश्वर, मुझम्मील शेख, शांतकुमार कोष्ठी, श्रीशैल मधभावी, संतोष पुजारी आदी निवडी जाहीर केल्या. माळसिद्ध जाधव, फारुख शिकलगार, षडाक्षरी स्वामी, प्रकाश पाटील, आंबाण्णा जोकरे, शिवराज कोरे, गुंडू कोले, श्रीकांत स्वामी, यासिन मकानदार, महासिद्ध माशाळे, सूर्यकांत कुंभार, पैगंम्बर नदाफ, सद्दाम मकानदार, श्रीशैल मुंजे, इकबाल आवटे, मल्लिकार्जुन बिराजदार, तुकाराम मळेवाढी, शिवानंद सालोटगी आदी उपस्थित होते.



# भीम जयंती निमित्त पंचशील नगर वेळापूर येथे मिरवणूक उत्साहात

तभा वृत्तसेवा,
वेळापूर, दि.३ **मे-**

भीम जयंतीनिमित्त पंचशील नगर, वेळापूर येथे आयोजित भव्य मिरवणुकीच्या प्रारंभी आमदार उत्तम जानकर यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रथाचे पूजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या मीनाक्षी सरतापे, सरपंच रजनीश बनसोडे, रिपाइंचे राज्य उपाध्यक्ष नंदकुमार केंगार, विकास धाईंजे, किरण धाईंजे, रिपाइं तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, दादाराजे घाडगे, काशिनाथ आडत, शिवाजी बनसोडे, गोपाळ क्षीरसागर, माजी उपसरपंच जावेद मुलानी, ग्राम पंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, रविराज गायकवाड, विजय बनसोडे, नितीन लोंढे, राजकुमार बनसोडे, भैय्यासाहेब बाबर, प्रदीप धाईंजे, शिवाजी मोहिते, शाम सावंत, युवराज मंडले, प्रदीप सरवदे, साहिल आतार तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष सतीश कांबळे, उपाध्यक्ष जीवा लोंढे, गणेश धांडोरे, शंकर लोंढे, हर्षद बनसोडे, आबा बनसोडे, आदेश मोरे, समाधान बनसोडे, अण्णा बनसोडे, शशिकांत लोंढे, दीपक माने आदी मान्यवर उपस्थित होते.

जय भीमच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. बाबासाहेबांच्या


# डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे तिसरे राष्ट्रीय महाअधिवेशन आज पणजीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

देशातील डिजिटल मीडियाच्या क्षेत्रातील सर्वात मोठी संघटना असलेल्या डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे तिसरे राष्ट्रीय महाअधिवेशन ४ मे रोजी पणजी, गोवा येथील कला अकादमी येथे होणार आहे. सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनाचे उद्घाटन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि केंद्रीय ऊर्जा मंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते होणार आहे.

स्वागताध्यक्ष म्हणून गोव्याचे समाजकल्याण मंत्री सुभाष फळदेसाई उपस्थित राहणार असून महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उद्योग मंत्री उदय सामंत, गोव्याचे कला, संस्कृती व क्रीडा मंत्री रमेश तवडकर, आमदार निलेश राणे, आयुष्मान भारत योजनेचे महाराष्ट्र नोडल अधिकारी डॉ. ओमप्रकाश शेटे, गोव्याचे माजी उपमुख्यमंत्री चंद्रकांत कवळेकर, खासदार सदानंद शेठ तानावडे, आमदार शिवाजी पाटील तसेच भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनाची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, गोवा प्रदेशाध्यक्ष अनिल पाटील, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत आणि राज्य सचिव विकास भोसले यांनी दिली. पत्रकार परिषदेला राष्ट्रीय उपाध्यक्ष अमोल पाटील, महेश कुगावकर, राष्ट्रीय महासचिव तेजस राऊत, मुंबई विभाग अध्यक्ष शशिकांत देशमुख, उपाध्यक्ष संजय भैरे, सागर चव्हाण, कोकण विभाग अध्यक्ष रुपेश पाटील आणि सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भरत केसरकर उपस्थित होते. महाअधिवेशनात महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सामंत यांची विशेष प्रकट मुलाखत राजा माने घेणार आहेत. याशिवाय विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. दुपारच्या सत्रात परिसंवाद असून 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संविधानिक स्वरूप', 'समाजमाध्यमांचा न्यायालयीन प्रक्रियेतील अडथळा' आणि 'डिजिटल मीडियामध्ये एआयचा प्रभावी वापर' हा विषय आहे. अधिवेशनात डिजिटल मीडियाच्या विविध मागण्यांबाबत केंद्र व राज्य शासनाकडे ठराव सादर करणार असल्याचे अध्यक्ष राजा माने यांनी व्यक्त केला.



### राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६ जाहीर

कमलाकांत तारी (गोवा) - गोवंश संवर्धन, डॉ. महुवा साह (गोवा) - शास्त्रज्ञ, आमदार निलेश राणे - उत्कृष्ट विधिमंडळ कार्य, कमलेश बांदेकर (गोवा) - योग प्रसार, दीपक नार्वेकर (गोवा) - उत्कृष्ट प्रशासन, गुरुप्रसाद पावसकर (गोवा) - आयुक्त, दिव्यांग संचालनालय, नेहा आंग्रे (गोवा) - समाजसेवा, प्रकाश कुलकर्णी (मुंबई) - कृषी, माणिक तुकाराम शेडगे (सातारा) - सामाजिक कार्य, चित्रा क्षीरसागर (गोवा) - कवयित्री व साहित्यिक, निलेश सांबरे (पालघर) - ग्रामसेवा, प्रा. विशाल गरड (बार्शी) - प्रबोधन, राधा खताळ (बीड) - कार्यक्षम सरपंच, गोवर्धन दराडे (बीड) - अनाथ संगोपन, संतोष ठोंबरे (बार्शी) - उद्योग, पद्मज गुप्ता (नागपूर) - गोसेवा, राकेश अग्रवाल (मुंबई) - सामाजिक कार्य, राजेंद्र पाठक (मुंबई) - बाल मदत, विकास देशमुख (मुंबई) - आरोग्य सेवा, ग्रामविकास नागझरी - जलसंधारण व ग्रामविकास (संस्थात्मक पुरस्कार)

# पं.शौनक अभिषेकी यांच्या गायनाने पंढरपुरकर मंत्रमुग्ध

## यशवंत वैष्णव यांच्या दमदार तबलावादनाची रंगत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३ मे-**

तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान पुणे व नादब्रह्म कला फाउंडेशन करकंब यांच्यातर्फे आयोजित पद्मश्री पं.जितेंद्र अभिषेकी दोन दिवसीय संगीत महोत्सवात त्यांचेच सुपुत्र पं.शौनक अभिषेकी यांचे गायन आणि यशवंत वैष्णव यांच्या दमदार तबला वादनाने पंढरपूरकर कलारसिक मंत्रमुग्ध झाले. सूरमयी वातावरणात पं.जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाची सांगता करण्यात आली.

पं.शौनक अभिषेकी, भगवान मनमाडकर, अर्बन बँकेच्या उपाध्यक्षा माधुरी जोशी यांच्यासह एस.पी. कुलकर्णी, उदय उत्पात, प्रसाद कुलकर्णी, ज्ञानेश्वर दुधाणे, देवकी दुधाणे यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने सुरुवात झाली. भगवान मनमाडकर यांना नादब्रह्म कला फाउंडेशन करकंबतर्फे संगीत सेवा सन्मान पुरस्कार





पं.शौनक अभिषेकी यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

एखादा संगीत महोत्सव सुरु करणं अतिशय सोपं आहे. परंतु ते टिकवणं हे एक शिवधनुष्य असतं. पंढरपूर कलारसिकांनी साथ द्यावी, भारतातील नामवंत ख्यातनाम कलाकार आणण्याची जबाबदारी माझी राहील, असे प्रतिपादन पं.शौनक अभिषेक यांनी केले.

उद्घाटन सत्रानंतर विश्वजित मेस्त्री यांनी राग पूरीया कल्याण विलंबीत एकताल यांसह अन्य रचना सादर केल्या. दुसऱ्या सत्रात पं.शौनक अभिषेकी यांनी राग गोरख कल्याण तालात सादर केला. पंढरपूर कला रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत पं.जितेंद्र अभिषेकी यांची प्रसिध्द बंदिश गायली.

लागी करजवा कट्यार, शब्दावाचून कळले सारे आदी गीते सादर केली. पं.जितेंद्र अभिषेकी यांनी अजरामर केलेली सर्वात्मका सर्वेश्वरा ठेवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर गाऊन गायनाची सांगता केली. त्यांना तबला प्रणव गुरव, हार्मोनियम माधव लिमये, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ शरद जाधव यांनी साथसंगत केली.

निवेदन संकेत कुलकर्णी यांनी केले. कलाकारांची ओळख राजेश खिस्ते यांनी केली. भारत गदगे यांनी कलाकारांचे अप्रतिम स्केच काढून भेट दिले. सत्यजीत बेडेकर यांनी राग ओढव बागेश्री बात आधी रचिली पंढरी, अवघे गर्जे पंढरपूर गाऊन वातावरण भक्तिमय केले. त्यांना तबला अविनाश पाटील, हार्मोनियम अभिषेक शिनकर यांनी साथसंगत केली. यशवंत वैष्णव यांच्या दमदार तबलावादनाने महोत्सवाची सांगता करण्यात आली. अप्रतिम साथ अभिषेक सिनकर यांनी केली. आरती साउंड सिस्टीम धनंजय मनमाडकर यांनी सुंदर सांभाळली.

# मारवाडी युवा मंच महिला मिडटाऊनतर्फे दैनिक 'तरुण भारत'च्या पत्रकारांचा गौरव

## जागतिक पत्रकार दिनाचे औचित्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

जागतिक प्रेस दिनाचे औचित्य साधून मारवाडी युवा मंच महिला मिडटाऊनच्या सोलापूर शाखेतर्फे दैनिक तरुण भारतचे मुख्य समूह संपादक दिलीप पेठे यांच्यासह पत्रकार व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

मंचच्या अध्यक्षा निशा प्रमोद होलाणी, सचिवा सपना नवल काबरा व कोषाध्यक्षा उर्मिला म



धुसुदन बलदवा यांच्यासह अन्य सदस्यांनी दैनिक तरुण भारतच्या कार्यालयात येऊन सर्वांचा यथोचित सत्कार केला.

दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, मुख्य वरिष्ठ उपसंपादक श्रीनिवास गाजूल, उपसंपादक विकास चाटी, डीटीपी ऑपरेटर्स मयुरा तारे, आनंद उपरे, जावेदबाशा जमादार, प्रिसिजन प्रिंटर्सचे सिध्दाराम चिट्टे आदींचा सत्कार करण्यात आला.

# नेत्रदीपक आतषबाजीने भगवंत महोत्सवाची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३ मे-**

बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त येथील भगवंत मैदान येथे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाचा समारोप भव्य दिव्य नेत्रदीपक आतषबाजीने करण्यात आला. या आतषबाजी सोहळ्याचे आयोजन शिवशक्ती अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या वतीने करण्यात आले होते.

व्यासपीठावर बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, बँकेचे सर्व संचालक अधिकारी, कर्मचारी व भगवंत महोत्सवाचे अध्यक्ष सुभाष लोढा, युवा नेते रणवीर राऊत, बाजार समितीचे सर्व संचालक, बार्शी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष, बार्शी नगरपालिकेचे नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगरसेवक, पंचायत समितीचे





सभापती, जिल्हा परिषदचे अध्यक्ष उपस्थित होते.

या आतषबाजी सोहळ्यामध्ये आष्टी जिल्हा बीड येथील इस्माईल सय्यद, म ाणकेश्वर येथील स्टार फायर वर्क्स, गणीभाई आतार अस्लम आतार, मेहबूब आतार, बार्शी एस.एम फायर वर्क्स बार्शी शोएब मणियार, सिद्धेश्वर फायर वर्क्स सोलापूर यांनी सहभाग नोंदविला होता.

नेत्रदीपक आतिषबाजीने बार्शीकरांचे मनोरंजन आणि डोळ्याचे पारणे फेडले व बार्शीकरांनी टाळ्या वाजवून उस्फुर्त प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन श्रीधर कांबळे यांनी केले. माजी आमदार राजेंद्र राऊत व युवा नेते रणवीर राऊत यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली झालेल्या या भगवंत म होत्सवाच्या सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने बार्शीकरांना सांस्कृतिक मेजवानी दिली गेली.




रविवारी 'नीट'ची परीक्षा होती. सोलापूर शहरातील शिवाजी रात्र प्रशाला येथील केंद्रावर झालेली विद्यार्थ्यांची गर्दी.

# नैसर्गिक न्यायाच्या तत्वाला हरताळ; सखोल चौकशीची मागणी

**सोलापूर, दि.३ मे-**

नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाला हरताळ फासून आर्थिक प्रलोभनातून नियमबाह्य कामकाज झाल्याचा गंभीर आरोप करत, माढा तालुक्यातील चव्हाणवाडी (टें) येथील रहिवासी राहुल पोपट चव्हाण यांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. दि.१ मे २०२६ पासून त्यांनी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

मौजे चव्हाणवाडी (टें) येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) शिवाजी सुभाष घाडगे तसेच टेंभुर्णी येथील तत्कालीन मंडळ अधिकारी गंगासागर कमलाकर सोनवणे यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी. संबंधित अधिकाऱ्यांनी आर्थिक प्रलोभन स्वीकारून नियमबाह्य निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जमीन गट क्रमांक ११६/२ व १३३/१/अ/२ या मालमत्तेबाबत गंभीर फसवणुकीचा प्रकार घडला. बनावट सह्या व अंगठ्यांच्या आधारे संगनमताने जमीन परस्पर नावावर करून हडप करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करून सखोल चौकशी करावी, असेही त्यांनी

# पुरुष समीक्षकांना महिला लेखिकेबद्दल काहीसा संकोच असतो : मेघना पेठे

**तभा,वृत्तसेवा**
**सोलापूर,दि. ३ मे-**

प्रसिद्धीसाठी नव्हे, तर सम ाजपरिवर्तनासाठी मी लिहित गेले. म ात्र समीक्षा कधीच माझ्या वाट्याला आली नाही. पुरुष समीक्षकांना महिला लेखिकेबद्दल काहीसा संकोच असतो. खऱ्या अर्थाने लेखकाला न्याय देणारी गोष्ट म्हणजे समीक्षा नव्हे, तर जीवनच असते, असे प्रतिपादन मेघना पेठे यांनी केले.

प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत आयोजित विशेष मुलाखतीत त्या बोलत होत्या. ही मुलाखत प्रख्यात मुलाखतकार सुश्रुत कुलकर्णी यांनी घेतली. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला.

फिक्शन लेखनासाठी प्रसिद्ध असलेल्या पेठे याप्रसंगी




बोलताना पुढे म्हणाल्या, गेल्या वीस वर्षांत त्यांनी पुस्तक लेखन केले नसले, तरी डायरी लेखन करायचे. लहानपणापासूनच डायरी लिहिण्याची सवय असून हे माझ्या म्हातारपणातील मनोरंजन आहे, असे उत्तर माझ्या वडिलांना दिले होते.

प्रत्येकाचे बालपण वेगळे असते, या जाणिवेतून लेखनाला दिशा मिळाली. दीर्घ काळानंतर पुन्हा पुस्तक लेखनाकडे वळताना डायरी लेखनाचे दस्तऐवजीकरण महत्त्वाचे ठरल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इंग्रजी बोलण्याबाबत न्यूनगंड असल्याची कबुली देतानाच त्यांनी नाट्य क्षेत्रातील अनुभवही मांडले.

समाजपरिवर्तनासाठी लेखन आवश्यक असल्याचे सांगताना त्यांनी स्वतःवर लावण्यात आलेल्या 'बोल्ड लेखिका' या शिक्क्याबद्दल स्पष्ट भूमिका घेतली. लैंगिकतेसारख्या विषयांवर त्यांनी केवळ प्रसिद्धीसाठी नव्हे, तर सामाजिक बदलासाठी लेखन केल्याचे त्यांनी ठामपणे अधोरेखित केले.

त्यांच्या 'हंस अकेला' या कथासंग्रहाच्या शीर्षकाविषयी बोलताना, त्या संग्रहातील कथांचा समान धागा 'एकटेपणा' असल्यामुळे हे शीर्षक निवडल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन माधव देशपांडे यांनी केले. या संवादाचा साहित्यप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मनापासून आस्वाद घेतला.

# बार्शीतील व्यावसायिकाची ३.२२ लाखांची फसवणूक

## पुण्यातील व्यापाऱ्याच्या विरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ३ मे-**

बार्शीतील औद्योगिक वसाहतीतील एका व्यावसायिकाची तब्बल ३ लाख २२ हजार ९०० रुपयांची फसवणूक झाली. पुण्यातील व्यापाऱ्याने विश्वास संपादन करून कच्चा माल घेतल्यानंतर पैसे न देता टाळाटाळ केल्याचा आरोप करीत फसवणूक केली म्हणून बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

शाहीर भागवत सावंत (वय-४३, रा.ताडसौंदणे रोड, इंडस्ट्रियल इस्टेट नं. ०२, बार्शी) हे 'श्री दत्त प्लास्टिक' या नावाने पीव्हीसी पाईप निर्मिती व स्क्रॅपचा व्यवसाय करतात. पुणे येथील 'नमो प्लास्ट' कंपनीचे मालक रितेश हणमंतराव मेहता यांच्याशी त्यांची ओळख सागर देवकुळे यांच्या माध्यमातून झाली होती.

सन २०२१ पासून विश्वासाने सावंत हे मेहता यांना कच्चा माल पुरवत होते. दि.२ फेब्रुवारी २०२४ ते २२ एप्रिल २०२४ या कालावधीत सावंत यांनी एकूण १३.४५ टन पीव्हीसी स्क्रॅप असा एकूण ३ लाख २२ हजार ९०० रुपयांचा माल 'नमो प्लास्ट' कंपनीस पाठवला.

एम.एच.१३ बी.क्यू.०५९० या क्रमांकाच्या पीकअप वाहनाचे ड्रायव्हर दत्ता बचुटे यांच्यामार्फत सागर देवकुळे यांच्या उपस्थितीत कंपनीत हा माल पोहोचविण्यात आला. मात्र, त्यानंतर मेहता यांनी पैशांची देयकं देण्यास वारंवार टाळाटाळ केली, असे फिर्यादीत नमूद केले आहे.

# मित्राला पोलिसात तक्रारीचा सल्ला दिल्याने तरुणाची निर्घृण हत्या

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि.३ मे-**

मित्राला झालेल्या मारहाणप्रकरणी पोलिसांत तक्रार देण्यासंबंधी दिलेल्या सल्ल्याचा राग मनात धरुन एका ३१ वर्षीय तरुणाची डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या करण्यात आली. वैराग शहरातील दत्तनगर परिसरात शनिवारी पहाटे ही धक्कादायक घटना उघडकीस आली. दिनेश ऊर्फ आप्पासाहेब कापसे (रा.दत्तनगर, वैराग) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी मयताचा भाऊ ज्ञानेश्वर कापसे यांनी वैराग पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन उल्हास ऊर्फ बबलू दत्तात्रय मुळे (वय-३२) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.



१ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास काही मित्र एका दुकानाजवळ मद्यप्राशन करत बसले होते. यावेळी उल्हास मुळे आणि दिनेश चव्हाण यांच्यात किरकोळ कारणावरून जुंपली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि संतापलेल्या उल्हासने आपल्याजवळील लोखंडी हुक दिनेश चव्हाणच्या हातावर मारून जखमी केले. हा सर्व प्रकार तिथेच उपस्थित असलेला दिनेश कापसे पाहत होता. त्याने जखमी चव्हाणला धीर देत, तू गप्प बसू नकोस, वैराग पोलिसांत तक्रार दे, असा सल्ला दिला.



मित्राच्या सांगण्यावरून चव्हाण तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्याकडे निघाला. मात्र, आपल्याविरुद्ध तक्रार देण्यास प्रवृत्त केल्याचा राग उल्हास मुळे याच्या डोक्यात गेला. त्याने भररस्त्यात दिनेश कापसेला तुला बघून घेतो अशी धमकी दिली. मात्र नंतर दुसऱ्या दिवशी सोज्वळतेचा आव आणत दिनेश कापसेला घरी सोडतो, असे सांगून आपल्या दुचाकीवर बसवले.

मात्र प्रत्यक्षात एका निर्जन स्थळी नेवून त्याच्या डोक्यात मोठा दगड घालून आरोपी उल्हास मुळे फरार झाला.

सकाळी त्याठिणी फिरण्यास गेलेल्या नागरिकांनी दिनेशचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. घटनेची माहिती मिळताच वैराग पोलिसांनी तातडीने धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बार्शी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला आहे. उल्हास मुळे फरार झाला असून, पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथके त्याच्या मागावर आहेत.

### घरी सोडण्याच्या बहाण्याने नेले आणि घात केला

रात्रीचा वाद निवळल्याचे भासवून आरोपी उल्हासने भयानक कट रचला. त्याने दिनेश कापसेला विश्वासात घेऊन चल, तुला मोटारसायकलवरून घरी सोडतो असे सांगून दुचाकीवर बसवले. मात्र, त्याला घरी न नेता आरोपीने दत्तनगर येथील नवीन मराठी शाळेच्या निर्जन मैदानावर नेले. तिथे चिडलेल्या उल्हासने दिनेशच्या डोक्यात मोठ्या आकाराचा दगड घालून त्याला जागीच ठार केले आणि घटनास्थळावरून पळ काढला.

# भोर प्रकरणातील नराधमास मृत्युदंडाची शिक्षा द्या

**सोलापूर, दि. ३ मे-**

भोर तालुक्यातील नसरापूर या गावातील एका चार वर्षाच्या लहान मुलीवर अत्याचार करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या नराधमास मृत्युदंडाची शिक्षा द्या, अशी मागणी सोलापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केली आहे. एकीकडे खरात प्रकरण, गॅस सिलेंडरसाठी रांगा, थोर महापुरुषांबद्दल काहीतरी बोलून त्यांचा अवमान करणे यांसारखे प्रकार होताहेत.

खरातसारखा भोंदूबाबा सम ाजामध्ये सर्वसामान्य जनतेचे म ानसिक भावनिक, आर्थिक शोषण करीत आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. थोर पुरुषांच्या अवमान करणाऱ्या व्यक्तींनाही समज दिली पाहिजे, अशी मागणीही शटगार यांनी केली आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



**महत्वाचे...**




### ट्रॅक्टर खड्ड्यात पडून १४ वर्षाच्या मुलाचा जागीच मृत्यू

**सोलापूर, दि.३ मे-**

शेताकडे जाताना चालकाचा ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर खड्ड्यात उलटला गेला. आणि ट्रॅक्टरमध्ये बसलेल्या एका १४ वर्षाच्या मुलाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना मोहोळ तालुक्यातील देगाव-मानेगाव रस्त्यावर शेंबडे यांच्या शेताजवळ घडली. सुरज सचिन काटे (रा. देगाव वाळूज, ता.मोहोळ) असे मयत मुलाचे नाव आहे. सुरज काटे हा शनिवारी सायंकाळच्या सुमारास ट्रॅक्टरमध्ये बसून घराकडून शेताकडे निघाला होता. शिवाजी शेंबडे यांच्या शेताजवळील खड्ड्यात सदर ट्रॅक्टर चालकाचे नियंत्रण सुटून ती पलटी झाली. यात तो मुलगा गंभीर जखमी झाला. वडील सचिन काटे यांनी त्यास उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### अविवाहित तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. ३ मे-**

अज्ञात कारणावरुन एका २७ वर्षीय अविवाहित तरुणाने राहत्या घरातील छताच्या लाकडी वाशाला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घोंगडे वस्तीत शनिवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. प्रकाश सत्यनारायण कुडक्याल (रा. घोंगडे वस्ती, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. जोडभावी पेठ पोलिस ठाण्याचे हवालदार आर.डी. दुधाळे यांनी त्याला फासावरुन सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्याच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ असा परिवार आहे.


### दुचाकी घसरुन जखमी झालेल्या तरुणाचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि.३ मे-**

दुचाकी घसरून जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी रात्री १० वाजता मृत्यू झाला. शरणप्पा बसवराज नंदरगी (वय-२५, रा.बोरी उमर्गी, ता.अक्कलकोट) असे त्याचे नाव आहे. दि.३० एप्रिल रोजी रात्री ९ वाजता तो अक्कलकोटकडून बोरी उमरगी गावाकडे दुचाकीवरुन निघाला असताना गावाजवळ दुचाकी घसरुन खाली पडला. यात जखमी झाल्याने अक्कलकोटच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात मामा शिवलिंग बिराजदार यांनी दाखल केले होते.

### कोंडी येथील तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि.३ मे-**



अज्ञात कारणावरून एका २१ वर्षीय तरुणाने घरातील पत्र्याच्या अँगलला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी गावात रविवारी सकाळी ९ वाजता उघडकीस आली. विजय पांडुरंग देवकर (रा.इंदिरानगर, कोंडी, ता.उत्तर सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. नातेवाईकांच्या साह्याने त्याच्या गळ्यातील फास काढून येथील शासकीय रुग्णालयात काका विलास साळुंखे यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# पाच ते सहा जणांच्या टोळक्याकडून एकावर कोयत्याने वार, डोक्यात घातला दगड

**३५ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू**

**७० फूट रोडवरील नीलम बेकरी समोरील घटना**

**वराह चोरीप्रकरणी खटला मागे घेण्याचे कारण**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे-**

वराह चोरुन त्यांना विष घालून मारल्याचा २०२० मध्ये पोलिसात दाखल केलेला खटला माघारी न घेतल्याच्या रागातून पाच ते सहा जणांनी एका ३५ वर्षीय तरुणावर कोयत्याने वार करत, डोक्यात दगड घातल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना ७० फूट रोडवरील नीलम बेकरीसमोर रविवार, दि.३ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

या घटनेची हकीकत अशी की, सुरेश कृष्णा श्रीराम (वय-३५, रा.रफिक नगर, एमआयडीसी, सोलापूर) हा तरुण नेहमीप्रमाणे दुचाकीवरुन रविवारी सकाळी जीमवरुन घरी परतत होता. ७० फूट रोडवरील नीलम बेकरीसमोर तो येताच आधीच त्याठिकाणी दबा धरुन बसलेल्या पाच ते सहा जणांच्या टोळक्याने त्याची दुचाकी अडविताच तो खाली पडताच सपासप वार केले.

या हल्ल्यात सावरण्याचा त्याला वेळच मिळाला नाही. त्यातच एका मारेकऱ्याने तेथे पडलेला एक भला मोठा दगड सुरेश श्रीराम याच्या डोक्यात घातला. दगडाच्या प्रहारमुळे डोक्यासह त्याचा चेहरा रक्तबंबाळ झाला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला. तेथेही बघ्यांची गर्दी झाल्याने शीघ्रकृती दलाचे पोलिस तैनात करण्यात आले होते.

**मृत सुरेश श्रीराम यास तीन बायका, आठ मुले**



यातील मृत सुरेश श्रीराम याला एकूण तीन बायका असून शालिनी, लक्ष्मी, गीता असे त्यांचे नाव आहे. त्यांच्याकडून सौंदर्या, रोशनी, रुपा, गायत्री, बालाजी, महिमा, भूमिका, परशुराम असे त्या मुलांची नावे. हे सर्वजण एकत्रच राहत होते, अशी माहिती नातेवाईकांनी दिली.

**यातील आरोपींची नावे याप्रमाणे**

मयत सुरेश श्रीराम यांची पत्नी लक्ष्मी श्रीराम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजय अशोक श्रीराम, रोहित बसप्पा आण्णारेड्डी, करण अशोक श्रीराम, सुमित अशोक श्रीराम, राहुल बसप्पा आण्णारेड्डी (सर्वजण रा.कुंचीकोरवी गल्ली, मौलाली चौक, सोलापूर), सुभाष सगडा (रा.नई जिंदगी, सोलापूर) यांच्यावर जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**गजबजलेल्या मार्गावरील रक्तरंजित घटना**

सत्तर फूट ते आकाशवाणी रोड हा मार्ग नेहमीप्रमाणे गजबजलेला होता. अशा गजबजलेल्या रस्त्यावर सुरेश श्रीराम हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. या रक्तरंजित घटनेमुळे परिसरात घबराट उडाली होती. त्यामुळे येथील अनेक दुकानदारांनी दुकाने पटापट बंद करुन घेत होते.

## सुजाण नागरिकाच्या तत्परतेमुळे विद्यार्थिनीचे वर्ष वाचले

**एनईईटी परीक्षेची वेळ, कंदगुळे यांची तत्परता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

अक्कलकोट रोडवरील एसव्हीसीएस शाळेबाहेर घडलेल्या एका प्रसंगाने सामाजिक बांधिलकीचा नवा आदर्श पाहायला मिळाला. एका सतर्क नागरिकाच्या वेळीच केलेल्या मदतीमुळे एनईईटी-यूजी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थिनीचे संपूर्ण वर्ष वाचले.

दुपारी १.१५ वाजण्याच्या सुमारास संबंधित विद्यार्थिनी आपल्या आईसोबत अक्कलकोट रोडवरील एसव्हीसीएस शाळेत परीक्षा देण्यासाठी आली. मात्र, आत गेल्यानंतर शिक्षकांनी तिला सांगितले की, तिचे खरे परीक्षा केंद्र भवानी पेठ येथील एसव्हीसीएस शाळेत आहे.

ही माहिती समजताच ती विद्यार्थिनी घाबरुन रडू लागली. दुपारी १.२२ वाजता शिक्षकांनी तिच्या आईशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र संपर्क होऊ शकला नाही. दरम्यान, शिक्षकांनी त्या विद्यार्थिनीला धीर देत बाहेर येऊन उपस्थित पालकांना मदतीची विनंती केली.

तेथे उपस्थित असलेले वीरेश कंदगुळे यांनी याकामी पुढाकार घेतला. दुपारी १.२४ वाजता स्वतःच्या चारचाकी वाहनातून त्या विद्यार्थिनीला भवानी पेठ येथील परीक्षा केंद्राकडे घेऊन गेले. परीक्षा केंद्राचे गेट बंद होण्याच्या केवळ एक मिनिट आधी तिला परीक्षा केंद्रावर पोहोचवले. विद्यार्थिनीची कोणतीही ओळख नसतानाही, केवळ तिचे शैक्षणिक नुकसान होऊ नये; या भावनेतून केलेली ही मदत सामाजिक जाणीव आणि मानवतेचे उत्तम उदाहरण ठरली आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत वीरेश कंदगुळे यांनी नवा आदर्श घालून दिला आहे.

## परजिल्ह्यातील आरोपीस २४ तासात अटक; १ लाख ३७ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे-**

शहर गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने परजिल्ह्यातील एका आरोपीला २४ तासात अटक केली. शकिल उदाशा भोसले (वय-२०, रा.कोळगाव, जि.अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. त्याच्याकडून १ लाख ३७ हजार रुपये किंमतींचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

डोणगाव रोडवरील शिंदे-साठे नगर येथे दोन दिवसापूर्वी जबरी चोरी झाली होती. इंदुमती साठे ह्या रात्रीच्या वेळी घराच्या पोर्चमध्ये झोपले असता अज्ञात इसमाने त्यांचे तोंड दाबुन घातक हत्याराने गंभीर जखमी करुन गळ्यातील सोन्याचे मणी असलेली १० ग्रॅम वजनाची पोत जबरदस्तीने काढून जबरी चोरी केली होती.

याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सपोनि शंकर धायगुडे यांच्या नेतृत्वाखाली पथक या गुन्ह्याचा तपास करत असताना पासपोर्ट ऑफिस गेटच्या बाजुला संशयितरित्या थांबलेल्या शकिल भोसले यास ताब्यात घेऊन अंगझडती घेण्यात आली. त्याचेजवळ ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी, सोन्याचे २ जोड कर्णफुले मिळुन आले. पक्ष्या काळे (रा.पुणे) या साथीदाराच्या मदतीने त्याने सदर गुन्हा केल्याचे कबूल केले. बेलाटी येथील एका घरातील दोन महिलांना धमकावत चोरी केल्याचेही त्याने कबुली दिली.

पोलिस आयुक्त एम.राजकुमार, पोलिस उपायुक्तद्वय गौहर हसन, डॉ.अश्विनी पाटील, सहायक पोलिस आयुक्त राजन माने, शहर गुन्हे शाखेचे वपोनि अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि शंकर धायगुडे यांच्या नेतृत्वाखाली पोअं अंकुश भोसले, शैलेश बुगड, जावेद जमादार, राजकुमार वाघमारे, अभिजीत धायगुडे, काशिनाथ वाघे, आबा साळवे, घिरज सातपुते, विठ्ठल यलमार, मपोअं ज्योती लंगोटे, निलोफर तांबोळी, सुमित्रा बारबोले यांच्यासह बाळु काळे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी ही कामगिरी पार पाडली.



सोलापूर शहरातील श्री. गजानन महाराज सोरेगांव ते कुमठे गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेने दादा धर्माधिकारी संस्थेने वृक्षारोपण केल्याने हिरवाई पसरलेली दिसून आली. छायाचित्र : केवल तिवारी)

## नई जिंदगी परिसरातील प्लास्टिकच्या गोडाऊनला लागली आग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. ३ मे-**

नई जिंदगी परिसरातील कस्तुरबा नगर येथील एका प्लास्टिकच्या गोडाऊनला भीषण आग लागल्याची घटना रविवार, ३ मे २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास घडली. या आगीत संपूर्ण साहित्य जळून खाक झाले आहे.



गोडाऊनमधून अचानकपणे धूर व ज्वाळा निघताना दिसू लागलाच परिसरातील नागरिकांनी अग्निशामक दलाला याची खबर दिली. त्यानुसार अग्निशामक दलाचे जवान सात ते आठ पाण्याच्या बंबांसह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते.

घटनेची माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आली नाही. आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

## २८ हजारांहून अधिक शिक्षक देणार 'टीईटी'ची परीक्षा

**पेपर १ साठी १२ हजार ३७५ परीक्षार्थी**

**पेपर २ साठी १६ हजार १५८ परीक्षार्थी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि. ३ मे -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षेसाठी यंदा विक्रमी प्रतिसाद मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यातून तब्बल २८ हजारांहून अधिक कार्यरत व भावी शिक्षक परीक्षेसाठी बसणार आहेत. राज्यभरातही परीक्षार्थींची संख्या ५ लाखांच्या पुढे गेल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे यंदाची टीईटी परीक्षा अधिक स्पर्धात्मक आणि लक्षवेधी ठरणार आहे.



परिषदेने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, २१ जून २०२६ रोजी टीईटी परीक्षा घेण्यात येणार आहे. पेपर क्रमांक १ आणि २ हे दोन्ही पेपर एकाच दिवशी पार पडणार आहेत. यामध्ये डी.एड. व बी.एड. धारकांसोबतच सध्या कार्यरत शिक्षकांचाही मोठा सहभाग दिसून येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयामुळेही परीक्षार्थींच्या संख्येत वाढ झाल्याची चर्चा शैक्षणिक वर्तुळात रंगत आहे.

राज्यस्तरावर पाहता, पेपर-१ साठी सुमारे २ लाख ६७ हजारांहून अधिक, तर पेपर-२ साठी जवळपास २ लाख ८९ हजारांपेक्षा जास्त उमेदवार परीक्षेला बसणार आहेत. सोलापूर जिल्ह्यात पेपर-१ साठी १२ हजार ३७५ तर पेपर-२ साठी १६ हजार १५८ उमेदवार नोंदले गेले असून, एकूण संख्या २८ हजारांच्या पुढे गेली आहे. टीईटीच्या परीक्षेत मागील काही वर्षांत निकालाचे प्रमाण कमी दिसून आले आहे. त्यामुळे परीक्षेची कठीणता पातळी संतुलित ठेवावी. वर्षातून किमान दोन वेळा टीईटी परीक्षा घेण्याचे नियोजन शासनाने करावे, अशी मागणी स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संघटनेकडून करण्यात येत आहे. दरम्यान, यंदाची टीईटी परीक्षा ही तंत्रज्ञानाधारित आणि स्पर्धात्मक ठरणार आहे.

**परीक्षेचे महत्व वाढले**

टीईटी परीक्षा ही केवळ भावी शिक्षकांसाठीच नव्हे, तर कार्यरत शिक्षकांसाठीही महत्त्वाची ठरत आहे. पदोन्नती, केंद्रप्रमुख किंवा विस्तार अधिकारी होण्यासाठी टीईटी पात्रता बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच 'पवित्र' पोर्टलद्वारे होणाऱ्या शिक्षक भरतीसाठीही टीईटी उत्तीर्ण असणे आवश्यक असल्याने या परीक्षेचे महत्त्व अधिक वाढले आहे.

**एका नियंत्रण कक्षातून निरीक्षण**

सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. राज्यातील सर्व केंद्रांचे एकत्रित निरीक्षण एका नियंत्रण कक्षातून केले जाणार आहे. परीक्षार्थींना प्रवेश देताना थंब इम्प्रेशनसह फेस रिकग्निशन प्रणालीद्वारे पडताळणी केली जाणार आहे.

**टीईटी परीक्षा देणे बंधनकारक**

कार्यरत शिक्षकांना पदोन्नतीसाठी व केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, होण्यासाठी टीईटी बंधनकारक केले असून त्याचबरोबर पवित्र पोर्टल मार्फत होणारे शिक्षक भरतीसाठी सुध्दा टीईटी परीक्षा देणे बंधनकारक आहे. त्यामुळे ही परीक्षा उत्तीर्ण होणे अपेक्षित आहे, असे स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४३०

**काळकूट पितळ सोनें शुध्द रंग ।**
**अंगाचेच अंग साक्ष देती ।।**

आपल्याकडे पात्रता नसतांनाही काही लोक आपण असे आहोत, तसे आहोत असे स्वत:च्या मुखाने सांगून किंवा वर्तनातून भासवून खोटारडा मोठेपणा मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याचबरोबर काही लोकांकडे पात्रता, कुवत असतानाही ते आपण मोठे, चांगले आहोत किंवा आपल्याकडे पात्रता आहे हे आपल्या मुखाने कधीच कोणाला सांगत नाहीत किंवा कुवतीचा दिखावाही करीत नाहीत. मूळात जे आहे, ते कधी ना कधी तरी बाहेर पडणारच असते. अर्थात सत्य हे सत्यच असते आणि असत्य हे असत्यच असते. पितळी वस्तू किंवा भांडे कितीही पिवळी दिसले तरी ते सोन्यापेक्षा किंमती होत नाही किंवा सोन्याचा पिवळेपणा पितळाच्या पिवळेपणापुढे फिका पडला तरीही सोन्याची महती कमी होत नाही. अर्थात, बाह्य दिखाव्याने पितळाला महत्व येते आणि सोन्याला कमी महत्व येते, असे होत नाही. कालांतराने का होईना; पण पितळाला कलंक चढल्याचे पाहायला मिळते. म्हणजे कळकल्यामुळे पितळ काळे पडू लागते. मात्र कालांतरानेही सोन्याचे पिवळेपण तसेच टिकून राहते. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**काळकूट पितळ सोनें शुध्द रंग।**
**अंगाचेच अंग साक्षी देती ।।**

आपल्याकडे असणारे गुण, अवगुण हेच आपला खरा परिचय असतात किंवा आपल्या परिचयाची साक्ष देत असतात. मी असा आहे, तसा आहे हे सांगण्याची वेळ आपल्यावर आपण आणू नये. आपले कतृत्व, आपले वर्तन, गुण, अवगुण, हेच आपले खरे साक्षीदार असतात. भडकपणाचे राहणीमान केले आणि कृतीशुन्यता अंगीकारली तर भडकपणा किंवा उच्चप्रतिचे राहणीमानही व्यर्थ ठरू शकते. माणसाने चांगले राहावे म्हणजे केवळ वस्त्र, अलंकार परिधान करावेत असे नव्हे. मानवतेचा, चांगुलपणाचा खरा अलंकार हा मानवाचा आचार-विचार, वर्तन हे होय. मूळात आचार, विचार, स्वभाव, वर्तनाचा अलंकारच कलंकित असेल तर बाह्य पेहराव व्यर्थ असतो. चांगल्या माणसांना मी चांगला आहे, असे सांगण्याची वेळ येत नाही. उलट वाईट लोकांना आपण चांगले कसे आहोत, हे पटवून दाखविण्याचा प्रयत्न करावा लागतो. कारण त्यांना त्यांच्याकडील वाईटपणा झाकावा लागतो. पितळाने आपण सोन्यापेक्षा खूप पिवळे आहोत असे कितीही सांगण्याचा प्रयत्न केला व सोन्याने आपण पिवळे आहोत असे अजिबात सांगीतले नाही, तरीही कोण किती पिवळे आहे हे आपल्या लक्षात येतच असते. अगदी त्याप्रमाणे आपल्या बाबतीतही घडत असते. याकडे आपले लक्ष असावे. थोडक्यात, आपल्या खऱ्या परिचयाचे आधारस्तंभ हे आपले वर्तन, स्वभाव, कर्तव्य, गुण असतात हे लक्षात ठेवावे. जय जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. ४ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख, कृ. नवमी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- पुनर्वसु (२४.१३)**
**योग - परिघ (२३.१३)**
**करण - तैतिल (१३.५१)**
**राहू काल : सोमवार दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष : १७९९: - श्रीरंगपट्टणमच्या लढाईत टिपू सुलतान ब्रिटिशांकडून मारला गेला.**
**१८५४: - भारतातील पहिले टपाल तिकीट प्रकाशित झाले.**
**१९९२: - संगीतकार भूपेन हजारिका यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करण्यात आला.**
**१९९५: - महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने बॉम्बे हे नाव बदलून मुंबई असे नामकरण करण्याचा निर्णय घेतला.**

## कामगार हक्कांसाठी डॉ. आंबेडकरांचे ऐतिहासिक योगदान : डॉ. जवळगेकर




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ सामाजिक न्यायासाठीच नव्हे तर कामगारांच्या हक्कांसाठीही मोठे कार्य केले. भारतात ८ तास कामाचा नियम लागू करण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कामगारांना साप्ताहिक सुट्टी, मातृत्व रजा, वेतनासह रजा यांसारख्या सुविधा मिळवून दिल्या, असे प्रतिपादन महापालिकेचे मुख्य लेखाधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर यांनी केले.

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने महाराष्ट्र दिन आणि महापालिका स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षण मंडळाच्या आवारात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण महापालिकेचे मुख्य लेखाधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने, महानगरपालिका लेखा अधिकारी सदानंद वाघमोडे, मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक मनीष बांगर, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, तरंगिणी कोंडा, सुवर्णा गुरव प्रफुल्ला कदम महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, अविनाश शिंदे, रियाज आत्तार, अमोल गायकवाड, लक्ष्मण पुजारी, सचिन वर्मा, रियाज सय्यद, मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक पांडुरंग माने, मुकुंद चंदनशिवे, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, भालचंद्र साखरे, सायली ढोले, नाशिर खान, सचिन साखरे आदी उपस्थित होते.

# ४४ अंश तापमानातही अंगणवाड्या सुरु; चिमुकल्यांच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह

## उन्हाळी सुट्टी शाळांना; पण अंगणवाडी बालकांना नाही




### पालक व संघटनांकडून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

राज्यात उष्णतेचा पारा ४४ अंशांच्या पुढे गेलेला असतानाही एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण, आदिवासी आणि शहरी भागातील अंगणवाड्या सुरू ठेवण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. मे महिन्यात प्राथमिक शाळांना संपूर्ण उन्हाळी सुट्टी जाहीर असताना, तीन ते सहा वयोगटातील अंगणवाडीतील बालकांना मात्र सुट्टी नाकारण्यात आल्याने संताप व्यक्त होत आहे.

या वयोगटातील मुलांची प्रतिकारशक्ती कमी असते. सध्या वाढलेल्या तापमानामुळे उष्माघात, निर्जलीकरण, थकवा, चक्कर, ताप व त्वचारोगांचा धोका वाढला आहे. अशा परिस्थितीत लहान बालकांना अंगणवाडीत बोलावणे म्हणजे त्यांच्या आरोग्याशी खेळ असल्याची तीव्र प्रतिक्रिया पालक व नागरिकांमधून उमटत आहे. अनेक अंगणवाड्यांमध्ये पंखे, थंड पाणी किंवा पुरेशी सावली यांसारख्या मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याची वस्तुस्थिती समोर येत आहे.

दरम्यान, पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना मे महिनाभर सुट्टी देण्यात आली आहे. मोठी मुले नातेवाईकांकडे जात असल्याने लहान मुलेही त्यांच्यासोबत जातात. त्यामुळे अंगणवाड्यांतील उपस्थितीही कमी होत असल्याचे चित्र आहे. अशा स्थितीत केंद्रे सुरू ठेवण्यामागील उद्देशावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शासनाने पोषण आहार व आरोग्य सेवा अखंडित राहाव्यात म्हणून केंद्रे सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. वर्षभर ३०० दिवस आहार वितरणाची अटही लागू आहे. मात्र, कोरोना काळाप्रमाणे कोरडा आहार घरपोच देण्याचा पर्याय उपलब्ध असतानाही तो न वापरता बालकांना उन्हात बोलावणे योग्य नसल्याचे मत व्यक्त होत आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने निर्णय बदलून बालकांच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

**बालकांच्या जिविताशी खेळ; संघटनेची संतप्त प्रतिक्रिया**

अंगणवाडी कर्मचारी संघाने मे महिन्यात बालकांना पूर्ण सुट्टी देण्याची आणि कोरडा आहार घरपोच देण्याची मागणी केली होती. मात्र, ४४ अंश तापमानात बालकांना अंगणवाडीत बोलावणे म्हणजे त्यांच्या जिविताशी खेळ आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया शासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप संघटनेचे राज्य सरचिटणीस सूर्यमणी गायकवाड यांनी केला.

**कर्मचाऱ्यांना रोटेशन सुट्टी; बालकांना मात्र नाही**

शासनाने अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना आलटून-पालटून १६ दिवसांची रोटेशन सुट्टी मंजूर केली आहे. मदतनीसांना २ मे ते १७ मे, तर सेविकांना १८ मे ते २ जून या कालावधीत सुट्टी देण्यात आली आहे. मात्र, बालकांना पूर्ण महिन्याची सुट्टी नाकारल्याने नाराजी व्यक्त होत आहे.




## घामाच्या किंमतीचा मान; कामगार दिनी राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनचा सन्मानाचा नाश्ता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनतर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने कन्स्ट्रक्शन स्थळी, कष्टकरी बांधवांना नाश्ता वाटपाचा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या उपक्रमामागे केवळ सेवा नव्हे, तर कामगारांचा सन्मान ही भावना होती. उन्हात, पावसात, कष्टाने उभा राहणाऱ्या प्रत्येक हाताला एक छोटासा आधार देण्याचा आमचा प्रयत्न होता. विजय छंचुरे, श्याम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची सुरुवात श्री शैलेश मोहीकर यांनी हीच आमुची प्रार्थना अन हेच आमुचे मागणे या प्रार्थनेने केली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रेमचंद मेने, विश्वस्त ज्योती मेने हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सर्व बांधवांना उपीट लालू खंडेलवाल यांनी उपलब्ध करून दिले. या कार्यक्रमासाठी सुरेश दुधगी, राजू अनंतकर, संगीता महिंद्रकर, विजयश्रीताई, अनुराधा निकम, वैशालीताई गायकवाड, अनिता रेळेकर, भारती ढोबळे, सुहास भोसले, रोहित अब्दुलपुरकर, रवी वाकडे, प्रकाश शिंपी, राहुल वर्मा, राहुल उंब्रजकर, डॉ महेश बिलुरे आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे अध्यक्ष प्रांजली मोहीकर यांनी केले.

## बाल वारकऱ्यांचा गौरव; समर्पित नाट्य शाळेच्या माध्यमातून 'विठ्ठलास आमंत्रण' सादरीकरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, मुंबई यांच्या वतीने आयोजित २२ व्या बालनाट्य स्पर्धा येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे पार पडल्या. या स्पर्धेत समर्पित नाट्य शाळेच्या माध्यमातून सादर करण्यात आलेल्या 'विठ्ठलास आमंत्रण' या बालनाट्यात बाल वारकऱ्यांनी विशेष सहभाग नोंदवला. त्यांच्या या प्रभावी सादरीकरणाबद्दल त्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या सन्मान सोहळ्याचे आयोजन समर्पित नाट्य शाळेच्या वतीने करण्यात आले होते. सिने-नाट्य कलाकार अमीर तडवळकर व अश्विनी तडवळकर यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्राच्या नाट्य विभागाचे प्रमुख डॉ. गणेश शिंदे आणि डॉ. मुकुंद लिमये वैद्य यांच्या हस्ते बाल वारकऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी हरिपाठ परिवाराचे संस्थापक बळीराम जांभळे महाराज, अविराज जांभळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री संत सावता महाराज वारकरी मृदंग वादन प्रशिक्षण संस्था आणि हरिपाठ परिवाराच्या माध्यमातून या मुलांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडवले. विशेष म्हणजे, या सर्व बाल वारकऱ्यांना वारकरी परंपरेचे धडे बळीराम जांभळे महाराज यांनी विनामूल्य दिले आहेत. त्यामुळे मुलांमध्ये संस्कार, भक्तीभाव आणि सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.




## राजेभाई उर्दू हायस्कुलची उजमा काझी, फायजा सोफी प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

राजेभाई उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस अँड सायन्स, येथील फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा विज्ञान विभागाचा निकाल ९५.७१% तर कला विभागाचा निकाल ६५.५६% लागल आहे. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्था अध्यक्ष फैज अहमद इनामदार, उपाध्यक्षा तस्निमआरा शेख, प्राचार्या सबिहा पिरजादे यांनी अभिनंदन केले.

**अंतिम तीन विद्यार्थी : विज्ञान :** उजमा म.सलीम काझी (८२.००%), सिमीन इमरान नालवर (८०.५०%), हबीबा खानम आकिल अहमद जामदार ७०.३३ %. **कला :** फायजा नौशाद सोफी ६५.००%, तहुरा उर्फ फिरदोस सादिक बानवान हंगरगेकर ६१.३३%, फरहीन म.रफिक सय्यद ५६.३३% .

## चव्हाण शोरूममधून बाहेर पडलेल्या नवीन कारची दुचाकीला धडक

**पती-पत्नी जखमी, कार चालकावर गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

चव्हाण शोरूम च्या बाहेर पडलेल्या एका नवीन मोटार कारने दुचाकीला धडक दिली. यात दुचाकी वरील दोघे पती-पत्नी मार लागून जखमी झाले असून याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात पळून गेलेल्या संबंधित कारचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

याबाबत म.रफिक म. मजीद जमखंडी (रा. २०५ पर्ल अपार्टमेंट, होटगी रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे . यातील फिर्यादी हे २७ एप्रिल रोजी संध्याकाळी दुचाकी (क्रं. एम एच १३ - ई एन २८४२ ) वरुन पत्नीसह जात असताना होटगी रोडवरील चव्हाण शोरुम मधुन निघालेली एक नवीन पांढरे रंगाची कार ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणने चुकीचे दिशेने येवून फिर्यादीच्या दुचाकीस डावे बाजुस धडक दिल्याने फिर्यादी व त्यांची पत्नी रस्त्यावर पडुन जखमी झाले.

मात्र कार चालकाने फिर्यादीस उपचारास दाखल न करता अपघात स्थळावरून तसाच निघुन गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवलदार मणुरे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## चिमुकल्यांना 'क्रांतीज्योती सावित्री' कॉमिक्स पुस्तक वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

बुद्धभूमी संस्थेच्या वतीने बुद्ध पौर्णिमेनिमित्त ५० चिमुकल्यांना 'क्रांतीज्योती सावित्री' कॉमिक बुकचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सामुदायिक बुद्ध वंदनेने झाली. त्यानंतर कृषी अधिकारी ऋतुराज सरवदे आणि निखिल कोयले यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध मूर्तीचे पूजन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



संस्थापक अध्यक्ष धम्मपाल मैंदर्गीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. याप्रसंगी सागर कांबळे, भीमा इंगळे, राजू पाटील, पप्पू वाघमारे, गुड्डू तळभंडारे, अमोल पांढरे आदी उपस्थित होते. पुस्तकांसोबतच बालकांना खाऊवाटपही करण्यात आले.

'या पुस्तकामुळे मुलांना सावित्रीबाई फुलेंच्या संघर्षाची ओळख होईल,' असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुराग सुतकर यांनी केले.

## आश्रमशाळांमधील शिक्षक भरतीला आता पवित्र पोर्टलद्वारे मिळणार गती

**सोलापुरातील विविध आश्रम शाळेत कला, क्रीडा, कार्यनुभव शिक्षकांची होणार भरती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे**

राज्य शासनाने आश्रमशाळांमधील शिक्षक भरती प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करत 'पवित्र' पोर्टलद्वारे भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे भरती प्रक्रियेला गती मिळण्यासोबतच पारदर्शकता वाढणार असून गुणवत्ताधारक उमेदवारांना न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज) प्रवर्गाच्या खासगी अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक भरतीबाबत हा निर्णय लागू करण्यात आला आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संचालक सोनाली मुळे यांनी यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या धर्तीवर ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

या निर्णयाच्या कक्षेत विजाभज प्रवर्गाच्या खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन आश्रमशाळांचा समावेश आहे. यामुळे राज्यभरातील सर्व संबंधित शाळांमध्ये एकसमान निकष लागू होणार असून भरती प्रक्रियेत होणाऱ्या अनियमितता आणि हस्तक्षेपाला आळा बसण्यास मदत होईल.

दरम्यान, या निर्णयाचा परिणाम सोलापूर जिल्ह्यावरही होणार असून, जिल्ह्यातील समाजकल्याण, आदिवासी विकास व इतर बहुजन विकास विभागांतर्गत चालणाऱ्या आश्रमशाळांमध्ये शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू होणार आहे. विशेषतः कला, क्रीडा आणि कार्यानुभव विषयांच्या शिक्षकांची मागणी अधिक असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी या निर्णयाचे स्वागत करत सांगितले की, पवित्र पोर्टलद्वारे होणारी भरती ही गुणवत्ताधारक उमेदवारांसाठी मोठी संधी आहे. यामुळे पात्र शिक्षकांची निवड होऊन ऊसतोड कामगार तसेच वंचित आणि दुर्लक्षित घटकांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळेल. त्यांनी समाजकल्याण विभागातील सर्व शिक्षक भरती याच पोर्टलमार्फत करण्याची मागणीही यावेळी केली.

एकूणच, 'पवित्र' पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय हा राज्यातील शिक्षण व्यवस्थेसाठी सकारात्मक पाऊल मानला जात असून, यामुळे पारदर्शक, वेगवान आणि विश्वासार्ह भरती प्रणाली विकसित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



## यशोधरा विद्यालयाचा बारावीचा निकाल ९७ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

यशोधरा उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल यंदा तब्बल ९७ % लागला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थापक अध्यक्ष रमेश सुतकर व सचिवा वमल सुतकर यांनी अभिनंदन केले. विशेष प्राविण्य यादीत विज्ञान शाखेतील २९, वाणिज्य शाखेतील ६ आणि कला शाखेतील १ विद्यार्थी स्थान मिळवण्यात यशस्वी ठरले. प्रथम श्रेणीत विज्ञान शाखेत १२२, वाणिज्य शाखेत १४ व कला शाखेत ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, तर द्वितीय श्रेणीत अनुक्रमे १०८, २६ व २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

**अंतिम तीन विद्यार्थी**

**विज्ञान :** हर्षल राजू रनसुभे ८७.५०%, अनिश हरीश कुलकर्णी ८७.३३%, आर्यन संजय क्षीरसागर ८५.१७%.

**वाणिज्य :** प्रेम धनराज नोगजा ९४.५०%, देवांशी उमाशंकर सामल ८७.३३%, संहिता ऋषिकेश राजपूत ८६.१७%. **कला :** नेहा रुपेश गौड ७५.१७%, राहुल अंकुश चौगुले ७३.३३% प्रथमेश सचिन गायकवाड ७१.१७%.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...




### कॅम्पस ड्राईव्हमध्ये सोजर फार्मसीचे यश

**बार्शी, दि. ३ मे-**
सोजर कॉलेज ऑफ फार्मसी येथे कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम माइंड वर्क टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहकार्याने पार पडला. या उपक्रमात ३५ विद्यार्थ्यांची मेडिकल सामरायझेशन जॉब प्रोफाइलकरिता निवड करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. अजय साळवी यांच्या प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरता प्रा. डॉ. शिवाजी पाटील, प्रा. डॉ. सागर कांबळे तसेच तांत्रिकी सहाय्यक म्हणून अक्षय रिकीबे व ग्रंथपाल आसिफ आतार यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवाजी पाटील व आभार प्रदर्शन अंतिम वर्ष बी फार्मसी मधील विद्यार्थिनी स्नेहल तोगे यांनी केले. महाविद्यालयास मिळालेल्या यशाबद्दल संसाध्यक्ष अरुण बारबोले, सचिवा कल्पना बारबोले, प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सहभागी विद्यार्थी यांचे कौतुक केले.



### श्री हनुमान सार्वजनिक वाचनालयात महाराष्ट्र दिन साजरा

**सांगोला, दि. ३ मे-**
श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासुद (ता.सांगोला) येथे महाराष्ट्र दिना निमित्त ग्रंथपाल अनिकेत शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रास्ताविकात संतोष मोरे यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्व पटवून दिले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे संतोष शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष माधुरी पवार यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास ग्रंथालय कर्मचारी वर्ग, हनुमान विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



### युद्ध नको बुद्ध हवा हीच तत्त्वप्रणाली स्वीकारावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. ३ मे-**
गौतम बुद्ध यांनी मानवतेची शिकवण दिली, त्यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार संपूर्ण जगात झाला परंतु आता त्यांच्या शिकवणुकीचा विसर पडल्यामुळे विध्वंसक जागतिक युद्ध सुरू झाले आहे, हे युद्ध थांबवायचे असेल तर युद्ध नको बुद्ध हवा ही तत्व प्रणाली स्वीकारली पाहिजे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गौतम बुद्ध जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले आभार कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी मानले कार्यक्रमास प्रा मनीषा शिंदे, प्रा शितल फुटाणे, प्रा जनाबाई चौधरी, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा सौरभ भस्मे प्रा ओंकार घिवारे, प्रा शिवकुमार मठदेवरु उपस्थित होते.



### भाविकांच्या सेवेला वटवृक्ष मंदिर समितीचे प्राधान्य: इंद्रजित पवार

**अक्कलकोट दि.३ मे-**
श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य हे सेवाभावी वृत्तीने चालते, म्हणून भाविकांच्या सोई सुविधांना वटवृक्ष मंदिर समितीचे नेहमीच प्राधान्य असल्याचे मनोगत सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी व्यक्त केले. नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटूंब भेट देऊन पवार यांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी इंद्रजित पवार व कुटूंबियांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा, देऊन सन्मान केला. यावेळी इंद्रजित पवार बोलत होते.मंदिर समितीकडून गर्दीचे स्वरूप पाहून श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या मर्यादित परिसरातही वारंवार विविध प्रकारचे नियोजन होते. त्यामुळेच भाविकांचे स्वामी दर्शन सुलभतेने पार पडत असल्याची प्रशंसाही इंद्रजित पवार यांनी केली. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, बाळासाहेब एकबोटे, शिवशरण अचलेर, अमर पाटील, खाजप्पा झंपले, विपूल जाधव, संतोष जमगे, श्रीकांत मलवे आदी उपस्थित होते.

# भीमा नदीकाठावरील विद्युत पुरवठा खंडित करण्याचा आदेश रद्द करावा

### जिल्हाधिकाऱ्यांना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शटगार यांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**
खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या आदेशानुसार भीमा नदी काठावरील विद्युत पुरवठा खंडित करण्यासाठी देण्यात आलेला आदेश रद्द करून धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा वेग वाढवून विद्युत पुरवठा पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी खासदार शिंदे यांच्या वतीने सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार व सर्व तालुक्यातील तालुका अध्यक्ष यांच्या उपस्थितीत आज जिल्हाधिकारी एस. कार्तिकेन यांना निवेदन देण्यात आले.

त्यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे, की २४ एप्रिलपासून उजनी धरणातून भीमा नदी पात्रात पाणी सोडण्यात आले आहे. या पाण्याचा दुरुपयोग होऊ नये संबंधित पाण्याचा शेतीपंपाद्वारे उपसा होऊ नये. या कारणास्तव भीमा नदीच्या दोन्ही तीरावरील शेतकरी वापरत असलेल्या शेतीपंपाचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आलेला आहे.

या निर्णयाचा परिणाम शेती व्यवसायावर होत असून शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर शेतीची कामे करणे, पिकाची निगा राखणे तसेच सिंचन व्यवस्थापन करणे अतिशय कठीण होत आहे. आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सध्या ४४ अंश डिग्री सेल्सिअस तापमान आहे. वाड्या -रस्त्यावर राहणाऱ्या लोकांच्या पाण्याच्या पाण्याची समस्या उद्भवत आहे. पिकांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली. असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. आधीच यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे. त्यामुळे आहे ते पीकही जळून जाण्याची शक्यता आहे. म्हणून वीजपुरवठा खंडित करण्याचा आदेश रद्द करून विद्युत पुरवठा पूर्वावत सुरू करावा.

यावेळी दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष भिमाशंकर जमादार, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, मंगळवेढ्याचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष भारत जाधव,उपाध्यक्ष रमेश हासापूरे, मोतीराम चव्हाण, सुदर्शन आवताडे, संदीप पवार, बंट्टी चंदनशिवे, पद्मिनी शेट्टीआर, शिल्पा चांदणे, सचिव शंकर गायकवाड, छायाचित्रकार उत्तम कुमार वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# वीजपुरवठा सुरळीत करा, अन्यथा जनआंदोलन

### आमदार उत्तम जानकर यांचा ईशारा

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ३ मे -**
माळशिरस तालुक्यातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे नागरिक, शेतकरी आणि व्यावसायिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या प्रश्नावर आता राजकीय वातावरणही तापू लागले आहे. आमदार उत्तम जानकर यांनी महावितरणच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

> **वीजपुरवठा सुरळित न झाल्यास तीव्र आंदोलन**
> येत्या आठ दिवसांत वीजपुरवठा सुरळीत झाला नाही, तर तालुक्यातील जनता रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला.
> **- उत्तम जानकर, आमदार, माळशिरस.**



श्रेयवादाच्या राजकारणातून सामान्य जनतेला वेठीस धरणे योग्य नाही. गरीबांची वीज तोडून त्यांना अंधारात ठेवणे ही अन्यायकारक बाब आहे, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.

अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव असल्याचे कारण पुढे करून सर्वसामान्यांना त्रास दिला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. अनेक वर्षांपासून मी लोकांसाठी संघर्ष करत आलो आहे. हा माझा राजकीय विषय नसून जनतेच्या मूलभूत प्रश्नांचा मुद्दा असल्याचेही आमदार जानकर म्हणाले. आमदार जानकारांच्या भूमिकेमुळे माळशिरस तालुक्यातील वीजप्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## न्यू हायस्कूल वडाळ्याची भक्ती बायस प्रथम

### कला शाखेत प्राजक्ता जगताप प्रथम

**उत्तर सोलापूर, दि. ३ मे-**
फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या बारावीच्या परीक्षेत वडाळा येथील न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखेचा निकाल ९८.४९ टक्के तर कला शाखेचा निकाल ९०.३२ टक्के लागला. विज्ञान शाखेत भक्ती उमरावसिंग बायस ही विद्यार्थिनी ८१.८३ टक्के गुण घेऊन तर कला शाखेत प्राजक्ता गंभीर जगताप ही ७४ टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली.




बारावी विज्ञान शाखेतून २६५ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. यापैकी २६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.विज्ञान शाखेचा निकाल ९८.४९ टक्के लागला. साक्षी संतोष साठे ही विद्यार्थिनी ७९.३३ टक्के गुण मिळवून दुस-या क्रमांकाने तर स्नेहल दत्तात्रय दणके ही विद्यार्थिनी ७७.५० टक्के गुण घेऊन तिस-या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. बारावी कला शाखेतून ६२ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. यापैकी ५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेचा निकाल ९०.३२ टक्के लागला. संयोगिता नागेश घोलप ही विद्यार्थिनी ७० टक्के गुण घेऊन दुस-या क्रमांकाने तर भूमिका आप्पासाहेब कसबे ही विद्यार्थिनी ६७ टक्के गुण घेऊन तिस-या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. दोन्ही शाखेत तिनही क्रमांक मुलींनीच पटकविले, हे यंदाच्या परिक्षेतील वेगळेपण आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे मार्गदर्शक जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीरामकाका साठे, संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र साठे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वैशाली साठे, संस्थेचे संचालक जयदीप साठे यांनी अभिनंदन केले.

## ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे महाडायलिसिस सेवेचा शुभारंभ



### निशुल्क डायलिसिस सेवेमुळे किडनी विकार ग्रस्त रुग्णांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.३ मे-**
महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रामध्ये ११ डायलेसिस सेंटर व सात एमआरआय सेंटरचा शुभारंभ आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे केला.

या दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या शुभारंभास पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे उपस्थित होते. यानंतर ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे महाडायलिसिस सेंटरचे उद्घाटन मंगळवेढा नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सुनंदाताई आवताडे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सभापती दिपाली ताड, जिल्हा परिषद सदस्य व सार्वजनिक बांधकाम विभाग सभापती प्रदीप खांडेकर, जिल्हा शल्यचिकित्सक सोलापूर डॉ. वर्षा डोईफोडे,वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुलोचना जानकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरेश साठे,डॉ.पूजा पवार, महाडायलिसिसचे स्टेट हेड जगन्नाथ हल्याळ उपस्थित होते.

येथे पाच अद्यावत डायलिसिस मशीनद्वारे मोफत डायलिसिस सेवा दिली जाणार असून एका दिवसात पंधरा रुग्ण या सेवेचा लाभ घेऊ शकतात.या केंद्रामध्ये प्रशिक्षित डायलिसिस तंत्रज्ञ, नर्सेस, सहाय्यक कर्मचारी असे मनुष्यबळ कार्यरत असून किडनी विकारतज्ञ डॉ.विनय आयरेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली उपचारांची गुणवत्ता सुनिश्चित केली जाते. तसेच स्वच्छता,सुरक्षितेचा तसेच वैद्यकीय मानकांचे काटेकोर पालन करण्यात येते.या सेवेमध्ये रुग्णांना रक्त तपासणी, महागडी इंजेक्शन,आहार तज्ज्ञांचा सल्ला इत्यादी सेवा निशुल्क मिळणार आहेत.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल जोशी, डॉ. प्रवीण माने डॉ. रेवता स्वामी, अधिपरिचारिका सुवर्णा सरताळे, वैशाली शिंदे, रूपाली कुलकर्णी, रेणुका मुंडे तसेच संतोष गवंडी, आबासो नागणे, अविनाश पट्टणशेट्टी, प्रल्हाद नाशिककर, अनिल यादव, सीमा मुलगे, सारिका कोळेकर, सुरेखाखरात, वरिष्ठ डायलिसिस तंत्रज्ञ राम लाड , डायलिसिस अधिपरिचारिका कालिंदी सावंत, बाबासाहेब शिवशरण, माने आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे महाविद्यालयाचा ८३ टक्के निकाल

**श्रीपूर, दि. ३ मे -**
श्रीपूर येथील चंद्रशेखर तथा नारायणकाका आगाशे महाविद्यालयाने उच्च माध्यमिक परीक्षेचा निकाल ८३ टक्के लागला. निकालात मागासवर्गीयातून दिक्षा म्हसवडे - ७२.८३ टक्के, युवराज ठेंगल - ६६.३३ टक्के, वृषाली अडगळे - ६६ टक्के यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले. विज्ञान शाखेत मुग्धा जाधव - ७६.१७ टक्के, कृष्णांजली पाटील - ७५.३३ टक्के, शार्दुल पोखरे -७४.१७ टक्के यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले. वाणिज्य शाखेतून गौरी हाके - ६३.५० टक्के, अंकिता पवार - ६१.८३ टक्के, तेजश्री जावीर - ६१.३३ टक्के यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले. कला शाखेतून निताश्री मुंडफणे - ६४.५० टक्के, सिमरन चव्हाण - ६३.५० टक्के, मयुरी सावंत-पाटील - ५५.५० टक्के यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. रामदास देशमुख, उपाध्यक्षा शुभांगी देशमुख, सचिव भारत कारंडे, सदस्य यशराज देशमुख, प्राचार्य पां.बा. बनसोडे, उपमुख्याध्यापक सु.मा.गवळी, पर्यवेक्षक सि.भा.गुरव, क. महा.प्रमुख सु. शि.हासबे, पर्यवेक्षक सु. सु. शेंडे व प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक- शिक्षकेतर सेवक, शिक्षक- पालक संघ कार्यकारणी सर्व अधिकारी व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती कार्यकारणी सर्व अधिकारी व सदस्य यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## आवडत्या अंगणवाडी सेविकेच्या निवृत्तीमुळे चिमुकल्याचे डोळे पाणावले

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ३ मे-**
पिसेवाडी (वेळापूर) अंगणवाडीच्या सेविका प्रमिला पोतदार ३० एप्रिल रोजी निवृत्त होत असल्याचे समजताच अंगणवाडीच्या चिमुकल्यांचे डोळे पाणावले.

> **आपल्या मुलांप्रमाणे सर्वांचा सांभाळ**
> नवीन पिढीचा पाया मजबूत करण्याचे काम आम्ही करतो. ती सुसंस्कृत व्हावीत, यासाठी त्यांना मुलाप्रमाणे सांभाळतो. एवढ्या वर्ष मला ही संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजते.
> **- प्रमिला पोतदार**
> **(अंगणवाडी सेविका, पिसेवाडी, वेळापूर)**



प्रमिला पोतदार यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार समारंभ इंद्रनील कार्यालयात झाला. यावेळी अंगणवाडी अधिकाऱ्यासह पिसेवाडीमधील पालकांनी उपस्थित राहून पोतदार यांच्या कामकाजाबाबत कौतुक केले. महिला पालकांनी पोतदार यांच्या कामाची विशेष प्रशंसा केली. कार्यक्रमास पिसेवाडी ग्रामस्थ, महिला पालक, अंगणवाडी सुपरवायझर, कर्मचारी, शिक्षक उपस्थित होते. पोतदार यांच्या कामाची सर्वांनी प्रशंसा केली.

# निवृत्त कर्मचाऱ्यांना सव्वा कोटी रुपये दोन दिवसात देणार

### पंढरपूर नगरपरिषदेकडून कामगारांच्या मागण्या मान्य

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ मे-**
पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटना इंटकच्या वतीने नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके व मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या समवेत कामगार संघटनेची बैठक आयोजित केली होती. बैठकीत निवृत्त कर्मचाऱ्यांची उपदानाची सर्व रक्कम रुपये १ कोटी २० लाख दोन दिवसात देण्यासह सर्व मागण्या मान्य झाल्या.



बैठकीत कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव आदापुरे, कार्याध्यक्ष नानासाहेब वाघमारे, जनरल सेक्रेटरी ॲड. सुनील वाळूजकर, सहकार्याध्यक्ष शरद वाघमारे , उपाध्यक्ष संतोष सर्वगोड, संभाजी देवकर, धनजी वाघमारे, दिनेश साठे, जयंत पवार सतीश सोलंकी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

जे सफाई कर्मचारी, शिपाई, सॅनिटरी इन्स्पेक्टर, इंजिनियर ग्रॅज्युएट उच्च शिक्षण घेतले आहेत, त्यांना नगरपालिकेत शिक्षणाानुसार लिपिक, अतिक्रमण विभाग, बाग, बांधकाम, कर विभाग या ठिकाणी कामे देण्याचा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला. महेबूब शेख यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांना अद्याप कोणतीही रक्कम मिळाली नाही, ती देण्याचाही निर्णय झाला. सफाई कर्मचारी, शिपाई, लिपिक यांना शासन निर्णयानुसार १२ व २४ वर्षाची तसेच १०/२०/३० ची आश्वासित प्रगती योजना लागू होण्याच्या दृष्टीने लवकरच कारवाई केली जाईल असे सांगण्यात आले. सफाई कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी आरोग्य शिबिरही घेण्याचे ठरले. कर्मचाऱ्यांचा किमान पाच लाखापर्यंत आरोग्य विमा काढण्याचा निर्णय झाला. अन्य सर्व मागण्यावर चर्चा करून मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिले.

यावेळी कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव आदापुरे यांनी मुख्याधिकाऱ्यांचे मागण्या मान्य केल्याबाबत आभार व्यक्त केले. यावेळी जनरल सेक्रेटरी, ॲड. सुनिल वाळूजकर, कार्याध्यक्ष नानासाहेब वाघमारे, सहकार्याध्यक्ष शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, उपाध्यक्ष जयंत पवार, धनजी वाघमारे, संभाजी देवकर, संतोष सर्वगोड, सतीश सोलंकी, दत्तात्रय चंदनशिवे, चेतन चव्हाण, समाधान काळे, अनिल अभंगराव, संजय वायदंडे, महावीर कांबळे, दिनेश साठे, प्रीतम येळे, संजय माने, वैभव दंदाडे उपस्थित होते.



### बालउद्यानाचे भूमिपूजन माजी उपमुख्यमंत्री मोहिते-पाटील यांच्या हस्ते

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मे -**
अहिल्यादेवी होळकर व महात्मा बसवेश्वरांचे स्मारक एकाच ठिकाणी घेऊन जसे जातीय सलोख्याचे दर्शन घडवले. तसेच स्वच्छता व वाहतुकीच्या बाबतीतही स्वयंशिस्त पाळून आदर्श निर्माण करावा असे आवाहन आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

येथील बसवेश्वर चौकात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर बाल उद्यानाचे भूमिपूजन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील बोलत होते. कार्यक्रमास जयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आ. उत्तम जानकर, किशोरसिंह माने-पाटील उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, नगराध्यक्ष रेशमा आडगळे, विलास क्षीरसागर यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. यावेळी दोन्ही समाजाचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

प्रास्ताविकात नागेश नष्टे यांनी अहिल्यादेवी होळकर व महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकाने अकलूजच्या वैभवात भरच पडणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन साठे यांनी तर आभार लक्ष्मीकांत वाघे यांनी मानले.

आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बार्शी तालुक्यात अल्पवयीन मुलीचे अपहरण; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ३ मे-**

बार्शी तालुक्यातील एका गावात १७ वर्षे ९ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले आहे. मुलीला अज्ञात इसमाने आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त होत आहे. याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.




संबंधित मुलगी नुकतीच १२ वीची परीक्षा देऊन बार्शी येथे सीईटी परीक्षेच्या क्लाससाठी येत होती. १ मे रोजी सकाळी ती बार्शीहून आपल्या गावी परतली होती. दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास कुटुंबीय शेतात कामासाठी जात असताना, ती घरीच थांबत असल्याचे सांगितले होते. मात्र काही वेळाने कुटुंबीय परत आले असता मुलगी घरात आढळून आली नाही. परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेऊनही तिचा काहीच मागमूस लागला नाही. अखेरीस कोणीतरी फूस लावून पळवून नेल्याचा संशय बळावल्याने मुलीच्या वडिलांनी पोलिसांत फिर्याद दिली.

वय १७ वर्षे ९ महिने, रंग गोरा, उंची १५५ सेमी, बांधा सडपातळ, पोशाख अंगात लाल रंगाचा टॉप व लाल लेगीज, सरळ नाक, मोठे गोल डोळे, केस विणलेले असे मुलीचे वर्णन आहे. या प्रकरणी अज्ञाताविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल झाला असून पोलीस नाईक चौधरी तपास करत आहेत. या वर्णनाची मुलगी कोणाला आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा बार्शी तालुका पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. पोलिसांकडून मुलीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक नेमले आहे.

## महत्त्वाचे...

### श्रीशैल गवंडी हे माणसं जोडणारे व्यक्तिमत्व : महेश इंगळे

**अक्कलकोट दि .३ मे -**

श्रीशैल गवंडी हे खऱ्या अर्थाने माणसं जोडणारे व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या वागण्या-बोलण्यातून नेहमीच आपुलकी, साधेपण जाणवतो. प्रत्येकाशी स्नेहाने वागण्याची त्यांची शैलीच त्यांना वेगळेपण देऊन जाते, असे गौरवोद्गार वटवृक्ष श्री स्वामी महाराज देवस्थानाचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी काढले देवस्थानचे प्रसिद्धी प्रमुख श्रीशैल गवंडी यांचा वाढदिवसा निमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी महेश इंगळे बोलत होते. श्रीशैल गवंडी यांचा विविध संस्था, पत्रकार संघटना, मित्र परिवार यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रसाद सोनार, गणेश दिवाणजी, प्रा.अचलेर, बाळासाहेब एकबोटे, कवटगी, अंकुश केत, सुनिल पवार, पत्रकार स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, नंदकुमार जगदाळे, रमेश शिंदे आदी उपस्थित होते.

### अर्णव उच्च माध्यमिक विद्यालय विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल

**वैराग, दि.३ मे-**

सावित्रीबाई फुले महिला खादी ग्रामोद्योग व बहुउद्देशीय संस्था, बार्शी संचलित अर्णव उच्च माध्यमिक विद्यालयाने बारावी परीक्षेत उज्वल निकाल कायम ठेवला आहे. विज्ञान शाखेच्या परीक्षेत पुन्हा एकदा १०० टक्के निकाल नोंदवला असून उत्तुंग यशामुळे शाळेचे कौतुक होत आहे. विद्यालयातील ५७ विद्यार्थ्यांनी ८५ टक्यांहून अधिक गुण मिळवले आहेत. ११८ विद्यार्थ्यांनी ८० टक्यांवर मजल मारली आहे. विशेष म्हणजे, शाळेतील सर्व विद्यार्थी ७५ टक्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम क्रमांक: समृद्धी कामधकर (८८.६७ टक्के), द्वितीय क्रमांक : ओम कुंभार (८८.५० टक्के), तृतीय क्रमांक (संयुक्त): मधुरा मननिरे, सृष्टी मोरे आणि दिशा तांबोरे (तिघांनाही ८७.८३ टक्के), चौथा क्रमांक: सानिका तांबे (८७.३३ टक्के) यांनी मिळविला. संस्थेचे सचिव तथा प्राचार्य रवींद्र कापसे आणि मुख्याध्यापिका अर्चना डिसले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### मंगळवेढा डेपोत एसटी बस समस्या; भक्तांच्या अडचणीत होतेय वाढ

**मंगळवेढा, दि. ३ मे -**

मंगळवेढा डेपोला भोसले यांचा दरारा संपल्याचे चित्र दिसत आहे. कर्मचाऱ्यांची दादागिरी सुरू झाल्याने सोनारीला सकाळी ८ वाजता जाणाऱ्या एसटी बसची वेळ पाळली जात नाही. ही बस साडेनऊ वाजेपर्यंत मंगळवेढा स्टँडवर थांबते आणि नंतर डिझेल टाकण्यासाठी पुन्हा थांबते. परिणामी, भक्तांना सोनारीला आरतीसाठी पोहोचणे कठीण होत आहे. सोनारी जाणाऱ्या भक्तांची एकच इच्छा असते की सकाळी आरतीसाठी वेळेवर गाडी मिळावी. मात्र, बेशिस्त कामगारांमुळे ही गाडी नेहमी उशिरा निघते. ऑनलाइन बुकिंगही लवकर उपलब्ध होत नाही. बुकिंग केली तरी एक बाजूला पूर्ण रिकामी सीट्स असतात, तर दुसऱ्या बाजूला अनेक सीट्स आरक्षित केलेल्या दिसतात. अशा कामगारांमुळे लवकरच सोनारी गाडी बंद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शनिवार दि.२ मे रोजी गाडी क्रमांक २ मधील ड्रायव्हर आणि कंडक्टर यांचा प्रवाशांशी वाद झाला. यामुळे गाडी वेळेवर सुटली नाही आणि अनेक भक्तांना आरती सापडली नाही.



प्रवासी संघाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी या कामगारांना योग्य शिक्षा करून सकाळी ८ वाजता गाडी नेमकी वेळेवर सोडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहेत. गाडी बुकिंग प्रक्रिया सुधारून सीट वाटप पारदर्शक करावे, अन्यथा सोनारी मार्गावरील सेवा बंद होण्याचा धोका निर्माण होईल. आगार व्यवस्थापक गुरुनाथ रणे यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# निमगावात शक्तीपीठ महामार्गाला समर्थन



## ९० टक्के बाधित अनुकूल; जास्तीच्या मोबदल्यासाठी मुख्यमंत्र्यांना देणार निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि ३ मे**

शक्तीपीठ महामार्गाला माळशिरस तालुक्यातील निमगाव, वेळापूर, माळखांबी, गारवड सह इतर गावातून जवळपास ९० टक्के शेतकऱ्यांनी समर्थन दिले आहे. हा शक्तिपीठ महामार्ग व्हावा परंतु शक्तिपीठ महामार्ग होत असताना आमच्या जमिनीचा दहापट मोबदला मिळावा अशी मागणी केली आहे. लवकरच याबाबत माळशिरस तालुक्यातील शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून निवेदन देणार असल्याचे सांगितले

शक्तिपीठ महामार्ग समर्थन समितीच्या वतीने निमगाव येथे रविवारी पत्रकार परिषद घेण्यात आली. पत्रकार परिषदेस निमगाव, वेळापूर, माळखांबी, गारवड आदी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शक्तीपीठ महामार्गाचे उपस्थित शेतकऱ्यांनी स्वागत केले. दुसऱ्या बाजूला स्वाभिमानीचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांची नुकतीच वेळापूर येथे शक्तिपीठ महामार्ग रद्द व्हावा यासाठी सभा झाली होती. या अनुषंगाने निमगाव येथील पत्रकार परिषदेने शेट्टी यांच्या दाव्यातील फोलपणा उघड केला आहे.

पत्रकार परिषदेस निमगाव व परिसरातील जवळपास ९० टक्के बाधित शेतकरी उपस्थित होते. त्यांनी शक्तीपीठ महामार्गाला जमिनी देण्यास समर्थन दिले आहे. जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा अशी मागणी केली. शक्तिपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्यांमध्ये बाधित शेतकऱ्यांची संख्या किती आहे हेही सरकारने तपासावे अशीही सरकारला विनंती केली आहे. या महामार्गामुळे दळणवळणाची साधने वाढून शेतमालाला बाजार भाव मिळणार आहे. महामार्गाबाबत अफवा पसरविल्या जात आहेत. सर्विस रोड, पाईपलाईन पासिंग, अंडरपास किंवा बोगदे याबाबत शंका व्यक्त करत आहेत परंतु शक्तीपीठ महामार्गाच्या दोन्ही बाजूने सर्विस रोड, पाचशे मीटर अंतरावर अंडरपास पलीकडच्या बाजूला राहणाऱ्या शेतजमिनीस पाईपलाईन नेता येणार आहे. यामुळे शक्तिपीठ महामार्गाचे स्वागतच आहे परंतु मोबदल्यासाठी सरकारसोबत चर्चा करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### विरोधकांनी विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावे

शक्तीपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्यांमध्ये इतर लोकांची संख्या जास्त आहे. ज्यांचे क्षेत्र या महामार्गात जात आहे त्या ९० टक्के लोकांचा पाठिंबा आहे, परंतु विनाकारण विरोधाभास केला जात आहे. विरोध करणाऱ्या लोकांना आमची विनंती आहे आमची काळजी करण्यापेक्षा भावी पिढीचा व आपल्या विकासाचा विचार करून विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हा. तालुक्याच्या व गावच्या विकासाला हातभार लावा.


**- किरण पाटील, ग्रा. पं. सदस्य, निमगाव म.**

# 'जल जीवन मिशन'ला डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मे-**

ग्रामीण पाणीपुरवठा व्यवस्थेला गती देण्यासाठी केंद्र सरकारने जल जीवन मिशन या योजनेची मुदत डिसेंबर २०२८ पर्यंत वाढवली आहे. परिणामी मढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.



जलसंपदा विषयक स्थायी समितीच्या १९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या बैठकीत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी जल जीवन मिशन अंतर्गत कामांच्या थकीत देयकांचा प्रश्न उपस्थित केला होता. तसेच संसद सभागृहातही ठेकेदार व अंमलबजावणी यंत्रणांना देयके वेळेत न मिळाल्याने कामांची गती मंदावत पाणीपुरवठा योजनांच्या कामांवर परिणाम होत असल्याचे केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते.



समितीसमोर दिलेल्या उत्तरात केंद्र शासनाने 'जेजेएम २.०' अंतर्गत योजनेची पुनर्रचना केली आहे. ग्रामीण पाणीपुरवठा क्षेत्रात संरचनात्मक सुधारणांवर भर देणार आहे. यासाठी वाढीव आर्थिक तरतूद केली असून, केंद्राकडून राज्यांना अनुदान जेजेएम २.० च्या कार्यकारी मार्गदर्शक सूचनांनुसार वितरित केले जाईल, असे म्हटले आहे. थकीत देयके लवकरात लवकर अदा करून सुरू कामांना गती देणे आवश्यक आहे. खासदार मोहिते-पाटील यांच्या या पाठपुराव्यामुळे व केंद्र सरकारने जलजीवन मिशनच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयामुळे देशातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांना नवसंजीवनी मिळणार आहे.

# लोडशेडिंगमुळे पिलीव परिसरातील शेतकरी, नागरिक हैराण

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि ३ मे-**

सध्या मे महीना सूरु आहे. पिलीव परीसरातील तापमानाने उच्चांक गाठला आहे. तापमान ४२ पर्यंत पोहचल्याने उष्णतेचा कहर आहे. मात्र कठारे उष्णतेच्या काळात लोडशेडिंग होत असल्याने शेतकरी व नागरिक हैराण झाले आहेत.

सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी या गावातील विहिरींनी तळ गाठला आहे. काही विहिरींना थोडेफार पाणी आहे; पण त्यासाठी वीजच नाही अशी विदारक परिस्थिती आहे. पिलीव ग्रामीण भागात सध्या वीज १४ ते १५ तास बघायलाही मिळत नाही. वीजेअभावी पिण्याच्या तसेच जनावरांच्या पाण्याचा गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पिलीव गावठाणमध्ये फक्त नियमित वीजपुरवठा केला जात आहे. पण बचेरी, सुळेवाडी, शेरी फीडर, कुसमोड जुना व नवा फिडरवर तसेच चांदापुरी, नवीन शेरी, शिंगोर्णी या फिडरवर तब्बल चौदा तासापेक्षा जास्त लोडशेडिंग करत आहे. सकाळी सहा आठ, त्यानंतर आठ ते चार व संध्याकाळी पुन्हा सहा ते दहा असे लोडशेडिंग केले जाते. संध्याकाळी तर जनावरांना पाणी, दुध काढण्यासाठी, वैरण बारीक करण्यासाठी, दळण दळण आदींसाठी विजेची अत्यंत आवश्यकता असते.

### आमदारांकडून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न

माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार व खासदार यांनी यावर तोडगा काढुन दिलासा देणे आवश्यक आहे. मात्र आमदार याबाबत माजी आमदारावर टीका करुन लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न तर करीत नाहीत ना असा प्रश्न सर्वसामान्यांमधून विचारला जात आहे .

# जैनवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



## भक्तिसागरात न्हाऊन निघणार पंचक्रोशी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३ मे -**

पंढरपूर तालुक्यातील जैनवाडी येथील श्री दत्त मंदिरात ५ व्या अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे. ज्ञानेश्वरीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन केले आहे. सोहळ्याची सांगता ७ मे रोजी होणार आहे.

सोहळा ह.भ.प.तात्या महाराज चौगुले भाळवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरतीने दिवसाची सुरुवात होईल. सकाळी ७ ते ११ या वेळेत ह. भ. प. रामदास महाराज माने भाळवणीकर यांच्या व्यासपीठावरून ज्ञानेश्वरी पारायण होईल. दुपारी १२ ते १ वारकरी भोजन, २ ते ४ विश्रांतीनंतर सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ होईल. रात्री ७ ते ९ कीर्तन व १० ते ११ हरिनाम जागर होईल.

७ मे रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. शामसुंदर महाराज ढवळे यांचे काल्याचे कीर्तन होईल सप्ताहात वीणापूजन, ग्रंथपूजन व प्रतिमापूजन ॲड. दिपक दामोदर पवार यांच्या हस्ते होणार आहे. ह.भ.प.रुपेश महाराज चौगुले, ह.भ.प. डॉ. किरण महाराज बोधले, वाणीभूषण ह.भ.प.अरुण महाराज यादव, ह.भ.प. हणमंत महाराज भोसले, ह.भ.प. जालिंदर महाराज चौगुले, ह.भ.प. लक्ष्मण महाराज कोकाटे, ह.भ.प. भाग्यवान महाराज रोडगे यांचे कीर्तन होणार आहे.

दररोज दुपारचे वारकरी भोजन आयोजित केले आहे. तसेच रात्रीचे भोजन ग्रामस्थांच्या वतीने देणार आहे. समस्त ग्रामस्थ, सद्गुरू भजनी मंडळ व तरुण मंडळ, जैनवाडी यांनी सहभागाचे आवाहन केले आहे.


# उन्हाच्या तीव्र तडाख्याने हैराण लोकांची जलतरण तलावाकडे धाव

## शहरातील नगरपालिकेचे स्विमिंग टँक फुल्ल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३ मे -**

पंढरपूर शहरात उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढतच असून नागरिक उन्हाच्या काहिलीत भाजून निघत हैराण झाले असून, पारा ४० अंशांकडे सरकल्याने शहरात उष्णतेची लाट जाणवत आहे. अशातच दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असले, तरी थंडावा मिळविण्यासाठी नागरिक, लहान मुले,व्यायामाची आणि उत्तम आरोग्याची आवड असलेले युवक जलतरण तलावांवर गर्दी करत आहेत.

पंढरपूर येथे २०१० साली अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त मिनी ऑलिम्पिक धर्तीवर नगरपालिकेच्या वतीने स्विमिंग टँक सुरू करण्यात आला आहे. विरंगुळा, आरोग्य या दोन्ही उद्देशांनी सध्या जलतरण तलाव हाउसफुल्ल असल्याचे चित्र शहरात दिसत आहे. वर्षभर दिवसाला ५०-६० जणांचा वावर असलेल्या तलावांत आता हीच संख्या १०० ते १०५ पर्यंत पोहोचली आहे. नियमित सदस्यांसोबत 'समर स्पेशल' बॅचेसमुळे तलाव दिवसभर गजबजलेले दिसत आहे त्यात लहान मुलांचा सहभागही आहे. या ठिकाणी अडीच ते तीन वर्षांच्या बालकांसाठी स्वतंत्र बेबी पूलची सुविधा आहे.



महिलांसाठी स्वतंत्र वेळा, सुरक्षित वातावरणामुळे त्यांचाही सहभाग वाढला आहे. प्रत्येक बॅचमध्ये प्रशिक्षित लाइफगार्ड, सीसीटीव्ही देखरेख, तसेच आपत्कालीन वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पोहण्यासाठी मासिक शुल्क बाराशे रुपयां दरम्यान असून, ज्यांना पोहता येत नाही त्यांना खास कोचिंग क्लास सुरू करण्यात आला आहे. येथे उन्हाळी सवलतीही देत आहेत. सकाळी ६ पासून दुपारी १२ पर्यंत आणि दुपारी ३ ते रात्री ७ या वेळेत सुमारे १० ते ११ बॅचेस घेतल्या जातात.पाण्याची पातळी, स्वच्छता आणि पीएच स्तर दररोज तपासला जातो. नागरिकांच्या वाढत्या संख्येमुळे लाइफ सेव्हरची संख्या वाढविली आहे.

उन्हाळा सुरू होताच नगरपालिकेने शहरातील एकमेव जलतरण तलावाची सखोल पाहणी केली. प्रत्येक तलावावर आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत, याची खात्री केली असून, सुरक्षिततेसाठी विशेष मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी जीवरक्षक उपलब्ध आहेत का, याचीही तपासणी केली. याशिवाय तलावाची सर्व सुरक्षिततेच्या दृष्टीने बाबी तपासण्यात आल्या आहेत.

### विशेष प्रशिक्षणाची सोय

पोहणे हा सर्वांत सुंदर आणि परिपूर्ण असा व्यायाम आहे, आम्ही परदेशी स्विमिंग अकादमी तर्फे गेल्या दोन वर्षांपासून हा स्विमिंग पूल चालविण्यास घेतला असून पोहायला येणाऱ्या मुलांची विशेष काळजी घेतली जात आहे,याठिकाणी बेबी पूल आणि जनरल असे दोन विभाग असून नवीन पोहायला शिकणाऱ्या युवक, लहान मुले व महिलांसाठी विशेष प्रशिक्षणाची सोय आहे,आमच्या अकादमी तर्फे अनेक मुले पोहण्याच्या विविध स्पर्धेत यशस्वी झाली आहेत.

**- सत्यजीत परदेशी, पंढरपूर.**

# नसरापूरच्या नराधमाला भर चौकात फाशी द्या

## अरविंद नाईकवाडी; अन्यथा महाराष्ट्रात आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३ मे-**

नसरापूर (ता. भोर, जि. पुणे) येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार व खून करणाऱ्या नराधमाला भरचौकात फाशी द्या, अशी आग्रही मागणी महर्षी वाल्मिकी संघाचे मंगळवेढा शहराध्यक्ष अरविंद नाईकवाडी यांनी केली आहे. सरकारने मागणीची दखल न घेतल्यास संपुर्ण महाराष्ट्रात आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.

६५ वर्षीय नराधमाच्या विकृत कृत्याचा तीव्र निषेध करण्यासाठी मंगळवेढ्यात महर्षी वाल्मिकी संघाने कठोर भुमिका घेतली आहे. आरोपीला तात्काळ आणि कठोरतम शिक्षा देण्याची मागणी केली आहे. शहराध्यक्ष अरविंद नाईकवाडी यांनी सरकारला ठणकावून सांगितले की, ज्या नराधमाने एका चिमुकलीचे आयुष्य कोळपून टाकले, त्याला कायद्याच्या पळवाटा शोधण्याची संधीच मिळता कामा नये. अशा हैवानांना भर चौकात फाशी दिली पाहिजे, तरच उद्याच्या पिढ्या सुरक्षित राहतील.

प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून एका महिन्यात नराधमाला फासावर लटकवावे, सरकारने या केससाठी विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. जर १५ दिवसांत दोषारोपपत्र दाखल झाले नाही आणि आरोपीला कडक शासन झाले नाही, तर महर्षी वाल्मिकी संघ संपूर्ण मंगळवेढा शहरासह जिल्ह्यात चक्का जाम आंदोलन छेडेल, असा इशाराही दिला आहे.

आरोपी भीमराव कांबळेने निरागस मुलीला गोठ्यात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. पुरावा नष्ट करण्यासाठी तिची दगडाने ठेचून हत्या करून मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्यात लपवला. अशा क्रूर गुन्हेगाराला समाजात स्थान नाही. जर न्याय मिळण्यास उशीर झाला, तर लोकांचा संयम सुटेल, असा इशारा अरविंद नाईकवाडी यांनी दिला आहे. या घटनेमुळे मंगळवेढ्यातील वातावरण अत्यंत संतप्त आहे.